# प्रीतपाखरू

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. २४०२




REFBK-0022686

का.म.
संदर्भ विभाग
२२६८६
२४०२
२५/१०/०९

# मीठभाकर

स्फुट कवितांचा संग्रह

[ सुधारून वाढविलेली पाचवी आवृत्ति ]

गजानन लक्ष्मण ठोकळ

REFBK-0022686

REFBK-0022686

एकमेव विक्रेते :

श्री लेखन वाचन भांडार

१००४ बुधवार पेठ, पुणे ४११ ००२

मूल्य १५ रुपये

प्रकाशक :

कृ. ग. ठोकळ
श्री लेखन वाचन भांडार
१००४ बुधवार पेठ, पुणे ४११००२

✷

आवृत्ती पहिली, इ. स. १९३८.
आवृत्ती दुसरी, इ. स. १९४७.
आवृत्ती तिसरी, इ. स. १९५२.
आवृत्ती चौथी, इ. स. १९६०.
आवृत्ती पाचवी, इ. स. १९७९.

✷

© ग. ल. ठोकळ

✷

मुद्रक :

य. गो. जोशी, बी. ए.
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणे ४११०३०

नव्य 22968 3402

# घास घेण्यापूर्वी

या पुस्तकाची पहिली आवृत्ती प्रसिद्ध होऊन अदमासे नऊ वर्षे लोटली. दुसरी आवृत्ती चार वर्षांपूर्वीच निघावयास पाहिजे होती. परंतु या ना त्या अडचणीमुळे ते जमले नाही. ‘ नव्याचे नऊ ’ संपल्यानंतर का होईना, पण या कवितासंग्रहाची दुसरी आवृत्ती निघत आहे, म्हणून मी खूष आहे.

सुधारून वाढविलेली ही आवृत्ती काढताना साहजिकपणे बरेच फेरफार झाले आहेत. पहिला फरक नावाचा. प्रामुख्याने ग्रामीण गीते असलेल्या कवितासंग्रहाला ‘ मीठभाकरी ’ ऐवजी ‘ मीठभाकर ’ हे नाव योग्य दिसेल, अशी काही मित्रांनी मला सूचना केली. ती मला पटली व तिला अनुसरून रीतल्या ईला मी प्रथम फाटा दिला. पहिल्या आवृत्तीत कवितांचे गट पाडून मी ते गटवारीने छापले होते. या आवृत्तीत कविता कालानुक्रमाने घेतल्या आहेत. अभ्यास करण्याच्या दृष्टीने हा क्रम जास्त सोयीचा पडतो, असा अनुभव आहे. नंतरचा फरक कवितांच्या संख्येमधला. या आवृत्तीत सहा सुनीता व बावीस कविता जास्त आहेत.

गद्याच्या नादी लागून मी काव्याची हयगय करतो, असा काही टीकाकारांचा माझ्यावर आक्षेप आहे. काही अंशी तो खरा आहे. कारण, नऊ वर्षांच्या कालावधीत मी फक्त बावीसच कविता लिहू शकलो. पण गद्य लिहिण्यात पूर्णपणे गुरफटून न जाण्याची मी खबरदारी घेतली आहे. काव्याचा सराव मी सुटू दिला नाही; आणि अजूनही कविता लिहिण्याची मला उमेद आहे. शिवाय गद्य लिहीत असतानाही मी कवीची भूमिका सोडलेली नाही, ही गोष्ट मी या टीकाकारांच्या नजरेस आणू इच्छितो.

या संग्रहात जुनी व नवी मिळून एकंदर तीस ग्रामीण गीते आहेत. हा वाङ्मयप्रकार सध्या लोकप्रिय झाला असून पुष्कळ

कवी सुंदर सुंदर ग्रामीण गीते लिहीत आहेत, ही फार आनंदाची गोष्ट आहे.

'सुनीता' हा काव्यप्रकार लिहितांना मी सहा ओळींचे वंधन ठेविले आहे. पहिल्या चार ओळी पार्श्वभूमीसाठी राखून ठेविल्या असून पाचव्या व सहाव्या ओळीमध्ये कलाटणी येते. पहिल्या चार ओळींमधे मांडलेल्या कल्पनेला शेवटच्या दोन ओळींत कलात्मक गाठ मारायला हवी. या काव्यप्रकाराचे तंत्र एकंदरीने सोपे असून त्याचे संस्कृत वाङ्मयांतील सुभाषिताशी बरेच साम्य आहे. कलाटणी हा या काव्यप्रकाराचा आत्मा आहे. कलाटणी जितकी अनपेक्षित तितकी सुनीता अधिक चांगली!

या काव्य प्रकाराचे 'सुनीत'शी असलेले साम्य पाहून याला 'सुनीता' हे नाव देण्याचा मला मोह झाला. 'सुनीत'च्या धाकट्या बहिणीला 'सुनीता' नाही म्हणायचे तर काय!

## चवथ्या आवृत्तीची प्रस्तावना

वरील प्रस्तावना दुसऱ्या आवृत्तीची आहे. तिसऱ्या आवृत्तीच्या वेळी आठ कवितांची भर घातली. या आवृत्तीत फक्त सहा कवितांची भर!

'कोंदण'<br>टिळक रस्ता, पुणे २.

ग. ल. ठोकळ

# पाचव्या आवृत्तीची प्रस्तावना

'मीठभाकर' या माझ्या कवितासंग्रहाची पाचवी आवृत्ती रसिकांच्या हाती देताना माझे हृदय आनंदाने भरून आले आहे. महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या विद्यापीठांनी या पुस्तकाचा समावेश अभ्यासक्रमामध्ये केल्यामुळे हा आवृत्यांचा योग जमून आला याची मला जाणीव आहे. म्हणूनच ही आवृत्ती विद्यापीठामधल्या अभ्यासक्रमासाठी जास्त सोयीची व्हावी याची मी काळजी घेतली आहे. यासाठी ४१ ग्रामीण कवितांचा गट सुरुवातीलाच छापला आहे.

माझे मित्र प्रा. आनंद यादव यांनी 'ग्रामीण कविता' या विषयावर लिहिलेली टीकात्मक, विस्तृत प्रस्तावना मी या आवृत्ती-मध्ये घातली आहे. याशिवाय 'सुगी' या मी संपादित व प्रकाशित केलेल्या ग्रामीण कविता-संग्रहाला श्री. वि. स. खांडेकर यांनी लिहिलेली सुरेख प्रस्तावना मी परिशिष्ट म्हणून या आवृत्तीला जोडली आहे. ग्रामीण वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना या दोन्ही प्रस्तावना उपयुक्त ठरतील, एवढेच नव्हे तर याशिवाय त्यांच्या अभ्यासाला परिपूर्णता येणार नाही, अशी माझी खात्री आहे.

या आवृत्तीत मी आठ कवितांची भर घालू शकलो, ही मला आनंदाची बाब वाटते. थॉमस हार्डीप्रमाणे उत्तर आयुष्यामध्ये फक्त काव्याला वाहून घ्यावे, असे खूप वाटते, पण–

कविता नं. १७ ते २१ व ३८ ते ४१ ही गीते खास लोक-नृत्यांसाठी लिहिलेली आहेत. मात्र लोकनृत्य बसविण्यापूर्वी परवानगी घेण्याची सक्त आवश्यकता आहे.

माझे तरुण मित्र श्री. आनंदराव यादव यांनी लिहिलेल्या मौलिक प्रस्तावनेबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

–ग. ल. ठोकळ

# मराठी ग्रामीण कविता आणि ठोकळ

## ( १ )

ग्रामीण कविता हा प्रकार इंग्रजीतील 'पॅस्टोरल पोएट्री' वरूनच मराठीत आला आहे हे उघड दिसते. वर्डस्वर्थच्या 'सॉलिटरी रीपर' सारख्या कवितां-वरून घेतलेल्या ग्रामीण कविता अनेक कवींनी लिहिलेल्या आहेत. ग. ल. ठोकळ तर थॉमस हार्डीपासून प्रेरणा मिळाल्याचे कबूल करतात. चंद्रशेखरांनी 'सफोक मिरॅकल'चे 'काय हो चमत्कार' हे रूपांतर केले. म्हणजे आरंभीची ग्रामीण कविता ही इंग्रजीवरूनच प्रेरणा घेताना दिसते.

असा इंग्रजीतून मराठीत आणण्याचा ग्रामीण कवितेच्या बाबतीत 'प्रतिष्ठा समारंभ' झालेला असल्यामुळे इंग्रजी संस्कृतीलाच फक्त प्रमाण मानणाऱ्या मराठी लेखक-वाचकांनी ग्रामीण कवितेच्या बाबतीत वास्तविक खळखळ करण्याचे काही कारण नाही. तरीही 'मुगी' च्या प्रस्तावनेत वि. स. खांडेकर म्हणतात; "खेड्याविषयीची कविता म्हटली की, अनेकांची तोंडे विश्वरूप दर्शन घेणाऱ्या अर्जुनाच्याप्रमाणे होतात." सर्वसामान्य वाचकाला खेड्याविषयीच्या कविते-बद्दल काय वाटत होते याची कल्पना खांडेकरांच्या या वरील वाक्यावरून पुरेशी येते.

पुढे ते म्हणतात; "जातिभेद मोडण्याच्या गोष्टी बोलणाऱ्या लेखकांनी वाङ्मयात नागर व खेडवळ हा भद तीव्रतेने पाळावा, हे विलक्षण विरोधाभासाचे उदाहरणच नव्हे काय? हिंदु-मुसलमानांच्या एकीवर आणि विवाहावर आम्ही लिहू; पण खेड्यातल्या कुणब्यांच्या भाऊबंदकीवर अगर जीवनावर लिहायची पाळी आली की, आमची लेखणी रुसून बसलीच! खेड्यातल्या लोकांचा आमच्या ललित वाङ्मयात प्रवेश झालाच, तर तो त्यांचा भोळेपणा अगर अडाणीपणा दाखवून विनोदाला रंग भरण्याकरिताच व्हायचा!...." ग्रामीण जीवनाकडे पाहण्याची तत्कालीन लेखकांचीही दृष्टी कोणत्या प्रकारची असावी, याची कल्पना या उताऱ्यावरून येते.

उलट तत्कालीन मराठी साहित्य कोणत्या सवंग वाङ्मयीन कल्पनेत अडकले असावे आणि त्यामुळे एकूण सकस साहित्याची व पर्यायाने कसदार ग्रामीण साहित्याची निर्मिती होणे कसे शक्य नव्हते याची कल्पना पुढील विचारांवरून येईल. खांडेकर म्हणतात, "…. कला म्हणजे सौंदर्य. हे सौंदर्य श्रीमंती व विलास यांचे एकुलते एक अपत्य आणि प्रणयवृत्ती ही या अपत्याची दाई, या त्रिकोणात वावरणाऱ्या कल्पनेचा ज्यांच्या मनावर पूर्णपणे पगडा बसला आहे, त्यांना बहुजन-समाजाशी समरस होणे अगर खेड्यातल्या जनांचे, मनाचे आणि वनाचे विविध सौंदर्य आपल्या वाङ्मयातून कुशलतेने प्रगट करणे फारसे शक्य नाही…." या वाङ्मयीन कल्पनेमुळेच की काय तत्कालीन ग्रामीण कवितेतही शेतकऱ्याचा सूर सदैव निसर्गसौंदर्य, स्त्रीपुरुषांतील कल्पनारम्य प्रणय व प्रेमभावना यांतच रमताना दिसतो एवढेच नव्हे तर एकूण दुःख, कष्ट, दारिद्र्य, हेही मोठ्या समाधानी, प्रसन्न वृत्तीनेच व्यक्त करण्याकडे कवितेतील शेतकऱ्याचा कल दिसतो. 'घाम गाळून पिकं आणण्यापेक्षा' 'घामाने शिंपुनि मळा' अशा प्रकारचे 'ललित मधुर' उद्‌गार काढण्याकडेच तथाकथित ग्रामीण कवींचा कल जास्त आहे.

पुढे खांडेकरांनी अधिक गंभीरपणे एकूण वाचकवर्गाला आणि लेखकवर्गालाही काही इशारे दिलेले आहेत. ते लिहितात, "शहरातील दलित वर्गांची चित्रे रेखाटणाऱ्या लेखकांना आज ना उद्या खेड्याकडे वळावेसे वाटेलच. ही प्रवृत्ती म्हणजे काही वाङ्मयातली फॅशन अगर चवचाल लहर नव्हे. महात्मा गांधी 'खेड्याकडे चला' म्हणून उपदेश करीत आहेत; इलाखाधिपती ग्रामोद्धारासाठी दौरे काढीत आहेत; तेव्हा आपणही खेड्याच्या नावाने गोंधळ घालू या, अशा कल्पनेने या नव्या मनूचे स्वागत करणाऱ्या लेखकांची कीवच करावी लागेल…. शाळेत असताना निबंधात अगर वादविवादसभेत खेड्यातील जीवनाची स्तुती करण्याचे काम कोणीही करील. पण समुद्राप्रमाणे अफाट पसरलेल्या आपल्या खेडवळ जीवनाचे मंथन करून त्यातली रत्ने काढायला मात्र प्रतिभासंपन्न लेखकच हवेत." ग्रामीण वाङ्मय निर्मितीकडे पाहण्याचा लेखकांचा 'फॅशनेबल' दृष्टिकोण व त्यातून घातला जाणारा 'गोंधळ' तत्कालीन अनेक ग्रामीण कवि-तांत, कथा-कादंबऱ्यांत आपणांस दिसून येतो. अशा साहित्याविषयी व लेखकां-विषयी खांडेकरांनी १९३३ सालीच दिलेला इशारा फारच महत्त्वाचा वाटतो.

खांडेकरांच्या या विचारांच्या पार्श्वभूमीवरच रविकिरणमंडळ–कालीन ग्रामीण कवितेचा विचार करावयाचा आहे. आधुनिक मराठी कवींच्या पहिल्या पिढीचे वाङ्मयीन कार्य १९२० च्या आसपास संपुष्टात आले आणि त्याच सुमारास रविकिरण मंडळाचा म्हणजे दुसऱ्या पिढीचा उदय झाला. या काळातील कविता माधव ज्यूलिअनांच्यासारखा एखादा अपवाद वगळता बहुतेक विस्तारशील होती. आधुनिक कवितेचा उगम आणि उन्मेष केशवसुतांपासून होऊन तो प्रवाह स्वतंत्रपणे, आपली वाट आपण निर्माण करीत, जोमाने वाहत १९२० पर्यंत आला. तेथून त्याचे पाणी संथ, शांत आणि विस्तारशील झाले. पाणी मात्र तेच. त्याच पाण्याला हळूहळू अनेक शाखा फुटल्या. हे पाणी शांत झाल्याने त्याच्या काठावर ' सुंदरतेचे ' प्रवाहाची शोभा वाढविणारे शैलीदार घाट बांधणे शक्य झाले. म्हणजे असे की पहिल्या पिढीने जी कविता नव्या जोरकस प्रेरणेने निर्माण केली व ज्या काव्यप्रवृत्ती निर्माण झाल्या त्याच प्रवृत्तींमध्ये वाङ्मयविलास दुसऱ्या पिढीने केला. त्यात पूर्वसूरींनी सिद्ध केलेले विषय, अनुभवच अधिक वारकाव्यांनिशी येऊ लागले. तपशिलाचे वारकावे आले तरी सखोलता अगर सूक्ष्मता आली नाही. किंबहुना नुसतेच वारकावे येऊ लागल्याने ही कविता कसाच्या दृष्टीने सत्त्वहीन, पण विभ्रमांमुळे ( शैलीने ) नटलेल्या तरुणीसारखी दिसू लागली.

काव्य–गायनाच्या प्रसार–प्रचारात ती अधिक लोकप्रिय झाली. १९२० पूर्वीच्या तुलनेने नंतर तिला वाचकवर्गही अधिक प्रमाणात मिळाला हेही खरे. फडक्यांच्या कादंबऱ्यांप्रमाणे तीही वाचकांचे मनोरंजन करण्यात गुंगून गेली.

याचा परिणाम असा झाला की, रविकिरण मंडळाची व रविकिरण मंडळ कवींचे अनुकरण करू पाहणाऱ्या दुय्यम दर्जाच्या कवींची कविता वाचकवर्गनिष्ठ प्रसिद्धीच्या कल्पनांत अडकून पडली. ज्यांच्या ( रविकिरण मंडळाच्या ) हातात तत्कालीन सामाजिक योगायोगाने मराठी कविता गेली होती त्यांनीच तिची चारही बाजूंनी कोंडी करून टाकली. पूर्वपरंपरेचाच विस्तार, शैलीतच धन्यता मानणे, स्वतःजवळ सांगण्यासारखे फारसे काही नसणे, वाचकांचा कल लक्षात घेऊन कविता गेयप्राधान्यावर भिस्त ठेवून निर्माण करणे; काव्याळ वृत्तीचा आविष्कार म्हणजेच कविता ही कोंडीची काही प्रमुख कारणे सांगता येतील. एकूण 'कविता' या वस्तूविषयीची कल्पनाच सामान्य होती.

या प्रवृत्तीची दाट छाया तत्कालीन मराठी कवितेवर पडत गेली. त्या वेळी

नव्याने जन्माला येऊ घातलेली ग्रामीण ( जानपद ) कविता या छायेबाहेर पडू शकली नाही. रविकिरण मंडळ प्रवृत्तीच्या कवितेला ती समांतरच जात राहिली. तत्कालीन वाङ्मयीन परिस्थिती व ग्रामीण कवितेचे तत्कालीन एकूण कवितेतील स्थान लक्षात घेता तशी ती समांतर जाणे स्वाभाविकही होते. कारण रविकिरण मंडळाची कविता हीच त्या वेळी प्रमाण मराठी कविता समजली जात होती. आणि ग्रामीण कविता लिहिणारे कवी हे रविकिरण मंडळातील कवींचे अनुकरण करून ग्रामीणेतर कविता तशाच प्रकारे लिहिणारे होते. त्यामुळेही त्यांची ग्रामीण कविता रविकिरण मंडळाच्या कवितेसारखीच निपजणे स्वाभाविक होते. ग्रामीण कविता एक हौस, केवळ एक ( सुनीत, विडंबन इ. प्रमाणेच ) नवा प्रकार एवढ्याच दृष्टीने ते तिच्याकडे पाहत होते. हे त्यांचे पाहणे उथळ, वरवरचे, एक टूम म्हणून होते, हे त्यावरून उघड होते.

टीकाकारांनीही तो एक ' नवा प्रकार ' म्हणूनच तिच्याकडे पाहिलेले दिसते. एक ' स्वतंत्र कविता ' म्हणून पाहण्याइतक्या तिच्या वेगळ्या प्रेरणा असू शकतील, तिला एक संपूर्ण वेगळे अनुभवविश्व, एक वेगळी संस्कृती, एक वेगळी ( ग्रामीण लोक-वाङ्मयातील ) घडण असण्याची शक्यता आहे; असा किंवा या दिशेने जाणारा विचार कोणा कवीने अगर टीकाकाराने तिच्या संदर्भात केलेला दिसत नाही.

अशा परिस्थितीत जन्माला आलेली आरंभीची स्फुट ग्रामीण कविता वेगळा संसार थाटणे, किंवा आपले स्वतंत्र अस्तित्व प्रभावीपणे प्रस्थापित करणे शक्य नाही. हौसेखातर नागर मुलीने खेड्यातल्या मुलीचा पोशाख घटकाभर धारण करावा आणि मिरवावा तसा हा केवळ बदलाचा एक नवा प्रकार म्हणूनच ही कविता आरंभी तरी जन्माला आली. रविकिरण-मंडळ कालीन कवितेत असे अनेक वरवरचे काव्यप्रकार जन्माला येत होते, हे ऐतिहासिक सत्य सर्वांना माहीत आहेच.

यामुळे भा. रा. तांबे यांनी ' प्रथम ' ' गुराख्याचे गाणे ' लिहिले व तेव्हा आधुनिक मराठीतील जानपद काव्याला प्रारंभ झाला.... ' अशी एकुलती एक कविता लिहिल्याबरोबर ' मराठीतील जानपद काव्याला प्रारंभ ' झाला असे म्हणण्याचे काहीच कारण नाही. किंवा ' सबंध ( एकच्या एक ) कविताच जानपद भाषेत लिहिली गेल्याचे पहिले उदाहरण गिरीशांच्या ' भलरी 'चे होय.

यशवंतांनी लगेच ‘ प्रेमाची दौलत ’ ही त्याच भाषेतली दुसरी कविता लिहिली.... व तेव्हापासून संपूर्ण ग्रामीण भाषेत कविता लिहिण्याची ‘ प्रथा ’ पडली, असे म्हणण्याचेही कारण नाही. कारण त्यानंतर अनेक ग्रामीण कविता व ग्रामीण कवितांचे संग्रहही अग्रामीण ( नागर ) भाषेत लिहिले गेलेले आहेत. दुसरे असे की मराठी कविता जशी मराठी भाषेत लिहिण्याची प्रथा पाडावी लागली नाही; तसेच ग्रामीण कविता ग्रामीण भाषेत लिहिण्याची प्रथा पाडण्याचेही काही वेगळे कारण नाही. आणखी असे की केशवसुतांच्याही अगोदर त्यांच्या ( केशव-सुतांच्या ) प्रवृत्ती दाखविणारी एखाद–दुसरी कविता अनेक कवींच्या कवितांत सापडते; म्हणून त्यांना आपण लगच आधुनिक कवितेचे जनकत्व बहाल करीत नाही. याच्या पाठीमागे जशी एक गंभीर कारणमीमांसा आहे; तशीच ग्रामीण कवितेच्या बाबतीतील जनकत्वाची मीमांसाही गंभीरपणे करणे आवश्यक आहे.

## ( २ )

‘ सुगी ’ हा ग्रामीण कवितांचा प्रातिनिधिक संग्रह प्रसिद्ध व्हायच्या अगोदर मराठीत कवी चंद्रशेखर यांचे ‘ काय हो चमत्कार ’ आणि गिरीश यांचे ‘ आंबराई ’ अशी शेतकरी जीवनावर दोन खंडकाव्ये प्रसिद्ध झालेली आहेत. ही दोन्ही खंडकाव्ये त्या काळात गाजलेली. चाकोरीतील मध्यमवर्गीय जीवन जगणाऱ्या मराठी वाचकाला, साहित्यिकाला व टीकाकारालाही नव्या विषयाचे अजूनही अमाप कौतुक आहे. केवळ या वाङ्मयबाह्य कारणासाठी मराठीत अनेक साहित्यिक प्रतिष्ठा पटकावून बसलेले आहेत.

वरील दोन्हीही काव्ये ‘ शेतकरी जीवनावरील ’ म्हणूनच केवळ गाजलेली दिसतात. श्री. म. माटे यांच्या ग्रामीण कथेच्या अगोदर जी मराठी ग्रामीण कथेची स्थिती होती तीच ह्या खंडकाव्यांची आहे. ( ह्यांतील एक तर रूपांतरित आहे. ) एक तर या खंडकाव्यात काव्यापेक्षा कथाच महत्त्व पावलेली दिसते. एखादी कथा मनात किंवा कागदावर ‘ तयार ’ ठेवून तिचे त्याच क्रमाने खंड पद्यबद्ध करून टाकलेले दिसतात. जमेल तेव्हा फावल्या वेळात ही पद्य कारागिरी करता येते. सतत उद्योग करत राहण्याची कष्टाळू वृत्ती आणि थोडी ललित भाषा आत्मसात असेल तर हा उद्योग ( ‘ काव्य ’ म्हणून ) त्या काळात यशस्वीही होत असे. ‘ काय हो चमत्कारा ’ला स्फूर्तीचा, अंतर्गत उमाळयाचा प्रश्नच

नव्हता. 'आंबराई 'चे रूपही ठोकळेबाज, सांकेतिक आहे. – प्रथम सर्वसामान्य निसर्ग वर्णन, ते झाले की त्याच्या पार्श्वभूमीवर कथेचा खंड. ( म्हणजे एखादा ठोकळेबाज प्रसंग ), त्यात संवाद, देहाच्या हालचालींची तपशीलवार, काहीशी स्वच्छंद वर्णने, पात्रांच्या चित्रपटात शोभतील अशा सिनेमॅटिक कृती, मधूनच चिंतनाचा अनाहूत शिडकावा, त्यातूनच लाकडी उपदेश सांगण्याची वृत्ती. आदर्शाच्या, दुष्टतेच्या, सौजन्याच्या, प्रेमाच्या, सुखाच्या, दुःखाच्या, अद्भुताच्या अतीव टोकाला जाणाऱ्या नाटकी, भडक व्यक्ती; आणि तशीच कथानके गुंफून ही खंडकाव्ये निर्माण झालेली आहेत. त्यांत स्फूर्तीचा उन्मेष, मौलिक काव्याचा प्रत्यय, जीवनाचे सघन दर्शन अगर समृद्ध अनुभवाचा काव्य पातळीवरील मनःपूर्वक आविष्कार पूर्णपणे अनुपस्थित असलेला दिसतो. सगळे सांकेतिक काव्यतंत्र मात्र कामाला जुंपून त्याच्याकडून पुरेपूर काम करून घेतलेले या दोन्हीही खंडकाव्यांतून जाणवते. कडवी रचून काव्य तडीला नेण्याची चिकाटी व कष्टाळू वृत्ती चंद्रशेखरांपेक्षा गिरीशांची विशेष जाणवते. ग्रामीण जीवनाचा दोघांचाही अनुभव मात्र प्राथमिक पातळीवरचा, गफलतींनी भरलेला, कल्पनाजन्य व नाटकी वाटतो. हे दोघेही कवी अनुभवात न रमता कथानकाच्या बांधणीत, त्यातील संवादांत, काव्यमय स्वच्छंदवादी व्यक्ती रेखाटण्यात, ग्रामीण भाषेच्या आभासासाठी नागर भाषेची मोडतोड करण्यात, निसर्गात, स्वप्नाळू वातावरणात, धक्के देणाऱ्या अद्भुतात रमलेले दिसतात. ग्रामीण वास्तव जीवनाला त्यामुळे ही दोन्हीही काव्ये मुकली आहेत. विषयाच्या एका नाविन्यापलीकडे त्यांनी मराठी कवितेला काही दिले असे वाटत नाही. या कवींनी आपल्याच रोमँटिक कल्पना व प्रवृत्ती शेतकऱ्यांच्या जीवनावर या काव्यांत आरोपित केल्या आहेत. त्यामुळही शेतकऱ्यांचे वास्तव जीवन त्यातून अभावानेच प्रगट झाले आहे.

'आंबराई ' प्रसिद्ध झाल्यानंतरच्या चार-पाच वर्षांत अनेक कवींनी ग्रामीण ( जानपद ) स्फुट कविता लिहिलेली दिसते. १९३३ साली प्रसिद्ध झालेल्या 'सुगीत ' त्या कवींचे संमेलनच भरलेले आहे. तीस-पस्तीस कवींनी त्यात भाग घेतलेला आहे. प्रत्येक कवीच्या नावावर एकपासून पाचपर्यंत कविता दिसतात. मराठीत प्रसिद्ध झालेला ग्रामीण स्फुट कवितांचा हा पहिलाच संग्रह. शिवाय ग्रामीण स्फुट कवितांचा प्रातिनिधिक संग्रहही पहिलाच. या अगोदर कोणाही कवीची ग्रामीण स्फुट कविता स्वतंत्रपणे संग्रह रूपाने प्रसिद्ध झालेली

दिसत नाही. अनेक कवी ग्रामीण स्फुट कविता या काळात लिहीत असले तरी इतर कवितांच्या बरोबरच तीही ' एक प्रकारची ' कविता याच दृष्टिकोणातून ते तिच्याकडे पाहत होते. या कवींच्या इतर कवितांची संख्या पाहिली व ग्रामीण कवितांची संख्या पाहिली तर ती फारच कमी आहे. पाच-दहा कवितांपलीकडे कोणा कवीने ही कविता लिहिलेली नाही. अधून मधून लेखणीला बदल म्हणून, ग्रामीण कविता लिहिण्याची हौस म्हणून या कवितांचे लेखन बहुतेक कवींनी केलेले असावे. बहुसंख्य ग्रामीण कवितांमधे यापलीकडे काही वेगळी प्रेरणा जाणवत नाही.

तरीही या काळात काही कवींचा ' जानपद जीवनावर कविता लिहिणारे कवी ' म्हणून खास उल्लेख होत होता. त्या कवींचीही कविता ' सुगी 'मध्ये आहे.

गिरीशांची ग्रामीण स्फुट कविता ढोबळ वर्णनापलीकडे जात नाही. यशवंतांची कविताही सांकेतिक वर्णनात, कल्पनारम्य चमत्कृतीत व वरवरच्या शाब्दिक नाट्यात रमलेली दिसते. जवळ तसेच काही सांगण्यासारखे नसल्यावर अशा गोष्टी बहुधा येतात. अन्यथा विचार व भावना यांनी युक्त असलेली यशवंतांची एरवीची कविता ग्रामीण रूपात अशी का दिसावी? सोपानदेव चौधरींची कविताही अशाच ग्रामीण जीवनातील प्राथमिक माहितीच्या वर्णनात, नाटकीपणात, चमत्कृतीतच रमताना दिसते. भ. श्री. पंडित, वि. भि. कोलते, वा. गो. मायदेव यांचेही असेच झालेले आहे. ना. घ. देशपांडे यांची कविता गेयनिष्ठेने डागळून गेलेली आहे. गाता येण्यासारखे ग्रामीण जीवनावर काही तरी रचावे हेच भान त्या कवितेने बाळगले आहे. त्यामुळे तिची भाषा व अनुभव कृत्रिम, यमकांसाठी व सुंदर कल्पनांना आणण्यासाठी झालेला दूरान्वय व असंबंधित अनुभवांचे तुकडे एकत्र आणण्याचा सोस तिच्यात आहे. काव्यविहारींची ग्रामीण कवितेची प्रेरणा ही शहरी जीवनाच्या कृत्रिमतेतून व दांभिकतेतून खेड्यातील नैसर्गिकतेकडे व प्रांजळतेकडे आकृष्ट होण्याच्या प्रतिक्रियात्मक वृत्तीतून निर्माण झालेली आहे. म्हणजे ग्रामीण जीवनाचे शहरी मनाला वाटणारे आकर्षण हीच तिची प्रेरणा मानावी लागते. ग्रामीण जीवनातून उमलून आलेली, त्यातून निर्माण झालेली ती प्रेरणा नव्हे. कवी आनंद यांना शेतकरी व सावकार यांचे संबंध व त्यांतून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक व फसवणूक विशेष जाणवताना दिसते. बाकीची वैशिष्ट्ये इतर कवींच्या कवितांप्रमाणेच आहेत.

ग्रामीण कवितेविषयी त्यावेळी कवींची सर्वसामान्य कल्पना काय होती, याची कल्पना वरील व तत्सम इतर कवींच्या कवितांवरून येते—रोजच्या ग्रामीण जीवनातील सामान्य प्रसंग, सामान्यपणे रंगविण्याची प्रवृत्ती या कवितांची आहे. बहुतेक कविता वर्णनपर, माहितीच्या पातळीवरच आहे. त्यातल्या त्यात शेतावरची पिके, निसर्ग, मोट, सुगी, पेरणी, काढणी, निंदणी, इंजिक, पाऊस, सकाळ-संध्याकाळचे वातावरण; पतिपत्नी व प्रियकर–प्रेयसी यांच्यामधील काल्पनिक रोमँटिक प्रेम ( हे जरा जास्तच आहे ), तरुण मुली, गुराखी, तिथल्या माणसांच्या मनाचा निकोपपणा इत्यादी विषय ' सुगीत ' आहेत.

या विषयासंबंधींची बहुतेक बघितलेली, प्राथमिक, स्थूल, अनेक वेळा काल्पनिक, आपल्या भावना–कल्पना आरोपित करून माहिती दिलेली दिसते. त्यामुळे अनेक कवींनी ' सुगी 'तील कवितांत तपशिलाचे घोटाळे केलेले आहेत. —चंद्रशेखरांच्या ' उघडं गुपित ' मधला संताजी शेलार हा ' पाटील ' एकदा श्रीमंत परिस्थितीत वाटतो तर अनेक ठिकाणच्या वर्णनांतून व संदर्भावरून त्याची स्थिती हलाखीची वाटते. ' खेडेगावातील सकाळ 'मध्ये ( द. ग. जयवंत ) तर नांगरणी, भातकापणी, गहू आणि जोंधळा ही एकाच ऋतूत आलेली दिसतात. ' उसाच्या मळयात ' ( भ. श्री. पंडित ) सहज फिरायला गेल्यावर ' उसाचा रस ' गुऱ्हाळ नसतानाही केव्हाही मिळतो. ' आवळे ' खाऊन झाल्यावर लगेच रुचिभेद म्हणून ' सीताफळे ' खायला मिळतात. ( अढीत त्यांना पिकवावे लागत नसावे; ती आवळयांप्रमाणे झाडांवरूनच तोडून खाता येत असावीत. ) सोपानदेव चौधरींच्या ' मळयात जाताना ' या कवितेत मंजुळा ही तरुण स्त्री डोईवर न्याहारीची ' पाटी ' असूनही खुरपे ' कमरेलाच खोचते ', पाटीत ठेवीत नाही हे आश्चर्य आहे. पुन्हा न्याहारीची पाटीही सूर्य ' डोईवर ' आलेला असताना तिच्या डोईवर आहे. न्याहारी कधी करायची व जेवण कधी करायचे याचा तिला पत्ताच लागलेला दिसत नाही. यशवंतांच्या शेतकऱ्यांचीही न्याहारी नांगरसुटीच्या वेळी म्हणजे दीस डोईवर आल्यावरच चालताना दिसते. ( न्याहारीचे गाणे )—हे काही नमुने अशा अनेक बारीक सारीक तपशिलाच्या घोटाळयांनी ' सुगी 'तील ग्रामीण कविता भरलेली आहे. ठराविक गोष्टींच्या वर्णनातच ती रमून जाताना बहुधा दिसते. दोन–तीन कवींनी मात्र शेतकऱ्यांची श्रीमंतांकडून होणारी पिळवणूक दाखवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

दिसत नाही. अनेक कवी ग्रामीण स्फुट कविता या काळात लिहीत असले तरी इतर कवितांच्या बरोबरच तीही ' एक प्रकारची ' कविता याच दृष्टिकोणातून ते तिच्याकडे पाहत होते. या कवींच्या इतर कवितांची संख्या पाहिली व ग्रामीण कवितांची संख्या पाहिली तर ती फारच कमी आहे. पाच-दहा कवितांपलीकडे कोणा कवीने ही कविता लिहिलेली नाही. अधून मधून लेखणीला बदल म्हणून, ग्रामीण कविता लिहिण्याची हौस म्हणून या कवितांचे लेखन बहुतेक कवींनी केलेले असावे. बहुसंख्य ग्रामीण कवितांमधे यापलीकडे काही वेगळी प्रेरणा जाणवत नाही.

तरीही या काळात काही कवींचा ' जानपद जीवनावर कविता लिहिणारे कवी ' म्हणून खास उल्लेख होत होता. त्या कवींचीही कविता ' सुगी 'मध्ये आहे.

गिरीशांची ग्रामीण स्फुट कविता ढोबळ वर्णनापलीकडे जात नाही. यशवंतांची कविताही सांकेतिक वर्णनात, कल्पनारम्य चमत्कृतीत व वरवरच्या शाब्दिक नाट्यात रमलेली दिसते. जवळ तसेच काही सांगण्यासारखे नसल्यावर अशा गोष्टी बहुधा येतात. अन्यथा विचार व भावना यांनी युक्त असलेली यशवंतांची एरवीची कविता ग्रामीण रूपात अशी का दिसावी ? सोपानदेव चौधरींची कविताही अशाच ग्रामीण जीवनातील प्राथमिक माहितीच्या वर्णनात, नाटकीपणात, चमत्कृतीतच रमताना दिसते. भ. श्री. पंडित, वि. भि. कोलते, वा. गो. मायदेव यांचेही असेच झालेले आहे. ना. घ. देशपांडे यांची कविता गेयनिष्ठेने डागळून गेलेली आहे. गाता येण्यासारखे ग्रामीण जीवनावर काही तरी रचावे हेच भान त्या कवितेने बागविले आहे. त्यामुळे तिची भाषा व अनुभव कृत्रिम, यमकांसाठी व सुंदर कल्पनांना आणण्यासाठी झालेला दूरान्वय व असंबंधित अनुभवांचे तुकडे एकत्र आणण्याचा सोस तिच्यात आहे. काव्यविहारींची ग्रामीण कवितेची प्रेरणा ही शहरी जीवनाच्या कृत्रिमतेतून व दांभिकतेतून खेड्यातील नैसर्गिकतेकडे व प्रांजळतेकडे आकृष्ट होण्याच्या प्रतिक्रियात्मक वृत्तीतून निर्माण झालेली आहे. म्हणजे ग्रामीण जीवनाचे शहरी मनाला वाटणारे आकर्षण हीच तिची प्रेरणा मानावी लागते. ग्रामीण जीवनातून उमलून आलेली, त्यातून निर्माण झालेली ती प्रेरणा नव्हे. कवी आनंद यांना शेतकरी व सावकार यांचे संबंध व त्यांतून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक व फसवणूक विशेष जाणवताना दिसते. बाकीची वैशिष्टये इतर कवींच्या कवितांप्रमाणेच आहेत.

ग्रामीण कवितेविषयी त्यावेळी कवींची सर्वसामान्य कल्पना काय होती, याची कल्पना वरील व तत्सम इतर कवींच्या कवितांवरून येते—रोजच्या ग्रामीण जीवनातील सामान्य प्रसंग, सामान्यपणे रंगविण्याची प्रवृत्ती या कवितांची आहे. बहुतेक कविता वर्णनपर, माहितीच्या पातळीवरच आहे. त्यातल्या त्यात शेतावरची पिके, निसर्ग, मोट, सुगी, पेरणी, काढणी, निंदणी, इंजिन, पाऊस, सकाळ-संध्याकाळचे वातावरण; पतिपत्नी व प्रियकर-प्रेयसी यांच्यामधील काल्पनिक रोमँटिक प्रेम ( हे जरा जास्तच आहे ), तरुण मुली, गुराखी, तिथल्या माणसांच्या मनाचा निकोपपणा इत्यादी विषय ' सुगीत ' आहेत.

या विषयासंबंधींची बहुतेक बघितलेली, प्राथमिक, स्थूल, अनेक वेळा काल्पनिक, आपल्या भावना-कल्पना आरोपित करून माहिती दिलेली दिसते. त्यामुळे अनेक कवींनी ' सुगी 'तील कवितांत तपशिलाचे घोटाळे केलेले आहेत. —चंद्रशेखरांच्या ' उघडं गुपित ' मधला संताजी शेलार हा ' पाटील ' एकदा श्रीमंत परिस्थितीत वाटतो तर अनेक ठिकाणच्या वर्णनांतून व संदर्भावरून त्याची स्थिती हलाखीची वाटते. ' खेडेगावातील सकाळ 'मध्ये ( द. ग. जयवंत ) तर नांगरणी, भातकापणी, गहू आणि जोंधळा ही एकाच ऋतूत आलेली दिसतात. ' उसाच्या मळयात ' ( भ. श्री. पंडित ) सहज फिरायला गेल्यावर ' उसाचा रस ' गुऱ्हाळ नसतानाही केव्हाही मिळतो. ' आवळे ' खाऊन झाल्यावर लगेच रुचिभेद म्हणून ' सीताफळे ' खायला मिळतात. ( अढीत त्यांना पिकवावे लागत नसावे; ती आवळयांप्रमाणे झाडांवरूनच तोडून खाता येत असावीत. ) सोपानदेव चौधरींच्या ' मळयात जाताना ' या कवितेत मंजुळा ही तरुण स्त्री डोईवर न्याहारीची ' पाटी ' असूनही खुरपे ' कमरेलाच खोचते ', पाटीत ठेवीत नाही हे आश्चर्य आहे. पुन्हा न्याहारीची पाटीही सूर्य ' डोईवर ' आलेला असताना तिच्या डोईवर आहे. न्याहारी कधी करायची व जेवण कधी करायचे याचा तिला पत्ताच लागलेला दिसत नाही. यशवंतांच्या शेतकऱ्यांचीही न्याहारी नांगूरसुटीच्या वेळी म्हणजे दीस डोईवर आल्यावरच चालताना दिसते. ( न्याहारीचे गाणे )—हे काही नमुने अशा अनेक बारीक सारीक तपशिलाच्या घोटाळयांनी ' सुगी 'तील ग्रामीण कविता भरलेली आहे. ठराविक गोष्टींच्या वर्णनातच ती रमून जाताना बहुधा दिसते. दोन-तीन कवींनी मात्र शेतकऱ्यांची श्रीमंतांकडून होणारी पिळवणूक दाखवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

'सुगी'त काही कवींच्या ग्रामीण भाषेचा सोस जाणवतो. काहींनी तर नागर भाषेची मोडतोड करूनच 'स्वतंत्र' ग्रामीण भाषा तयार केलेली आहे. तिच्यात कुठे सुसंगती नाही. ग्रामीण भाषेची शक्ती कुणाला कळली आहे असे वाटत नाही. ग्रामीण मनाला कुणी गंभीरपणे हात घातलेला आहे असे दिसत नाही. बहुतेक सर्व कविता बहिर्मुख आहे. चालीवर कशी म्हणता येईल इकडे अवधान ठेवूनही लेखन केलेले दिसते. बहुतेक कवी शहरातील असल्याने ग्रामीण जीवनाचे त्यांना आकर्षण वाटते. या आकर्षणातून खेड्याविषयीच्या ज्या काही रम्य कल्पना आकार घेतील, त्यांचा आविष्कार म्हणजे 'सुगी' असे म्हणता येईल.

आणखी एक गोष्ट इथेच नमूद करून ठेवलेली बरी. ती अशी की ग्रामीण कविता शक्य आहे, एवढेच या संग्रहाने दाखवून दिले असे म्हणता येईल. त्यामुळे त्यातील कवींपेक्षा तिचे संपादन करून प्रकाशन करावे, असे वाटणाऱ्या ग. ल. ठोकळांनाच तिचे श्रेय अधिक द्यावे लागते. कारण कवींनी एक प्रकार म्हणून जानपद गीते रचली. आणि त्या गीतात एका वेगळ्याच सामर्थ्याची शक्यता आहे, हे प्रथम ओळखून तिचा प्रातिनिधिक संग्रह काढण्याची कल्पना ठोकळांना सुचली. पुढे आपल्या कुवतीनुसार ग्रामीण कविता लिहिणाऱ्या ठोकळांना ही कल्पना सुचली, ही घटनाच बरेचसे सुचवून जाते.

'सुगी'तील काही कवींचा स्वतंत्रपणे उल्लेख करणे आवश्यक आहे. कवी 'सुरेश' यांच्या 'सुगी'त चार–पाच कविता आलेल्या आहेत. त्यांचा वेगळा उल्लेख करणे आवश्यक आहे. त्यांची कविता प्रामुख्याने वर्णनातच रमणारी असली तरी तिच्या तपशिलात सुसंगती व वास्तवता आहे. त्यामुळे ते वर्णन प्रत्ययकारी वाटते. शेताची व शेतकऱ्यांच्या अवस्थांची चित्रे वास्तवपूर्णतेने त्यांनी काढलेली आहेत. इतर कवींपेक्षा त्यांनी शेतकरी जीवन जवळून पाहिल्याचे जाणवते. ग्रामीण व्यक्तित्वाचा स्पर्श त्यांच्या कवितेला लाभलेला आहे.

पांडुरंग श्रावण गोरे यांच्या 'सुगी'तील व 'बोबडे बोल' या १९३२ साली प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या संग्रहातील ग्रामीण कवितांचे विशेष महत्त्व वाटते. संख्येने त्या कमी असल्या तरी तत्कालीन इतर कोणाही कवीच्या ग्रामीण कवितेपेक्षा अधिक वस्तुस्थितिनिदर्शक आहेत. ग्रामीण जीवनातील दारिद्र्य आणि असहायता हा त्या सर्वच कवितांचा स्थायीभाव आहे. भाषा ग्रामीण नसली तरी अधून–मधून

ग्रामीण शब्द येतात. या भाषेचे वैशिष्ट्य असे की तिचा सूर ग्रामीण आहे. ग्रामीण भाषेच्या जडणघडणीचा, ठेवणीचा स्पर्श तिला आहे. तिच्यातील वाक्ये, शब्द, विशेषणे–क्रियाविशेषणे, शब्दप्रयोग, शब्दांची क्रमशीलता ही नागर भाषेपेक्षा अनेक बाबतीत वेगळी आहेत. केवळ ' नाही 'चे ' न्हाई ' केले की नागरीची ग्रामीण भाषा होऊ शकत नाही. ' सुगी 'तील कवितांत ग्रामीण भाषा वापरणाऱ्या बहुसंख्य कवींनी अशाच रीतीने नागरीची ग्रामीण भाषा तयार केलेली आहे. आज ती भाषा वाचताना हसायला होते. पां. श्रा. गोरे यांची भाषा नेमकी याच्या उलट आहे. तिची आंतरिक शक्ती ग्रामीणच आहे. पण तिचे उच्चारण व लेखन नागरी भाषेच्या वळणाने केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या भाषेने ग्रामीण भाषेची ताकद आत्मसात करून तिचा आविष्कार नागर पद्धतीने केलेला आहे, असे म्हणता येईल. ' भारेवाली ' , ' शेतकऱ्याचे गाणे ' ( बोबडे बोल ), ' खोळंबा ' ( सुगी ) यासारख्या कवितांतील त्यांची भाषा त्या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. ग्रामीण बोलीशी तिने खराखुरा घनिष्ठ संबंध ठेवलेला आहे. त्यामुळे ती नागरी वळणाने लिहिली तरी ग्रामीण कवितेच्या संदर्भात शेतकऱ्याच्याही तोंडी खटकत नाही. सरळपणे भावना व्यक्त करीत जाते.

शहरी व्यक्तिमत्त्व या कवितेत मिसळलेले नाही. त्यामुळे शहरी व्यक्तिमत्त्वातील प्रेमभावना, कल्पना, घडीव निसर्गवर्णने, अद्‌भुत व नाटकी प्रसंग इत्यादींपासून ती अलिप्त आहे. वस्तुनिष्ठ राहून स्वतःच्या कुवतीनुसार विषयाशी तादात्म्य पावणारी त्यांची कविता आहे. कल्पनांचा, खोट्या विचारांचा, उपमादी अलंकारांचा रिकामा व कोरडा विहार तिच्यात नाही. सगळे लक्ष ' परिस्थिती ' पकडण्याकडे, जाणवलेले सरळपणे, परिणामकारकतेने व्यक्त करण्याकडे आहे. त्यामुळे ती अधिक प्रामाणिक वाटते. एक टूम म्हणून ती लिहिली आहे असे वाटत नाही.

त्यांची ही वैशिष्ट्ये लक्षात घेता त्यांना मराठीतील पहिले ग्रामीण कवी म्हणता येईल. पण इथेच त्यांचे श्रेय संपते. त्यांच्या ग्रामीण कवितांची संख्या त्या काळात फारशी नसावी. निदान ती मराठी ग्रामीण कवितेच्या प्रवाहावर स्वतःचा ठसा उमटवील इतकी खास नव्हती. किंवा असेही म्हणता येईल की कवीच्या ग्रामीण व्यक्तिमत्त्वाचा परिपूर्ण आविष्कार करील व स्वतःचे एक परिपूर्ण अनुभवविश्व स्वतंत्रपणे जाणवून देईल इतकी नव्हती. आहेत त्या ग्रामीण कविता तत्कालिन ग्रामीण कवितेत तुलनेने सच्च्या आहेत; श्रेष्ठ नाहीत. अशा कवितेने आपला

आविष्कार संख्येने जरी विपुल केला असता, जर तिचा एखादा जरी संग्रह स्वतंत्र पणे निघाला असता, तर तिला तिचा असा खास चेहरा–मोहरा प्राप्त झाला असता.

'सुगी'त आपल्या ग्रामीण कविता प्रसिद्ध करणाऱ्या ग. ह. पाटील यांचा 'रानजाई' हा संग्रह १९३४ साली म्हणजे 'सुगी'नंतर एकच वर्षाने प्रसिद्ध झाला आहे. ग. ह. पाटील यांच्या 'रानजाई'तील कवितांत ग्रामीणतेची ओढ असलेली दिसून येत असली तरी तिला ग्रामीण कविता म्हणता येईल असे वाटत नाही. ग्रामीणतेची ओढ असणे वेगळे आणि ग्रामीण व्यक्तिमत्त्वाने प्रेरित होऊन कविता लिहिणे वेगळे. पण असे असले तरी तत्कालीन तथाकथित ग्रामीण कविता लिहिणाऱ्या अनेक कवींच्या व्यक्तिमत्त्वांपेक्षा ग. ह. पाटील यांचे व्यक्तिमत्त्व ग्रामीणतेला अधिक जवळचे आहे. किंबहुना ग. ह. पाटील यांच्या व्यक्तिमत्त्वाची एक वैशिष्टयपूर्ण घडण आहे. ग. ह. पाटील यांचे बालपण खेडयात गेलेले. त्यात गाव–पाटीलकीचा वारसा चालत आलेला. मराठा घराणे. शेती प्रत्यक्ष घरी असलेली. खेडयातील निसर्गाचे प्रत्यक्ष दर्शन व विशेष आकर्षण. हे सगळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मुळातून आलेले अपरिहार्य आणि विशेष घटक. हेच व्यक्तिमत्त्व पुढे शहरी वैशिष्टयांनी संस्कारित झाले. म्हणजे असे की ग. ह. पाटील शिक्षणक्षेत्रात कार्य करू लागले. शहरी राहणी स्वीकारावी लागली. तिच्यावरोबर त्या संस्कृतीचाही स्वीकार झाला. त्यातून अपरिहार्यपणे शहराळलेपणा निर्माण झाला. शिक्षकी वृत्तीमुळे अनुभव येणारे आदेशात्मक, उपदेशात्मक विचार; तत्कालीन लोकप्रिय व प्रतिष्ठित अभिरुचिमान्य अशा साहित्याविषयीच्या कल्पना; त्यातूनच शिक्षकी वृत्तीमुळे येणारी जबाबदारी; या सर्वांचा परिणाम होऊन ग. ह. पाटील यांची कविता घडलेली आहे.

आपल्या वैशिष्टयपूर्ण व्यक्तिमत्त्वाशी पाटील प्रामाणिक राहिले. या व्यक्तिमत्त्वाचाच ते आविष्कार करू लागले. त्यामुळे कविता म्हणून त्यांच्या कवितेचे मोल विशेष आहे. सच्च्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार तिच्यात झालेला आहे. किंबहुना त्यासाठीच त्यांनी ती कविता लिहिली आहे असे जाणवते. त्यामुळे ती आत्मनिष्ठ, प्रांजळ, मनःपूर्वक व प्रत्ययकारी झालेली आहे. केवळ वर्णनासाठी ते सहसा लिहिताना दिसत नाहीत. त्यांच्या कवितेमागचे प्रेरक व्यक्तिमत्त्व अशा स्वरूपाचे असल्याने ती ग्रामीण कविता होऊ शकत नाही. ग्रामीण कविता लिहिण्यासाठी व्यक्तिमत्त्वाची इतर अंग्रे मागे सरकावून त्यातील ग्रामीण अंग्रेच

तेवढी पुढे आणावी लागतात. कारण मराठी समाजरचनेत निदान आज घडीपर्यंत तरी एक दोन अपवाद वगळता कविता करण्याइतपत सुशिक्षित झालेला माणूस शेतकरी म्हणून खेड्यावर राहिलेला दिसत नाही. त्याला अपरिहार्यपणे किंवा प्रभावी सामाजिक कारणांमुळे नोकरीचा पेशा पत्करावा लागतो. त्यामुळे त्याला शहरी जीवनात राहावे लागते. त्याचे अपरिहार्य परिणाम व संस्कार त्याच्या व्यक्तिमत्त्वावर होणे स्वाभाविक असते. अशा परिस्थितीत ग्रामीण कविताच लिहायची तर शहरी संस्कारांची अग्रे मागे सरकवून ग्रामीण व्यक्तिमत्त्वाची अग्रेच तेवढी कार्यप्रवण होतील अशी दक्षता घ्यावी लागते. शहरी संस्कारांचा, विचारशक्तीचा परिणाम झालाच तर तो ग्रामीण व्यक्तिमत्त्व समृद्ध करण्याकडे कसा होईल याची जाणीव ठेवून ग्रामीण व्यक्तिमत्त्व जोपासणे, विकसित करणे आवश्यक असते. पुढे ती व्यक्तिमत्त्वाची तशी ठेवणही बनून जाते. पण ग. ह. पाटील यांना खास ग्रामीण कविता लिहिण्यासाठी असे काही करावे असे वाटले नाही. आपल्या एकसंघ व स्वाभाविकपणे घडत गेलेल्या व्यक्तिमत्त्वाचाच त्यांनी आपल्या कवितेतून आविष्कार केला आहे. त्यामुळे त्यांनी बालपणी भोगलेले खेडे पुढे शहरात व नोकरीपेशात आल्यावर एक आकर्षक स्थान म्हणून त्यांना सतत आवाहन करू लागलेले दिसते. त्यामुळे त्यांच्या कवितेतून खेड्याची व खेड्यातील संस्कृती, परंपरा, लोककल्पना, निसर्ग, प्रांजळपणा, तेथील इतिहास, भूतकाळात गेलेल्या व नाहीशा झालेल्या गोष्टी यांची ओढ सदैव लागून राहिलेली दिसते.

'रानजाई' वाचल्यावर रुखरूख लागून राहते ती ही की या कवीने आपले ग्रामीण व्यक्तिमत्त्व ओळखून, ग्रामीण कवितेची मौलिक प्रेरणा लक्षात घेऊन कविता लिहिली असती तर त्या काळात लोकप्रिय असलेल्या, खोली नसलेल्या, वर्णनपर, माहितीपर ग्रामीण कवितेच्या पलीकडची; वास्तववादी, प्रांजळ, सच्च्या आत्मनिष्ठेतून जन्मलेली, चिंतनाने युक्त, अधिक अंतर्मुख ग्रामीण कविता जन्माला घातली असती.

'मीठभाकर' १९३८ साली प्रसिद्ध झाला व लगेच तीन एक वर्षांनी के. नारखेडे यांचा 'शिवार' हा संग्रह प्रसिद्ध झाला. हे दोन्ही कवी समकालीनच. के. नारखेडे यांच्या कवितांचे विषय हे 'सुगी'च्या बाहेरचे नाहीत. उलट त्यांच्या विषयांची हाताळणी स्थूल, बटबटीत, अतिसामान्य आणि सांकेतिक आहे. त्यांनी ग्रामीण कविता नागर भाषेत लिहिली. नागर भाषाच ग्रामीण कवितेला वापरावी

असा त्यांचा आग्रह आहे. त्यांच्या आग्रहाबद्दल इथे काही म्हणावयाचे नाही. पण त्यांनी आपल्या ग्रामीण कवितेला अभिजात मराठी कवितेची, संस्कृतनिष्ठ, संस्कृत साहित्यातील काव्य संकेतांसह नागर भाषा वापरली आहे. कित्येक वेळा ती भा. रा. तांबे यांच्या 'ललितमधुर' भाषेची आठवण करून देते. त्यामुळे या भाषेतून एक साहित्य-पुष्ट, सुसंस्कृत, शहरी जीवनाचे परिणाम झालेले मन व्यक्त होते. हे मन शेतकऱ्याच्या कायेत प्रविष्ठ झालेले आहे, असे जाणवते. त्यामुळे शेतकरी जीवनातील 'विषय घेऊन' एका शहरी मनाने केलेली ग्रामीण कविता, असे तिचे धेडगुजरी रूप झाले आहे. उदाहरणार्थ त्यांचा शेतकरी म्हणतो—

"ग्रामाने शिंपुनि मळा
पेरतो कधी जोंधळा,
मोत्यांची खुलते कळा,
ते अन्न-ब्रह्म वितरिते."

या कडव्यात भाषेमुळे अनेक गफलती झालेल्या असल्या तरी 'ते अन्न-ब्रह्म वितरिते' ही कल्पना मराठी शेतकऱ्याच्या आवाक्याबाहेरची आहे, एवढे लक्षात आले तरी पुरे, यावरून कल्पना येईल की नागर भाषेबरोबर नागर मनही प्रवेश करते आणि मूळ अनुभव शुद्ध स्वरूपात राहात नाही. त्यामुळे ग्रामीण जीवनाची निर्जीव, लाकडी माहितीच फक्त त्यांच्या कवितेत उतरलेली आहे. प्रत्यक्ष, चैतन्यपूर्ण ग्रामीण जीवन बाजूलाच राहिले आहे.

अशा रीतीने जाणता वा अजाणता अनेक कवींनी ग्रामीण जीवन व्यक्त करण्याचा प्रयत्न आपल्या कवितांमधून केलेला आहे. पण या ना त्या कारणाने ते प्रयत्न अपयशीच झालेले दिसतात. या पार्श्वभूमीवर ग. ल. ठोकळ यांच्या 'मीठ-भाकर' या संग्रहातील ग्रामीण कविता पाहता येईल.

## ३

ठोकळांचा 'मीठभाकर' हा संग्रह १९३८ साली प्रसिद्ध झाला असला तरी त्यात १९२८ पासूनच्या ग्रामीण कविता आहेत. ठोकळांच्या एकूण कवितेवरच रविकिरण मंडळाच्या कवितेची छाया आहे. त्या काळात ती बहुतेक कवींच्या कवितेवर होती. रविकिरण मंडळाच्या कवींचे कविताविषय, अभिव्यक्तीची पद्धती, कवितेच्या द्वारा व्यक्त होणारे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वसामान्य गुण

यांना समांतरच ठोकळांची कविता आहे. या सर्वसामान्य गुणांबरोबरच ठोकळांच्या व्यक्तिमत्त्वातील काही विशेष गुणांचा आविष्कारही त्यांच्या कवितेत झालेला दिसून येतो. पण ही वैशिष्ट्ये आनुषंगिक व दुय्यम आहेत. केवळ त्यांच्यामुळे कवितेला वेगळेपणाचा अंश लाभत असला तरी अंतर्बाह्य संपूर्ण व मौलिक स्वतंत्रपण तिला तेवढ्यामुळे लाभणे कठीण आहे.

एकूण ग्रामीण कवितेलाच त्या वेळी ग्रामीणेतर कवितेच्या तुलनेने मोठा इतिहास नव्हता. केवळ १९२५ ते २७ च्या आसपासच ती लिहिली जाऊ लागली होती. ग्रामीण जीवनाचा अव्वल दर्जाचा, प्रत्यक्ष, आतून अनुभव असलेले कवी तिच्या क्षेत्रात नव्हते. त्यामुळे मुळातच जन्माच्या वेळी ग्रामीण कविता व्याज, कृत्रिम व सांकेतिक असलेल्या वास्तवाला वंचित झालेली होती. शिवाय तत्कालीन वाङ्मयीन संकेत व कल्पनाही तिला असे करण्यास कारणीभूत असाव्यात असेही दिसून येते. गेयनिष्ठा, भाषा माध्यमासंबंधीचा विचार, कवितेकडे पाहण्याचा कवींचा दृष्टिकोण, यांसारख्या बाबींचाही त्या वंचनेला हातभार लागलेला असावा. तिचे एकूण स्वरूपच त्यामुळे प्राथमिक राहिले.

रविकिरण मंडळाच्या कवींनी जे कविताविषय हाताळले त्याला समांतरच तत्कालीन ग्रामीण कवितेत विषय आलेले दिसतात. एक तर रविकिरण मंडळाच्या एक दोन कवींनीच ग्रामीण कविता लिहिली व मंडळाच्या छायेत असलेल्या अनेक दुय्यम दर्जाच्या कवींनी ग्रामीण कविता लिहिली. त्यामुळे तिच्यातील ग्रामीणता सोडली तर मूळ रूप रविकिरण मंडळ कवितेसारखेच आहे. अव्वल दर्जाच्या एखाद्या कवीने ग्रामीण कविता निष्ठेने लिहिली असती तर तिचे रूप आरंभकाळीच वेगळे झाले असते.

'मीठभाकर' वाचत असताना प्रथमच जाणवते की कवीला ग्रामीण जीवनाची प्रत्यक्ष व जवळून माहिती आहे. नुसती माहिती नाही तर परिचय आहे. कारण माहिती आतापर्यंतच्या ग्रामीण कवितेत व कवितासंग्रहांत होती. पण कवींना जवळून परिचय नव्हता. ठोकळांना तो तसा आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेत बारकावे आले आहेत. आणि त्यांमुळे ती चैतन्यपूर्ण व प्रत्ययकारी वाटते. केवळ बारकाव्यांसाठी बारकावे आले तर कविता नुसती वर्णनपर होते आणि कित्येक वेळा पाल्हाळिकही होण्याची शक्यता असते. पण सहज ओघात हे बारकावे आले तर तेच कवितेच्या जिवंतपणाचे लक्षण होऊन बसतात.

आतापर्यंत ग्रामीण कवितेनें जे विषयविश्व हाताळले तेच विषय असूनही ठोकळांची कविता प्रत्ययकारी व जिवंत वाटते याला कारण हेच असावे.

रविकिरण मंडळाचा काळ हा एका अर्थी आपल्या कवितांतून कौटुंबिक, सामाजिक आदर्शवादी सांस्कृतिक मूल्याचे संगोपन व वर्धापन करू पाहणारा काळ होता. कदाचित पाश्चात्य मूल्यांच्या नवप्रवेशामुळेही ही जाणीव जागृत झालेली असावी. ' पतिपत्नी 'तील प्रेम हा अनेक कवींनी हाताळलेला विषय. ठोकळही याला अपवाद नाहीत. पण आपणही प्रेम हा विषय हाताळावा या केवळ वरवरच्या प्रतिक्रियात्मक वृत्तीने त्यांनी तो हाताळलेला नाही. त्यांनी ग्रामीण जीवन अनुभवलेले असल्याने पतिपत्नीच्या प्रेमसंबंधांतील वारकावे मार्मिकपणे पकडलेले आहेत. खेड्यातील पतिपत्नींच्या प्रेमभावना ह्या एकमेकांसमोर उघड पद्धतीने बहुधा व्यक्त होत नाहीत. काही तरी निमित्ताने, कृतीतून, अप्रत्यक्षपणे, संयम ठेवून त्या व्यक्त होत असतात. ठोकळांनी हे औचित्य बरोबर ओळखले आहे.

पती पीक-पाणी आले नाही म्हणून दूरदेशी पैसे मिळविण्यासाठी गेलेला असतो. आणि तिला त्याची सदैव आठवण होत असते. तिच्या कुडीतला तो जीव असल्याने, ' देवाचाबी देव ' असल्याने मन भरून येणे स्वाभाविक आहे. पण हे व्यक्त करणार कुठे ? ' जाते ' हा ग्रामीण स्त्रीला सर्वांत जवळचा सौंगडी. त्याच्याजवळ ती व्यक्त करते.

' दूरदेशी गेला मला एकली टाकून
तिठं न्हाई त्येला जीव लावायला कोण
राया, डोळयामंदी तुझ्या मोतीयाचं पाणी
राया, तुझा रंग जवसाच्या फुलावाणी '

( जात्यावरलं गाणं ) पहिल्या दोन ओळी ह्या मैत्रिणीजवळ व्यक्त करता येणे शक्य आहे. पण नंतरच्या दोन ओळींतील भावना मुग्धपणे फक्त ऐकून घेऊन कुणालाही न सांगणाऱ्या जात्याजवळच बोलणे शक्य आहे; इतक्या त्या नाजूक आहेत. म्हणूनच हे गाणे ' जात्यावर ' आले; आडावर, शेतावर गेले नाही.

जात्यावरले गाणे ओवीबद्ध असते. ही ओवी म्हणजे मराठी ग्रामीण स्त्रीच्या मनाचा परंपरागत चालत आलेला आविष्कार आहे. ओवी तोंडात आली की ग्रामीण स्त्रीचे मन फुलून येते. ठोकळांनी ओवीचे सामर्थ्य अचूक हेरले आहे. ' शेतावर जाण्यापूर्वी ' ही कविताही त्या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. ग्रामीण

कवितेला आधुनिक मराठी साहित्यात प्रवेश करायला ' ओवी 'चे लोकसाहित्याचे सनातन महाद्वार फारच उपकारक आहे; हे ठोकळांच्या मनात जाणता-अजाणता असावे असे वाटते.

पती दूरगावी गेल्यावर पत्नीच्या भावनांना जसे भरते येते, तसेच पत्नी माहेरी बरेच दिवस गेल्यावर आतल्या आत पुरुषमनाचीही घालमेल होणे स्वाभाविक आहे ( तुझ्याबिगर ). ग्रामीण पुरुष मनाचे वेडेबागडे प्रेम-स्वरूप दाखविणाऱ्या ' तुझ्याबिगर ', ' आंब्याच्या झाडाखाली ' या कविता पाहण्यासारखा आहेत.

त्यांच्या अशा प्रकारच्या कवितांतील प्रेमभावनांना बहुधा संयम असतो. प्रसंग-परत्वे, अप्रत्यक्षपणे, एखाद्या कृतीतूनच त्या व्यक्त होताना दिसतात.

' प्रियकर-प्रेयसी ' यांच्यातील प्रेमसंबंध हे रोमँटिक असणे स्वाभाविक आहे. जीवनात प्रियकर-प्रेयसी ही कल्पनाच रोमँटिक आहे. त्यांची प्रत्येक कृती ही त्या अनुषंगाने होणेही स्वाभाविकच. रविकिरण मंडळकालीन बहुतेक कवींच्या कवितांतून रोमँटिक वृत्तीचा आविष्कार झाला आहे, ' तुझ्याखातर ' ' गरिबीचा संसार ' या सारख्या प्रियकर-प्रेयसीच्या संबंधावर आधारलेल्या कवितांतून ग्रामीण जीवनातील रोमँटिक वृत्तीपेक्षा कवीचीच रोमँटिक वृत्ती नाट्यरूपाने व्यक्त होताना दिसते.

ठोकळांनी ग्रामीण जीवनातील सामाजिक स्थितीलाही वाचा फोडण्याचा प्रयत्न केलेला आहे.—

' हे जिणे असे मजुराचे बैलावाणी राबावे
लागता भूक पोटाला मातीचे घास गिळावे '
( मजूर )

यातून मजुरासारख्या खालच्या वर्गाचे दिसून येणारे दारिद्य व ऊर फाडणारे काम किंवा—

' पीक काढतो बारमहा हा राबुन शेतावरी
तरी खायला कळणाकोंडा, चिंध्या अंगावरी ! ( शेतकरी )

यातून दिसून येणारी शेतकऱ्याची असाह्यता व सावकार-शेतकरी यांच्यातील दिसून येणारी विषमता जाणवते. खेड्यातील सावकार, शेतकरी, मजूर यांच्या सामाजिक स्थितीवर यांसारख्या कवितांतून प्रकाश पडतो. ' मूठभर दाणे '

सारख्या वर्णनपर कवितांतूनही मांगामहारांसारख्या पददलितांची काढलेली शब्दचित्रेही त्या दृष्टीने महत्त्वाची आहेत.

तत्कालीन अनेक कवींनी लहान मुलांच्या भावनांना आपल्या कवितांतून बोलके केले आहे. ठोकळांनी ग्रामीण जीवनातील मुलांच्या भावनाही मुखरित केलेल्या दिसून येतात. सदैव शेतावर व गुरांमागे माळावर फिरणाऱ्या मुलांचे मनोगत त्यांनी जसे व्यक्त केले आहे ( सांज ), तसेच शिकण्याच्या निमित्ताने खेडया-वरून बाहेर गावी गेलेल्या मुलाच्या मनाची ओढही त्यांनी प्रांजळपणे व्यक्त केलेली आहे ( घरी ).

खेडेगावचा निसर्ग हा त्या जीवनाचा अपरिहार्य भाग आहे. ग्रामीण कवितेतून तो येणे अनेक दृष्टींनी अपरिहार्य आहे. एखाद्या घटनेची पार्श्वभूमी; वादळ-वाऱ्यासारखी, पुरासारखी एखादी घटना घडून ग्रामीण जीवनात तिच्यामुळे होणाऱ्या उलाढालीचा कर्ता; किंवा केवळ पहाट, सकाळ, दुपार, सांज, रात्र यासारखी एखादी स्थिती; शिवार, पीकपाणी, झाडे, ओढे, नद्या-तळी यांचे केवळ वर्णन; अशा विविध परींनी निसर्ग ग्रामीण कवितेत येणे स्वाभाविक आहे. 'मोटेवरलं गाणं', 'गुराख्याचा पोर', 'पहाट', 'सांज', 'सकाळ' यासारख्या कवितांतून निसर्गाचे वरील प्रकारचे अस्तित्व दिसून येते.

त्यांच्या काही वैशिष्टयपूर्ण कविता आहेत.' गरिबीचा पाहुणचार ',' मोटेवरलं गाणं ', ' खळयावर ' यांसारख्या कविता वाचताना हे वैशिष्टय विशेष जाणवते. खेडयातील संस्कृतीतील अनेक रीतिरिवाज कसे आहेत; घरात, मळयात, खळयात हे जीवन कसे असते याचा प्रत्यय या कवितांतून येतो. उदाहरणार्थ पाहुणचार करण्याची रीत ' गरिबीचा पाहुणचार ' या सुंदर कवितेतून जिवंतपणे अनुभवास येते. असे रीतिरिवाज त्यांच्या अनेक कवितांतून लहान-मोठया प्रमाणात विखुरले आहेत. त्यांच्या अशा प्रकारच्या कविता मनासमोर खेडयातील मराठी संस्कृतीची अनेक मार्मिक चित्रे उभी करतात.

ठोकळांच्या आणखी काही वैशिष्टयपूर्ण कविता आहेत. १९३१-३२ मध्ये त्यांनी त्या लिहिल्या आहेत. आपण खेडयातील आहोत; तिथे आपले खरे जीवन आहे; पण शहरात आपणांस नोकरी मान पकडून नेते आणि खेडयातील नैसर्गिक, साधे, सरळ, रसरशीत जीवन जगता येत नाही याची रुखरुख त्यांना लागून राहिलेली दिसते.

कुणि प्रेमाने बोलवी हुळा खावया
'या गुन्हाळ खाया दादा,' करितसे कुणि गयावया
जाईल भराभर अशी सुटी संपुनी
नौकरी मान पकडोनी नेईल परत ओढुनी!' (मायघर)

अशी तगमग आपल्या हातातून 'आपले खडे' सुटल्याने 'मी'ची होते.

'पक्वान्नावर ताव मारून कधी संतोष ना वाटला
ती जाडीभरडीच भाकर हवी खाण्यास आता मला'

( कांदाभाकर )

यांसारख्या ओळींतून आपण शहरामध्ये पक्वान्नावर ताव मारत असूनही जाड्या-भरड्या भाकरीचे आणि पर्यायाने खेड्यामधील राहणीचे आकर्षण सुटत नाही हे त्यांनी दाखवून दिलेले आहे. तसेच—

'तो शेते पिकवी स्वतः निथळत्या घामामधे नाहुनी
आम्ही हुश्श करून घाम पुसतो पंखा करी घेउनी'

( कष्ट आणि विश्रांती )

यातून आपणास शहरीपणामुळे व शहरी सुखसोयी असूनही किंबहुना त्यांनीच कसे निर्जीव, नाजूक, धट्टेकट्टे जीवन जगायला नालायक ठरलो आहोत हे दाखवून दिले आहे. 'सुखाचे ओझे' या कवितेतही अशाच प्रकारची भावना व्यक्त केलेली आहे.

खडेगावात ज्याचे बालपण गेलेले आहे आणि जो त्या जीवनाशी एकरूप होऊन गेलेला आहे; अशा माणसाला ग्रामीण नैसर्गिक जीवनाची ओढ अनावर लागणे आणि सक्तीने वा परिस्थितीने स्वीकाराव्या लागलेल्या शहरी, कृत्रिम, अस्वाभाविक जीवनाचा तिटकारा वाटणे स्वाभाविक आहे. ही स्वाभाविक ओढच ठोकळांच्या वरील प्रकारच्या कवितांतून व्यक्त झालेली आहे. ग्रामीण मन जेव्हा ग्रामीण जीवनापासून तुटते त्या वेळची ही स्वाभाविक आणि सार्वकालिक तगमग आहे.

अशा प्रकारच्या कविता ह्या 'खेड्याकडे चला, स्वाभाविक जीवन जगा, शहरी यांत्रिक व कृत्रिम जीवनापासून परावृत्त व्हा' यासारख्या गांधी तत्त्वज्ञानातून निर्माण झाला असण्याची शक्यता बोलून दाखविली जाते. ठोकळांच्या काही ग्रामीणेतर कवितांच्या बाबतीत तसे काही प्रमाणात झालेलेही आहे. पण सुदैवाने

त्यांच्या ग्रामीण कवितेवर त्याची छाया कुठे पडलेली दिसत नाही. त्यांची बहुतेक ग्रामीण कविता ही ग्रामीण व्यक्तिमत्वाच्या आंतरिक प्रेरणेतूनच जन्माला आलेली आहे.

सारांश ग्रामीण जीवनातील प्रेम, सामाजिक स्थिती, शेतमळा, निसर्ग, तेथील रीतिरिवाज, लहान मुले-मुली, तरुण-तरुणी, मजूर-शेतकरी, मांग-महार, वाघ्या-मुरळी आदी सर्व थरांतील विषय त्यांनी हाताळले आहेत. आणि त्यांतून ग्रामजीवनाचा आपल्या परीने सर्व बाजूंनी परिचय करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

त्यांची ग्रामीण कविता अभ्यासल्यावर असे दिसून येते की बहुतेक कविता प्रसंगनिष्ठ आहे. जीवनातील एखादा प्रसंग ते या ना त्या स्वरूपात घेतात आणि त्याचे कथन करतात. त्या कथनातूनच तेथील निसर्गचित्रे, भावना, विचार, कल्पना, इतर बाबी साकार होत असतात.

तसेच बहुतेक कविता नाटयगीतात्म आहे. म्हणजे असे की कवितेतील एखादी व्यक्ती ते गीत अभिव्यक्त करीत असते अशी भूमिका कवीने स्वीकारलेली असते. मोटकरी, गुराखी, पती, पत्नी, प्रेयसी, मांग-महार, वाघ्या मुरळी, कोळी आदी व्यक्ती आपआपल्या भाषेत आपआपल्या भावना व्यक्त करतात. कवी त्यांना बोलके करून नाटककाराप्रमाणे बाजूला सरकलेला असतो.

त्यांच्या या भूमिकेमुळे ग्रामीणतेला प्रत्यक्षता प्राप्त होते. त्या व्यक्ती प्रत्यक्ष बोलू लागतात. त्यांची मने सरळपणे वाचकासमोर उघड होतात. लेखकाच्या निवेदनाच्या कुबडया त्यांना वापराव्या लागत नाहीत. कारण त्यांच्या भाषेतून त्यांची बोलण्याची रीत, लकब, शब्दप्रयोग येतात आणि सबंध कविताच ग्रामीण-तेचा आविष्कार करते. त्यामुळे कवितेला जिवंतपणा येतो; अधिक प्रत्ययकारी व्हायला मदत होते.

याला विरोधी म्हणून पूर्वीच उद्धृत केलेले के. नारखेडे यांच्या कवितेतील कडवे पाहा—

‘ ग्रामाने शिंपुनि मळा
पेरतो कधी जोंधळा,
मोत्यांची खुलते कळा
ते अन्न-ब्रह्म वितरिते ’

एक तर या कवितेमध्ये मुळातच कृतक काव्यमयता अवलंबलेली आहे. घाम शिंपण्यापेक्षा शेतकऱ्याला ' घाम गाळावा ' लागतो. शिंपण्यामध्ये सुखद संवेदना आहेत. त्या गाळण्या ' मध्ये नाहीत. उलट कष्टाच्या, पराकाष्ठेच्या प्रयत्नाच्या अर्थ संवेदना ' घाम गाळणे ' या शब्दप्रयोगात सूचित होतात. दुसऱ्या चरणात ' कधी ' हा शब्द पादपूरणार्थ आलेला असला तरी अर्थाची हानी करणारा आहे. जोंधळा ' कधी ' तरी पेरायचा नसतो. प्रत्येक वर्षी, पाऊस लागल्यावर, घात साधून वेळच्या वेळीच पेरायचा असतो. नंतरच्या दोन चरणांची अभिव्यक्ती तर संपूर्ण अग्रामीण आहे. त्यामुळे सगळे कडवेच गायला चांगले वाटत असले तरी प्रत्ययकारी नाही. वस्तुस्थितीशी भावावस्थाच विसंगत असेल तर प्रत्यय येणार तरी कसा ? उलट

' साफ नांगरुन शेत त्यावरी औतही चालीवलं
जोंधळं मगशानी पेरलं
साबरफणिचं काटकुंपण सभोवार घातलं
कुठं तर केकताड वाढलं ' ( मोटेवरलं गाणं )

ही ठोकळांच्या कवितेतील अभिव्यक्ती घ्या. तिच्यात मोठा विचार नसला, नुसते वर्णन असले तरी जे व्यक्त झालेले आहे ते सुसंगत आहे. तिच्यातील घटनाक्रमाव असलेली माहिती चुकीची नाही. ' साफ, ' ' सभोवार ' हे शब्द नागर असले तरी एकूण भाषेचा सूर, तिच्यातील शक्ती ग्रामीणतेची आहे.

त्यांनी कवितेसाठी वापरलेली भाषा संपूर्ण ग्रामीण किंवा प्रादेशिक नसली, तिच्यात नागरी भाषेतील शब्द येत असले तरी एकंदरीत तिची ठेवण ग्रामीण भाषेची आहे. त्यामुळे नागरी शब्द येऊनसुद्धा त्यांच्या भाषेतील ग्रामीणतेला ढळ पोचत नाही. नागरी शब्दांचे प्रमाणही फारच विरळ आणि तुरळक आहे. बहुधा ते मात्रांचा भरणा कमीअधिक करण्यासाठी येतात. तसेच ठोकळ मूळ ग्रामीण भाषेला ढळ न पोचेल अशा गौणस्थानीच त्यांची योजना करताना दिसतात. या उलट चंद्रशेखर, गिरीश, यशवंत यांनी नागरी भाषेच्या आधारेच ग्रामीण भाषा ' तयार ' केलेली असल्याने जरी ती तथाकथित ग्रामीण असली तरी तिचे सगळे वळण नागरी वाटते. शहरगावच्या माणसाने खेड्यातील माणसाची नक्कल केल्याचा तिच्यात प्रत्यय येतो. अस्सल तेवढे गमावलेले जाणवते.

ठोकळांची ग्रामीण भाषेतील अभिव्यक्ती सहजपणे होते. तिला ओढाताण

करावी लागत नाही. त्यांची बहुतेक कविता प्रसंगनिष्ठ आहे व तिच्यात त्या प्रसंगांत सापडलेल्या व्यक्तीच बोलत असतात. अशा वेळी, अशा प्रकारच्या प्रसंगात सापडलेल्या व्यक्ती कशा बोलू शकतील, त्यांची भावस्थिती जशी असेल तशीच त्यांच्या ग्रामीण भाषेची ठेवण असते. 'गरिबीचा पाहुणचार' ही सर्वच कविता, त्या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. 'लइ सुगरण मपली बरं कारभारिण....' 'चापून अता होऊ द्या, करु नका कमी....' 'ए अगऽ वाढ की त्यांना, हां ब्येस जाहलं अता!' यासारखी खास गावरान अभिव्यक्ती त्यांच्या कवितेला पुष्कळ वेळा लाभते. अशा प्रकारचा शब्दयोजनेमुळे प्रसंग जिवंत आणि प्रत्ययकारी होतात. वास्तवाचे मार्मिक दर्शन घडते.

अनेक वेळेला जरी प्रत्यक्ष कवीनेच कवितेचे निवेदन केलेले असले तरी त्याच्या नागर भाषेला ग्रामीण भाषेतील मार्मिक शब्दांची व शब्दप्रयोगाची शक्ती लाभते. त्यामुळे त्या भाषेलाही ग्रामीण व्यक्तित्वाचा स्पर्श लाभतो. 'शेतकरी' ही त्यांची कविता त्या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. ती तशी नागर भाषेत असली तरी 'आकाशाने अपुला डोळा नाहि अजून उघडला' यातील 'डोळा न उघडणे' हा शब्दप्रयोग किंवा याच कवितेत 'अंगाने राकट, रंगाने सावळा', 'खेड्यावरला आडमुठा नांगऱ्या' या सारखे शब्दप्रयोग ग्रामीण भाषेच्या वळणाने व्यक्त झालेले आहेत.

ठोकळांच्या ग्रामीण कवितेला अशा रीतीने प्रसंगनिष्ठा, नाट्यगीतात्मकता, आशय व विषय यांच्यांतील सच्चेपणा आणि सुसंगती, ग्रामीण भाषेची आंतरिक शक्ती लाभल्यामुळे ती इतर कुणाही तत्कालीन कवीच्या ग्रामीण कवितेपेक्षा अधिक प्रत्ययकारी आणि ग्रामीण वाटते. आतापर्यंतची (म्हणजे ठोकळांच्या पूर्वी ज्यांनी कविता लिहिली त्यांची) कविता कोणत्या ना कोणत्या कारणामुळे मूळ प्रेरणांपासून सच्चेपणापासून बाजूलाच राहिली. ही उणीव ठोकळांनी भरून काढली. ग्रामीण कवितेत या दृष्टीने ठोकळांचे हे कार्य महत्त्वाचे आहे.

ठोकळांच्या कवितेला अलंकारांचे, शब्दसौष्टवादी गुणांचे बाह्यसौंदर्यही प्राप्त झालेले दिसते. 'लटकली कारली कितीक वेलांवरी!' (घरी) यासारखे अनुप्रास त्यांच्या कवितेत सहज साधले जातात.

'मी हरळी, तू सुंदर कुंदा
मी फांदी आणि तू बुंधा

मज शेवंतीच्या निशिगंधा
किति तुझी आठवू सुंदरता ? ' ( तुझ्याखातर )

यासारख्या ओळींतून त्यांची कल्पनाशक्ती जाणवते, तर—

' झाडांवर पक्षी दिसती केविलवाणी
आणीक पिकांची सरली साखरगाणी
ओहोट कधी घेईल हा तीव्र उन्हाळा ?
देईल कधी पाणकळा सूख जिवाला ? '

यांसारख्या ओळींतून त्यांचे भाषेचे सौष्ठव, प्रासादिकता, सहजता, प्रवाही-पणा जाणवतो. ठोकळांच्या कवितेला ' कविता ' म्हणून ही वैशिष्ट्ये लाभलेली आहेतच. त्यामुळे त्यांची कविता तत्कालीन इतर ग्रामीण कवितेच्या तुलनेने अधिक उठावदार, ललित रूप धारण करणारी झालेली आहे.

पण ती रविकिरण मंडळ काळात कवींच्या कवितेविषयी ज्या सर्वसाधारण कल्पना होत्या त्या कल्पनांतून सुटली नाही; यातच तिच्या मर्यादा आहेत.

त्यांची बहुतेक कविता वर्णनातच रमते किंवा वरवरच्या ग्रामीण जीवनावरच रेंगाळताना दिसते. ग्रामीण जीवनाचा तळ क्वचितच ढवळून काढताना दिसते. कलाटणीवजा एखादा विचार शेवटी येतो, नाही असे नाही. पण एकूण कवितेत वर्णनशीलताच विशेष जाणवते.

असा एक विचार येथे सुचतो की एखाद्या भाषेतील कवितेलाही तिचा असा एक स्वाभाविक व नैसर्गिक प्रवास असावा. ज्या जीवनातील अनुभवातून कविता साकार होत असते ते जीवन काय आहे; याचा वरवरचा परिचय प्रथम करून देणे आवश्यक असते. त्यानंतर तो परिचय गृहीत धरून पुढे वैचारिक, चिंतनात्म, मौलिक स्वरूप यांच्याकडे जाणे सुलभ होते. कित्येक वेळेला कवीला एखाद्या नव्या विश्वाचा प्रथमच परिचय करून द्यावा लागत असेल तर तो स्वभावतः किंवा अपरिहार्यपणे वरवरच्या माहितीत, वर्णनातच अडकून पडतो. तसेच तत्कालीन कवितेविषयीच्या कवींच्या कल्पनाही त्याच्या कवितेवर कळत न कळत नियंत्रण करीत असतात. एखाद्या वेळेस कवीच्या प्रतिभाशक्तीची कुवतही कारणीभूत असते. ठोकळ यांच्या कवितेपाठीमागे यांतील कोणते कारण असावे हे स्पष्ट सांगता येत नसले तरी त्यांची कविता वर्णनपरतेत, माहितीपूर्णतेत रमली आहे. हे उघड दिसते.

त्यांची कविता वास्तववादी आहे. खेड्यातील दररोजच्या जीवनातील प्रसंग घेऊन त्यांनी रेखाटन केले आहे. पण मधूनच ती रोमँटिक होते आणि वास्तवाला तडा जातो. ग्रामीणतेचे भान उरत नाही. विशेषतः प्रेमभावना व्यक्त करताना कवीची ही रोमँटिक वृत्ती डोकावते. त्या दृष्टीने ' तुझ्याखातर ' ही सर्वच कविता पाहण्यासारखी आहे. ' तुझ्याबिगर ' या कवितेमध्येही ती डोकावते. पत्नीला माहेरला पाठवून पस्तावलेला शेतकरी पती तिच्या विषयीच्या भावना व्यक्त करताना म्हणतो—

' शेतावरून जवा
घरिं यावं तवा
कोण म्हणून दाविल गाणी ? '

शेतावरून पती घरी आल्यावर ' गाणी ' म्हणून दाखविणारी पत्नी ही वास्तववादी न वाटता रोमँटिक वाटते. अशा रीतीने कवीचीच रोमँटिक वृत्ती कवितेत अनेक वेळा डोकावताना दिसते. रविकिरण मंडळ कालातील कवितांत अशी रोमँटिक वृत्ती सर्वत्र दिसते. एक स्वप्निल, आदर्श, ध्येयवादी संसार व पतिपत्नींचे प्रेम असावे या प्रेरणेतूनच रोमँटिक वृत्ती आलेली असावी.

रविकिरण मंडळ कालीन अनेक कवींच्या कवितांप्रमाणेच ठोकळांची कविता अनेक वेळा परिणाम साधण्याच्या उद्देशाने, चित्र गडद करून लक्षात आणण्याच्या उद्देशाने नाट्यविवश व भावविवश झालेली दिसते. विशेषतः करूण रसाच्या वेळी ही विवशता जास्त दिसते. 'मजूर, ही कविता त्या दृष्टीने तपासून पाहण्यासारखी आहे. त्याच्या दारिद्र्याचे व उपासमारीचे वर्णन करताना कवी भावविवश झालेला दिसतो.

मजूर आपले हाल सांगताना म्हणतो—

" नाही भाकर पोटाला
पाणीही नसे प्यायाला
व्याकूळ जीव हा झाला...."

" कुचराई काही नसता
पेकटात बसती लाथा
लागून उन्हाच्या झळया
वोलणी तडातड मिळती
चाबूक फडाफड उडती
रक्ताचे ओघळ सुकती "

यासारखी कडवी पाहा. त्याच्या पोटाला भाकर नाही, कुचराई नसता बोलणी

तडातड मिळतात, हेही वास्तववादी वाटते. पण पाणीही मिळत नाही, पेकटात लाथा बसून चाबूक फडाफड उडतात, रक्ताचे ओघळ सुकतात ' ही अभिव्यक्ती भावविवशतेतून, परिणाम साधण्यासाठी, चित्र गडद करण्यासाठी, कविता वाचताना व चालीवर म्हणताना वाचकाच्या हृदयाला पाझर फुटावा; अशा प्रवृत्तीतून निर्माण झालेली असावी. ' रसपरिपोष ' या वाङ्मयीन कल्पनेचाही तो प्राथमिक पातळीवरील परिणाम असावा.

शहरातील मध्यमवर्गीय वाचकाला ग्रामीण जीवनाची माहिती करून द्यावी, त्याला समजेल अशा बेताने कविता लिहावी अशीही एक सुप्त प्रेरणा या कवितेत अधून मधून डोकावताना, पृष्ठभागावर येऊन बुडबुड्याप्रमाणे उमटताना दिसते. ' खळ्यावर ', ' उन्हाळा ', ' पावसा ', ' यांसारख्या कवितांत जेव्हा केवळ वर्णने आणि ग्रामीण जीवनातील माहितीच येते तेव्हा असे वाटल्यावाचून राहत नाही. अनेक वेळा शहरी जीवनाची नकळत प्रतिक्रिया होऊन विरोधाने खेड्यातील जीवनाचे वर्णन होते तेव्हा कवीचे शहरी व्यक्तित्व कवितेत डोकावते—

एखादा ' मजूर ' आपल्या संसाराचे वर्णन करताना आपला संसार कसा आहे ते नुसते सुसंगत वर्णन करून सांगेल. ' माझ्या झोपडीत मडक्यांची उतरंड आहे. ' एवढेच तो सांगू शकेल. ' छे भांडीकुंडी कुठली ! ' असे प्रतिक्रियात्मक विरोधी उद्‌गार काढणे तेवढेसे सुसंगत वाटत नाही. कवीच्या ठिकाणी असलेल्या शहरी व्यक्तित्वाचा परिणाम अशा रीतीने इथे मजुरावर झालेला आहे. बारीक-सारीक प्रमाणात असे शहरी व्यक्तित्व त्यांच्या ग्रामीण कवितेत डोकावताना जाणवते. पण हे क्वचितच.

ठोकळांच्या या उणिवा क्वचित ठिकाणीच दिसून येतात. आणि यांतील बहुतेक रविकिरण मंडळ कालीन कवितेलाच पडलेल्या आहेत. त्याला ठोकळही अपवाद नाहीत.

१९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले. त्यानंतर समाजाच्या आणि पर्यायाने ग्रामीण समाजाच्या जगण्याच्या प्रेरणाच बदलून गेल्या. मानवी मनात आणि समाजात आंतर्बाह्य नवी जागृती निर्माण होऊ लागली. त्यात उत्साहही बराच होता. १९४८ साली ठोकळांनी लिहिलेले ' साक्षरतेचे गाणे ' याच उत्साहापोटी झाले असावे, असे वाटते. १९४९ नंतर त्यांनी ' जत्रा ' ' गारोडी ' ' कोळ्यांचे गाणे ', ' जंगलचा कातकरी ', ' वाघ्या-मुरळी ' यांसारखी बरीच शब्दचित्रे

काव्यबद्ध केलेली आहेत. पण १९२८ ते ४५ च्या काळात त्यांनी जे ग्रामीण कवितालेखन केले त्याहून या कविता वेगळ्या वाटत नाहीत. उलट त्या काहीशा हुकमी वाटतात. त्यांच्या ग्रामीण कवितेचा खरा बहर १९२८ ते ४५ पर्यंतच्या काळातच आहे. १९३९ च्या आसपास ते तर ग्रामीण कथा-कादंबरीच्या लेखनाकडे वळले. कदाचित त्याचाही परिणाम त्यांच्या नंतरच्या काव्यलेखनावर झाला असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वास्तविक त्यांनी ग्रामीण कविता ऐन तारुण्यात लिहिली. पुढे प्रौढपणीही तितक्याच निष्ठेने ते ग्रामीण कविता लिहीत राहिले असते तर ' लक्ष्मी ', 'नदी-पल्याड ', ' सासुरवास ' यांसारख्या कवितांत काही प्रमाणात दिसून येणारी वर्णनपरतेच्या पलीकडची भावगर्भता आणि चिंतनशीलता परिपूर्णतेने येऊ शकली असती आणि ग्रामीण कविता अंतर्मुख होऊन अधिक सखोल आणि मनःपूत झाली असती. पण हे होऊ शकले नाही. त्यामुळे रविकिरण मंडळ कालीन ठोकळांच्या ग्रामीण कवितेचाच ठसा वाचकाच्या मनावर राहतो.

रविकिरण मंडळ कालातील इतर ग्रामीण कवी लक्षात घेता ठोकळांच्या ग्रामीण कवितेचा मनावर जो समग्र ठसा उमटतो तो त्यांच्या सच्चेपणाचा. ग्रामीण जीवनाची जवळून माहिती असलेला, रोजच्या ग्रामीण जीवनातील विषय घेऊन त्यांना काव्यरूप देणारा, ग्रामीण भाषेची कवितेच्या संदर्भातील स्वाभाविकता ओळखून तिचाच वापर ग्रामीण कवितेसाठी त्या काळात यशस्वीपणे करणारा, ग्रामीण कवितेला मराठी वाङ्मयात स्वतंत्रपणे प्रस्थापित करणारा व तिला स्वतंत्र प्रतिष्ठा प्राप्त करून देणारा हा पहिला ग्रामीण कवी मानावा लागतो; हे त्यांच्या मर्यादा लक्षात घेऊनही मान्य करावे लागते.

— आनंद यादव

# अनुक्रम


| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | शेतकरी | १ | २६ | गरिबीचा पाहुणचार | ४० |
| २ | कांदाभाकर | ३ | २७ | घरधनी | ४२ |
| ३ | कष्ट आणि विश्रांती | ४ | २८ | नदीपल्याड | ४३ |
| ४ | गुराख्याचा पोर | ५ | २९ | तुझ्याबिगर | ४४ |
| ५ | खेडवळ फूल | ७ | ३० | पावसा ! | ४५ |
| ६ | गोंधळ | ८ | ३१ | जात्यावरलं गाणं | ४६ |
| ७ | माझे गाव | १० | ३२ | सावकारी पाश | ४७ |
| ८ | गढी | १२ | ३३ | मजूर | ४९ |
| ९ | सकाळ | १३ | ३४ | भिकारीण | ५१ |
| १० | सांज | १४ | ३५ | मूठभर दाणे | ५३ |
| ११ | जत्रा | १५ | ३६ | कपिलेचे गाणे | ५४ |
| १२ | घरी | १६ | ३७ | साक्षरतेचे गाणे | ५५ |
| १३ | मायघर | १८ | ३८ | गोंडांचे गाणे | ५६ |
| १४ | खळ्यावर | २० | ३९ | शिलंगण | ५८ |
| १५ | पाटलाची लेक | २१ | ४० | भिल्लांचे जग | ५९ |
| १६ | शेतावर जाण्यापूर्वी | २३ | ४१ | लमाणांचा तांडा | ६१ |
| १७ | सुगी | २४ | ४२ | आकाशगंगा | ६३ |
| १८ | गारोडी | २६ | ४३ | बंदिवान | ६५ |
| १९ | जंगलचा कातकरी | २९ | ४४ | झोपी जा रे बाळ ! | ६६ |
| २० | वाघ्या-मुरळी | ३० | ४५ | दृष्ट | ६७ |
| २१ | कोळ्यांचे गाणे | ३३ | ४६ | एकटी | ६८ |
| २२ | गरिबीचा संसार | ३४ | ४७ | बकुळीची फुले | ७० |
| २३ | लक्ष्मी | ३६ | ४८ | मराठा | ७१ |
| २४ | मोटेवरलं गाणं | ३७ | ४९ | शारदेस | ७२ |
| २५ | आंब्याच्या झाडाखाली | ३९ | ५० | पहाट | ७४ |

| | | |
|---|---|---|
| ५१ | तू | ७५ |
| ५२ | आईचे दूध | ७६ |
| ५३ | तुझ्याखातर | ७८ |
| ५४ | शोध | ८० |
| ५५ | उन्हाळा | ८१ |
| ५६ | तिच्याविषयी | ८२ |
| ५७ | काळ्या पाण्यावर | ८४ |
| ५८ | दर्भांकुर | ८६ |
| ५९ | मं मं | ८७ |
| ६० | पोट | ८८ |
| ६१ | पारधी | ९० |
| ६२ | अनुनय | ९१ |
| ६३ | अर्धांगी | ९३ |
| ६४ | स्वर्ग | ९५ |
| ६५ | घराकडे | ९६ |
| ६६ | निर्धार | ९७ |
| ६७ | कर्णा | ९९ |
| ६८ | रेशमाची गाठ | १०० |
| ६९ | सुखाचे ओझे | १०२ |
| ७० | पपी | १०४ |
| ७१ | ठोक चल दंड ! | १०५ |
| ७२ | ऊठ | १०७ |
| ७३ | मिनतवारी | १०९ |
| ७४ | रात्र | १११ |
| ७५ | तिचे पत्र | ११२ |
| ७६ | काटा | ११३ |
| ७७ | सासरी | ११४ |
| ७८ | उशीर | ११६ |
| ७९ | मुले आणि फुले | ११७ |
| ८० | शरणचिठी | ११८ |
| ८१ | स्वातीचे थेंब | १२० |
| ८२ | बदामची राणी | १२२ |
| ८३ | पन्हाळगड | १२३ |
| ८४ | आशा | १२४ |
| ८५ | शिदोरी | १२५ |
| ८६ | दिवा | १२६ |
| ८७ | पाणवारा | १२८ |
| ८८ | वादळात | १३० |
| ८९ | इषारा | १३१ |
| ९० | आंधळा भिकारी | १३३ |
| ९१ | गळ्याची शपथ | १३४ |
| ९२ | अभिसारिका | १३५ |
| ९३ | मृगजळ | १३६ |
| ९४ | क्रांतीचा ओनामा | १३७ |
| ९५ | पऱ्यांचे गाणे | १३९ |
| ९६ | पुढे | १४० |
| ९७ | सासुरवास | १४१ |
| ९८ | परवाचा | १४२ |
| ९९ | बिचारा मामा | १४३ |
| १०० | दमयंतीचे गाणे | १४५ |
| १०१ | वादळ | १४६ |
| १०२ | विडा | १४७ |
| १०३ | दिवाळी | १४८ |
| १०४ | जनाबाईचे गाऱ्हाणे | १५० |
| १०५ | मुग्धा | १५१ |
| १०६ | तयार आम्ही | १५२ |
| १०७ | मोटवणावरले प्रियाराधन | १५३ |
| १०८ | सुनीता | १५४ |
| | परिशिष्ट | १६५ |


* * *

# १. शेतकरी * *

( सूर्यकांत )

आकाशाने अपुला डोळा नाहि अजुन उघडला
रामपहारी अशा पहा हा शेतकरी चालला
साखरझोपेमधी वेळ ही डोळे घोळायची
शेतकऱ्याची बरीच घाई शेतावर जायची
जाडीभरडी वाकळ दिसते याच्या खांद्यावर
बोलत अपुल्या बैलांसंगे चालतसे भरभर
दिसतो हा अंगाने राकट, रंगाने सावळा
कमरेला खालती विळा अन् वर गंधाचा टिळा
पिळदार किती या पायाच्या पोटऱ्या
अंगावर याने पेहरल्या लक्तऱ्या
हा खेड्यावरला आठमुठा नांगऱ्या
घाम गाळुनी भिजवुन खातो हा अपुली भाकरी
मिळेल त्याच्यामधे मानतो समाधान अंतरी

पोट घेउनी हातावरती किति करिती चाकरी
होउनिया लाचार किती हे फिरती रस्त्यावरी
थुंकी झेलुन भरती कोणी पोटाची खोंगळी
शेतकऱ्याने परी न दिधला स्वतंत्रतेचा बळी
असतिल याच्या पुढ्यात जेव्हा बैल आणि नांगर
धमक तयाची अशि की देइल उचकटुनी डोंगर
पीक काढतो बारमहा हा राबुन शेतावरी
तरी खायला कळणाकोंडा, चिंध्या अंगावरी !
ठेवलेस जर तू औत तुझे बाजुला
घेतलीस जर तू उसंत यंदा तुला
मग मिळेल जेव्हा कण न कुणा खायला

बसेल चिमटा, येइल तेव्हा सगळ्यांना समजुन
की देशाला तरणोपाय न शेतकऱ्यावाचुन !

घडोघडी बदलती रूप त्या मेघांचा भरवसा
आणि त्यांतल्या पाण्याचाही कुणी धरावा कसा !
शेतकऱ्याने वरती बघता होती ढवळेफिके
भिजलेल्या रानावर पडती कोसळून सारखे
सावकार सारखा तयावर नांगी उचलुन धरी
सौख्य निरागस चिरावयाला लावितसे कातरी
सरकाराच्या साऱ्याचा गळफास भोवती पडे
कर्जाच्या चिखलात गळ्यापर्यंत बिचारा बुडे
या हालअपेष्टा दिसंदीस काढुनी
बायकोमुलांसह हलाखीत राहुनी
जिव त्याच्या राहे गळ्यात खोळंबुनी
शेतकरी घालतो तुम्हांला हाक जीव तोडुनी
हात द्यायला तयास नाही पुढे येत का कुणी ?

२२ ऑगस्ट १९३१,
पुणतांबे

# २. कांदाभाकर * *

(सुनीत)

टेकाडावरुनी जरा सरकला मार्तंड उंचावरी
कोणी शेतकरी करी बसुनिया बांधावरी न्याहरी

ओढा बाजुस वाहतो खळखळा, वेढून त्याचा मळा
तेथे तोंड धुऊन स्वच्छ अपुले, आला भरोनी चुळा

ज्वारीची ढवळी सफेत अगदी जाडीजुडी भाकरी
गोळा तीवर तांबडा चटणीचा तो बाळसूर्यापरी

कांदा एक सुरेखसा बघुन तो फोडून धोंड्यावरी
देवाचे मग नाव घेउन तये केली सुरू न्याहरी

सारी भाकर संपल्यावर उठे देऊनिया ढेकर
प्याला तो मग ओंजळी घटघटा जाऊन ओढ्यावर

बैलांना चुचकारुनी मग धरी शेतामधे नांगर
कष्टांचा उचली मजेत अगदी डोक्यावरी डोंगर

पक्वान्नावर ताव मारुन कधी संतोष ना वाटला
ती जाडीभरडीच भाकर हवी खाण्यास आता मला

१४ डिसेंबर १९३२,
कोल्हापूर

# ३. कष्ट आणि विश्रांती * *

( सुनीत )

तापे ऐन दुपार ही रखरखी, येती उन्हाच्या झळचा
आंब्याच्या मधुनी क्वचीत हलती डोक्यावरी डाहळचा

सूर्याचे पडले किती कवडसे तोंडावरी रोखुनी
आहे शेतकरी तरी पहुडला झोपेमधे गुंगुनी

काळीभोर पहा कशी पसरली चोहीकडे ढेकळे
देई ताणुन अंग त्यांवर कसा हा मोकळेसाकळे

धोंडा एक उशास ठेवुन दिला, केली तयाची उशी
झोपेची तरि गच्च साखरमिठी याची सुटेना कशी !

सोडोनी पडदे हळूच पडतो आम्ही पलंगावरी
जाते रात्र सरून पार अरधी, डोळा न लागे तरी

गाद्या नी गिरद्या चिकार अगदी, स्प्रिंगाहि देती हुशी
टोले मोजित सारखी बदलितो डोळे मिटोनी कुशी

तो शेते पिकवी स्वतां निथळत्या घामामधे नाहुनी
आम्ही हुश्श करून घाम पुसतो पंखा करी घेउनी

११ डिसेंबर १९३२,
कोल्हापूर

# ४. गुराख्याचा पोर * *

( शार्दूलविक्रीडित )

होते पाणकळ्यातले दिवस ते, धुंदाळले अंबर
गेले आणिक ओघळून नुकते ते मोतियांचे सर

होती कातरवेळ, केविलपणे पाहे रवी खालती
मेघांच्या खिडकीतुनी किरण ते बाहेर डोकावती

बुंध्याला तरुच्या उगाच अपुला होतो उभा टेकुनी
त्याने वाचविले मला सकल तो मारा शिरी झेलुनी

पायांचे तळवे किती सुखविते ओलावली हिर्वळ
होती सांडत डाहळ्यांतुन शिरी मोतीफुले निर्मळ

झाली चिंब भिजून सृष्टि सगळी, पाणीच चोहीकडे
देवा, कल्पवरी असेच असु दे हे दृश्य डोळ्यांपुढे !

हुंबारून गुरे घरा परतली, त्यांच्या जिवाचा गडी
पावा मंजुळ वाजवीत उतरे शेजारची टेकडी

पाण्याला चुकवावयास इरले डोईवरी नेटके
त्याखाली पटकूर आणि कुडते अंगामधी फाटके

वेळूची मुरली मुखात धरली, खांद्यावरी कांबळ
काठी खेळतसे करी, नयन ते लोलंगती चंचळ

लंगोटी अपुली लहानच तया नेसावयाला बरी
बाल्यी लाभत जी नवी तरतरी अंगात खेळे पुरी

होते तांबुस कोवळे किरण ते अंगावरी नाचत
खेळे हास्य मुखावरी, झिरपते स्वर्गातले संगित !

गेला टेकडिच्या पल्याड निघुनी, ऐकू न ये बासरी
गेला सूर्यहि डोंगरापलिकडे, अंधारले अंबरी

गेले अभ्र विरून पार, गगनी झाली दिवेलागणी
आणी नंतर मी घरा परतलो तंद्रा मनी लागुनी

× × ×

तो गोपाळ लहान, ती वनगुरे, ते सृष्टिचे वैभव
गेला पुष्कळ काळ लोटुन तरी, अद्यापि ये आठव
आणी तो अलगूज मंजुळ घुमे अद्यापही अंतरी
चिंतेची हृदयास कांचण बसे, ती दूर सारी करी

२६ जून १९२८,
बेलापूर

# ५. खेडवळ फूल * *

(पांडव गझल)

केशराचे शिंपिले होते सडे पूर्वेकडे
कोंबडा शेजारच्या शेतामधोनी ओरडे

गारठा वाहे, निमाली मेघखंडे अंबरी
चोरकाटा हा थरारोनी उठे अंगावरी

पायवाटेने अशा वेळी पहा ती चालली
रानशेण्या वेचण्याला बालिका खेड्यातली

खेळताहे मोकळे हासू हिच्या गालांवरी
चोरट्या येती बटा भालावरी, त्या सावरी

शाम रंगाची फिकी तोंडावरी शोभे छवी
गोंदलेले गोजिरे हिरवे हनूला शोभवी

नेसली आहे जुनेरे, ही तऱ्हा खेड्यातली
चांदराती चांदणी अभ्रात अर्धी झाकली

चालताना गुणगुणे ही गातसे काहीतरी
भास होतो, नादवीतो की मुरारी बासरी

चालले राईमध्ये की कोकिलेचे कूजन ?
गर्द कुंजातून वायू की करीतो गुंजन ?

ही अवेळी तारका आली कशाला खालती ?
रानदेवी की निघाली ही फिराया भोवती ?

रम्यतेचे पीक आले काय देही सोज्वळ ?
चालले वोसंडूनी लावण्यगंगेचे जळ !

जंगलामाजी फुलावे फूल ऐसे आगळे
कोणता देवाजिचा हेतू असावा ना कळे !

२३ जून १९२८,
बेलापूर

# ६. गोंधळ * *

(सूर्यकांत)

उभा राहिला फड सरसावुन, थाप डफावर पडे
गावाबाहिर गोंधळ झाला सुरू देवळापुढे
प्रहर लोटली रात्र, चहुकडे टिपुर पडे चांदणे
झीलकऱ्याने सूर ओढला, तुइंतुइं करि तुणतुणे
कुणी कांबळी टाकुन बसले, कुणी राहिले खडे
सुमार ना गर्दीला, भवती पडले जंगी कडे
दिवटया फुरफुर करिती, बुधल्या तेल टाकती वर
पागोटया-पटक्यांचा दिसतो सभोवार सागर
हा दूर गावचा नामांकित ताफा जी
गोंधळी पुढे ये सरसावित साफा जी
कुणी म्हणे " पुरे गलबला, तयांना दापा जी ! "
हसतमुखाने करितो मुजरा वाकुन लोकांपुढे
" नमन गणाला आधी– " कडकड थाप डफावर पडे !

नमन संपले, सिंहगडाचा पोवाडा हो सुरू
गावकऱ्यांचा गलका शमला, तटस्थ झाले तरू
घुमू लागला डफ जोराने, सूर तयाचा चढे
शिवशाहीचे चित्र उभविले समोर नजरेपुढे
दिसू लागले बारा मावळ, दिसला हिरवा हुडा
उभार छातीवरचा दिसला डोणगिरीचा कडा
चढले नयनी रक्त, लागली रसवंती पाझरू
तानाजीचे खड्ग लागले विजेसारखे फिरू
जाहले मनाचे कान, गान ऐकाया जी
लागले अस्तन्या दंडांवर साराया जी
जाहले उताविळ गनीम ते हाणाया जी

गड झाला सर, पण तानाजी-सिंह कुठे तो लपे ?
सूर्याजीचा शोक ऐकता खळखळ गळती टिपे

पोवाडा संपला, थबकला, ‘ हुश्श ’ करी गोंधळी
लोक बोलती, “ तऱ्हा गायची याची लइ आगळी !
गोड गळा साखरी, उतरला वरतुन हा किन्नर ! ”
न्यहाल होऊनी लोक फेकिती नाणी अंगावर
‘ निजाम जिंकुन विजयी झाले खडर्याला पेशवे ’
उघडुन गंगाजळी गातसे पोवाडे नवनवे
रंगत गेला गोंधळ, उलटत रात्र पुढे चालली !
कसे रिकामे झाले, त्यांनी बूज बरी राखली !
        लोपल्या चांदण्या, विझल्या सर्व मशाली जी
        मावळे चंद्र, ठेविला तये डफ खाली जी
        पूर्वेस पसरली पानिपताची लाली जी
गोंधळ सरला, सरला कुठला ? एकच गोंधळ शिरी
सुन्न मनाने लोक परतले आपआपुल्या घरी !

२२ जानेवारी १९४३,
पुणे

# ७. माझे गाव * *

(चाल :– हरहर महादेव बोला–या गाण्यासारखी)

दूर दूर ते, नसेल ठाउक तुम्हांस त्याचे नाव
माझे ओबडधोबड गाव

पूर्व दिशेला सह्य गिरीचे पसरे रुंद पठार
धरुन कोपरा त्यावर वसले, खालाटीतिल माव
तिथे न जाई मोटरगाडी, तिथे न गेले रूळ
कशीबशी बैलांची गाडी धडकत घेई ठाव

कुठेहि फेका नजर, तुम्हांला दिसेल माळ उजाड
चुकून येती कधीमधी ढग, करिती मग शिडकाव
दिसतिल मधुनी उघडी शेते, माफक येई पीक
कुठे न हिरवेगार, तयाचा दिसेल पूर्ण अभाव

चिंच, कवठ ही तुरळक झाडे, चहूकडे निवडुंग
बाभुळ माजे दाट, बनी त्या कोण करी शिरकाव ?
गावकूस ते जुनाट, त्याला कुठे कुठे भगदाड
हनुमंताचे छोटे देऊळ देई मात्र उठाव

जवळुन वाहे ओढा, त्याला पाणी पाणकळ्यात
गावकऱ्यांना मचूळ पाणी पुरवी एकच बाव
पडकीझडकी, माळवधाची घरे विखुरली दाट
उघडी बाळे इकडे तिकडे करिती धावाधाव

ओरबाडिती झुडपे शेळया, करडे करिती नाच
उंच भिरकते घार, कावळे उगीच करिती काव
जरी न पुरते पोटालागी, जरी न झाके अंग
तरी दिलाने शोभुन दिसती गावकरी उमराव

करुन सारखे काम, डवडवा गाळुन अपुला घाम
पिकवावे शेतात, याविना दुजी न त्यांना हाव
कसेहि असले गाव, तरी ते माझे मजला प्यार
स्मरण तयाचे होता उठती हृदयी कोमल भाव !

ता. ११-१२-१९४३,
पुणें

# ८. गढी * *

(सुनीत)

गावाची शिव लागताच दिसते उंचावरी ती गढी
भिंती ढासळल्या, बुरूज खचले, ये खालती देवडी
कुत्रे पेंगत हे पडे, करितसे दिंडीपुढे राखण
जाऊ डावलुनी तयास पुढती, पाहू गढी आपण
जागोजाग रुजून रानझुडुपे फोफावली ही कशी
मातीच्या ढिगरांतुनी फिरकती उंदीर आणि घुशी
आढ्याच्या किलच्या सुटून पडती, माती भुईला गळे
पाकोळ्या भवती खुशाल फिरती, झेपावती वाघळे
होते राहत या गढीत इथले पाटील मातब्बर
पाठी वाकवुनी तयास मुजरे देती किती येस्कर !
होते वाजत येथ धांगधिडधा दिंडीमधे चौघडे
घोडे भीमथडी सुरेख, तगडे पागेत होते खडे

वैऱ्याला शह देत येथ भगवा झेंडा डुलावा, पण––
ती काठी दिसते, तिलाच मुजरा आता करू आपण !

२४ जानेवारी १९४३,
पुणे

# ९. सकाळ * *

( चाल–मशि बोलु नको रे गोविंदा )

चल गड्या, शिवारी जाऊ, बघ फुटले तांबडे !
किलबील पाखरे करिती
घरट्यांतुन बाहिर पडती
अंगणात करुनी कू कू आरवते कोंबडे

गोठ्यात गुरे हंबरती
नरनारी लगबग उठती
देवळात सनई वाजे, धडधडती चौघडे

कुणि दळिती रामपहारी
कुणि सडा शिंपिती दारी
कुणि ओढ्यावरती जाती शिरि घेवोनी घडे

चल जाऊ शेतावरती
करु राखण शाळूभवती
फिरवाया गोफणगुंडा मज भारी आवडे

मोटेवर गाउन गाणी
वावरात फिरवू पाणी
मग खाऊ भाकरकांदा अंथरुनी घोंगडे

हा पुढे निघाला पवळ्या
धावतो लगोलग ढवळ्या
भुंकणे पुरे कर मोत्या, चल आता हो पुढे !

५ जुलै १९४०,
पुणे

# १०. सांज * *

( चाल—कंगणिदार भर्जरी पिळाची )

( गुराख्यांची मुले संध्याकाळच्या वेळीं गावात परत जावयास निघाली आहेत. )

गाईसंगे खेळीमेळी रमलो रानात
दिवस बुडाला, चला गड्यांनो, जाऊ गावात

पुरे पावरी, पहा कशी ही करकरली सांज
शिवेपासल्या देवळामधे झणाणते झांज

कल कल, चिव चिव करित पाखरे शिरती घरट्यांत
घराघरांतुन अता सारतिल दिव्यामधे वात

उभारून शेपट्या, करोनी काने टवकार
घरास जाऊ म्हणती गाई देउन हुंबार

लक्ष वासरांकडे लागुनी झाल्या आतूर
'चक् चक्, हो हो' निघाल्याच या गाई चौखूर !

खुराखुरांनी गुरे उडविती धुरळा रस्त्यात
गळ्यांमोवती घुंगुरमाळा खुळखुळ करतात

वाकळ, काठी घेउन परतू, पडेल अंधार
घरी जाउनी गाइगुरांची काढू या धार

५ जुलै १९४०,
पुणे

# ११. जत्रा * *

चौदस चैत्राची
दूरदूरची गर्दी जमली, झिम्मड जत्रेची !

किती बैलगाड्या !
इकडे रंगित पटके, तिकडे बेरंगी साड्या

देउळ देवीचे
फुलले, भरले, सजले—घुमले सूर चौघड्याचे

तो बघ हलवाई
कापड, भांडी, खाउ, खेळणी—किती रोषणाई !

खेळ गारुड्याचा
घुमते पुंगी, त्या नादावर नाग डुलायाचा

दरवेशी नाचे
तालावर काठीच्या नाचे अस्वलही त्याचे

तिकडे कोल्हाटी
करितो कसरत, उडी मारतो सरसर कोलांटी

हा फड कुस्तीचा
लाल धुळीचा खेळ मजेचा, मनगट—मस्तीचा

ते फिरके फिरते
बसुन लाकडी घोड्यावरती गिरकू या पुरते

रोज रोज शाळा !
आणिक जत्रा वर्षामधुनी का एकाच वेळा ?

२४ सप्टेंबर १९४९,
पुणे

# १२. घरी * *

( चाल :–तुझ्या बालमुकुंदे )

जाईन कधी मी आता माझ्या घरी ?
स्वर्ग लाभला, तरि नको मला, घरचि न त्याला सरी

या शाळेसाठी अंतरलो मी घरा
सोडला घराचा मी माझ्या उंबरा
कंटाळुन गेलो या शहराला पुरा
हा जीव जाहला येथ टांगल्यापरी !

ते लहान खेडे दूर येथुनी अती
तो सुंदर ओढा खळखळतो भोवती
बाजूस लव्हाळी वाऱ्याने डोलती
जावयास तेथे मिळेल केव्हा तरी ?

त्या खेड्यामधले ते माझे झोपडे
तुळशीचे वृंदावन ते दारापुढे
ती परसामधली सुंदर झाडेझुडे
लटकली कारली कितीक वेलावरी !

आईच्या मांडीवर डोके टेकुन
गोडशी झोप मी कधी घेत जाइन ?
या इकडिल गोष्टी केव्हा तिज सांगिन ?
कधि बाबासंगे करीन मी न्याहरी ?

ताइच्या सवे कधि मिळेल खेळायला ?
चिडवीन कधी मी खोड्या करुनी तिला ?
घेउनी कडेवर लहानग्या भाउला
कधि घेइन त्याचे मुके खडीसाखरी ?

मी भटक्या मारिन केव्हा रानातुनी ?
कधि पाडिन चिंचा झाडावर जाउनी ?
डुंबेन केधवा ओढ्यावर चोरुनी ?
सुट्टिची पाहतो वाट पाखरापरी !

२७ ऑगस्ट १९२९
अकोले

# १३. मायघर * *

( मुद्रिका )

ते पहा गावचे कूस दिसतसे पुढे
परतलो किती दिवसांनी या माझ्या खेड्याकडे !

फुलरली पिके चहुकडे हरभरागहू
पाहुनी बाळपण सारे लागले मला आठवू

फिरकती किती पाखरे शिवारातुन
शिरशिरे हात फिरवाया भिरभीर पुन्हा गोफण

चरतात गुरे, वाजती मधुर घंटिका
धारोष्ण दूध गाईचे प्यावया जीव हो भुका

हा झरा अडखळे जरा ठेच लागुनी
काढले वालपण सारे मी याच्यातच डुंबुनी

निवडुंग पसरला पैस पाय पसरुन
वाटते लाल ही बोंडे खावीत पुन्हा चोरुन

चरतात मेंढरे तिथे उतरणीवरी
फिरवुनी भराभर बोटे मी घुमवू का बांसरी !

हे मारुतिचे देऊळ शिवेबाहिर
करुनिया नवस किती वेळा वाटली खडीसाखर !

हा हलतो, डुलतो इथे जुना पिंपळ
सुरपारंब्या खेळाया करितात पाय चळवळ

ही जुनाट शाळा दिसे अजुनही खडी
खाउनी छड्या शिकलो मी या इथेच बाराखडी

जसजसे लागलो शिकू पुढे नंतर
तसतसे लागले वाढू आमुच्यातले अंतर

दमछकी होतसे अता नौकरीमुळे
जन्मभूमिला भेटाया नाहीत पाय मोकळे

त्यातल्या त्यात कधिमधी लाभता सुटी
येतोच इथे भुरकाया भाकरीसवे आमटी

भेटतात गावातले जुने सोबती
बसुनीया करितो गोष्टी अम्हि शेकोटीभोवती

कुणि प्रेमाने बोलवी हुळा खावया
'या गुऱ्हाळ खाया दादा,' करितसे कुणि गयावया

जाईल भराभर अशी सुटी संपुनी
नौकरी मान पकडोनी नेईल परत ओढुनी !

२९ डिसेंबर १९३२
कोल्हापूर

# १४. खळ्यावर * *

( चाल : कंगणिदार भर्जरी पिळाची )

दिवस कासराभर आला वर, चला खळ्यावऽर
झुणकाभाकर खाउन लौकर व्हा रं तय्यार

शेतामंदी पीक अवंदा आलं सोन्याचं
ताटाला जनु लोंबु लागलं झुंबर मोत्यांचं

शिवारातला समदा उपटुन काढलाय् शाळू
पेंढ्या बांधुन गंज घातलं वावरात वाळू

कडब्याचा घातलाय् दुंडा खळ्याभोवताली
निऱ्ही ऱ्हायली पात जुपाची, मोडण बी झाली

करुनशान शेजरं घातली खळ्यावरी पेर
हंगामाच्या दिसामधी लइ व्हतो जीव जेर

चला गड्यांनो, बैल घेउनी जुपू आज पात
सवंसांजचं येतिल दाणं अपुल्या हातांत

तिवड्याभवती जवा बैल ह्यो फिरतिल गरगर
कणसांतुन मग भाइर येतिल दाणं भरभर

दोन पारचं बैल सोडुनी भाकर खाऊ या
सुटंल वारा तवा गड्यांनो, लागु वावडाया

मदानातला उडून जाइल मग समदा भूस
निख्खळ खाली राहिल ढवळी दाण्यांची रास

दिवस कासराभर आला वर, चला खळ्यावऽर
देवाजीचं नाव घेउनी चालू भरभर

८ ऑक्टोबर १९२९
अकोले

# १५. पाटलाची लेक * *

डोंगराच्या छातीवर – कड्यापाशी दाट झाडी
मधे घुंगट घेऊन – पहुडली दरेवाडी

दरेवाडीचा पाटील – जशी पोलादाची कांब
उंच कपाळाच्या खाली – दिसे डोळ्यांमधे तांब

दाट, राठ ओठांवरी – लोंबे मिशांचा झुंबका
बारा गाव, बारा शीव – त्याच्या नावाचा दबका

बारा नवसांनी झाली – बाळा पाटलाला लेक
अचपळ मुलुखाची – जशी बरचीची फेक

तळपते, फोफावते – वर चंदराची कोर
तशी दिसांमाशी वाढे – बाळा पाटलाची पोर

अंगापिंडाने दांडगा – जसा सागाचा सोडगा
चव्हाणांच्या पडळीत – आत्याबाईचा पोरगा

घर मोलाचं, तोलाचं – नाही* पदराचा वांधा
पोर झाली उफाड्याची – बाई, सोयरीक सांधा !

आलं सारं गणगोत – टिळा लाविला कपाळी
तीथ ठरे अष्टमीची – नेशिवली साडीचोळी

आलं थाटानं वऱ्हाड – काय तरी बाई तोरा !
घोडं किती दामटीशी – अरे चव्हाणाच्या पोरा !

खुंट केळीचे आणवा – बांधा आंब्याच्या डहाळ्या
बसे वऱ्हाड जेवाया – वाढा पुरणाच्या पोळ्या

---

* मराठा समाजात लग्न ठरविण्यापूर्वी दोन्ही घराण्यांचा कुठून तरी नात्याचा संबंध जुळावा लागतो. याला 'पदर जुळणे' अगर 'पदर लागणे' असे म्हणतात.

ताडताड वाजे ताशा – निघे सनईचा सूर
हळदीने पालटला – नव्या नवरीचा नूर
गाल नवरीचे झाले – लाल अक्षदा लागून
लेक बाळा पाटलांची – झाली चव्हाणांची सून
बाळा पाटलांनी केला – गावजेवणाचा थाट
वाढवाढुनी मोडले – गावकऱ्यांचे पेकाट
ताडताड वाजे ताशा – निघे सनईचा सूर
उरकून झालझेंडा – झाले पाटील निसूर
लेक लाडकी, लाडकी – माया दाटे उदरात
उसासून निरवली – चव्हाणांच्या पदरात !

ता. ९–२–१९४५
पुणे

# १६. शेतावर जाण्यापूर्वी * *

साद घालीतो कोंबडा – पेटे धगधग चूल
पाणी तापे सळसळ – धनी, उठा, भरा चूळ

माझ्या लाडक्या सोनीनं – दूध दिलं धन्यासाठी
फेस बाजूला सारीत्ये – लावा असा तांब्या ओठी

पाणी गरम काढलं – दिलं भरून घंगाळ
घडी धोतराची देत्ये – घ्यावी करून आंघूळ

डोळे फोडून निशीले – पाखडीले बक्षी गहू
भल्या पहाटी उठून – पीठ दळीलं म्या मऊ

तवा तापला, तापला – धनी, बसा पिढ्यावर
देत्ये भाजून चपाती – धार तुपाची घ्या वर

परड्यातली घोसाळी – केलं त्यांचं कोरड्यास
शेतावर जाण्याआधी – धनी, घ्या हो दोन घास

काम उरकून सारं – संगं आणीन शिदोरी
तसं नका जाऊ, थांबा – घ्या ही चिकणी सुपारी !

ता. १४ फेब्रुवारी १९४५
पुणे

# १७. सुगी * *

देवाचं देणं हे देवाचं देणं
सोन्याच्या ताटाला मोत्यांचं दाणं

पिकला शाळू परोपरी
चढली कणसं माथ्यावरी
पांखरं आली भिरीभिरी
गोफण फिरवू माच्यावरी
चला मर्दांनो, चला बायांनो, म्हणा गाणं, तुम्ही म्हणा गाणं ॥ १ ॥

सपसप फिरवू विळे, विळे
आडवे पाडू उभे मळे
घामाचा पाझर खाली गळे
सुकतिल पेंढचा उन्हामुळे
काम खुषीचं, येकामेकांचं, नगं नाणं अम्हां नगं नाणं ॥ २ ॥

मोडण झाली करून करून
घाणा खळ्याचा गेला भरून
पात जुपा रे बैलं धरून
फुटती कणसं फिरून फिरून
खळं दाण्याचं, तळं मोत्यांचं, लुटू वाण अम्ही लुटू वाण ॥ ३ ॥

सुटला वारा, आल्या झळा
वावडणीला लागू चला
टोपली भरून दे ग तिला
ढीग दाण्यांचा उंचावला
चंदी सालाची, किंमत मालाची करिल कोण ? अहो, करिल कोण ? ॥ ४ ॥

आनंदाचा दिवस खरा
धनधान्याची पूजा करा
पोती घेऊन भरा, भरा
वाजत गाजत नेऊ घरा
नाचगाण्याची संधी सोन्याची, म्हणा गाणं, अहो, म्हणा गाणं ॥ ५ ॥

१२ ऑक्टोबर १९५९
पुणे

# १८. गारोडी * *

डिंग डिंग डिंगी
आला गारोडी
बघा गारोडी
अंगापिंडानं
लाल डोळ्यांचा
उंच, धिप्पाड
डोईवरती
आला गारोडी

डिंग डिंग डिंगी
फुंकीत पुंगी
मोठ्या छातीचा
चिक्कण मातीचा
काळ्या रंगाचा
सोट सागाचा
फेटा नारिंगी
फुंकीत पुंगी

बाईल त्याची
काळी, कवळी
घट्ट कासोटा
बाईल त्याची

नवी नव्हाळी
शेंग चवळी
साडी दुटांगी
नांवाची रंगी

जंगलापाशी
काट्याकुट्यांची
मारी कुऱ्हाड
झाडाच्या शेंड्याचं
डिंकाचं गट्टू
ओखदी मुळ्या

वेडीवाकडी
त्यांची झोपडी
जंगल तोडी
मोहळ पाडी
झाडांचा पाला
करतो गोळा

बेत ठरला
दहा गारोडी
"चला धुंडाळू
चला गड्यांनो,
पुंगी, पोतडी
निघाले रानात

एका सकाळी
जमली टोळी
रानाचा गाभा
धरू नागोबा!"
घेऊन संगत
नाचत, रंगत

वाजती ढाळचा वाजे पाचोळा
हुकी घालतो ढोलीत कोल्हा

वडाच्या खाली वारूळ जंगी
लावी तोंडाला गारोडी पुंगी
पुंगी ऐकून बाहेर आला
फडा काढून डोलू लागला
लाल डोळ्यांचा दोन जिभांचा
फडेवरती छाप दहाचा

दोन गड्यांनी फासा टाकला
चपळाईनं नाग धरला
केला नागाचा गोल गुंढाळा
गात, नाचत आले घराला
वाट पहाते दारात रंगी
आला गारोडी फुंकीत पुंगी

त्याच रातीला फुस्स वाजलं
छातीत बाई धस्स जाहलं
त्याच नागाची आली नागीण
झेप टाकिते जशी वाघीण
डंख मारून पिढरी फोडी
किंचाळी मारीत उठे गारोडी
गेली पळून नव्हाळी नार
पिवळी धम्मक सोन्याची धार

" माझा गारोडी पाय झाडितो
देतो आँचके मान टाकितो
का रे गारोड्या असा झोपला ?
का रे माझ्याशी असा अबोला ?

का रे गारोड्या डोळे मिटले ?
तुझ्या रंगीचे ऊर फुटले "

शिक्यावरली उंच टोपली
खाली काढली केली मोकळी
"जा हो माघारी नागोबा देवा
तुमच्या राणीनं साधला दावा
हात जोडिते जंगलच्या देवा
माझा भर्तार माघारी द्यावा "

फुस्स करून साद घातली
आली नागीण मिठी मारली
मिठी सुटेना चढली गुंगी
कुठे ती पुंगी ? कुठे ती पुंगी ?

पुंगी घेऊन वाजवी रंगी
भरलं थरारा कापरं अंगी
मिठी सोडून उठे भुजंगी
तोंड लावलं डंखाच्या जागी
समदं जहर चोखुन घेतलं
कुंकू रंगीला देउन टाकलं
गेली निघून नागांची जोडी
"जागा झाला ग माझा गारोडी !"

नाचा गड्यांनो नाचते रंगी
नाचे गारोडी फुंकीत पुंगी

१७ ऑगस्ट १९५७
पुणे

# १९. जंगलचा कातकरी * *

शेताबिगर शेतकरी–जंगलचा कातकरी
देवाबिगर वारकरी–जंगलचा कातकरी
राघूवाणी चावा, खावा–कच्चापिक्का रानमेवा
पाणी पितो वढ्यावरी–जंगलचा कातकरी

घ्या कुऱ्हाड, झाड तोडा–खैराचा कात काढा
कंदमुळं परोपरी–भुईतुनी काढा वरी
जाऊ गड्या, शिकारीला–तीर लावा कामठीला
मांस खाऊन पोट भरी–जंगलचा कातकरी

काळचा माशा भणाणती–मोहोळाची कुणा भीती !
झेप घेतो मधावरी–जंगलचा कातकरी
धरतीचं अंथरूण–आभाळाचं पांघरूण
माथा टेकू धोंड्यावरी–झोप घेऊ घडीभरी

नगं सोनं, नगं चांदी–नगं मोती नाकामंदी
घालू फुलं कानांवरी–माळू फुलं माथ्यावरी
चाल चालू हरणाची–चपळाई वांदराची
लचकतो वेतापरी–जंगलचा कातकरी

वारा सुटे येड्यावाणी–थंड वाजे जीवघेणी
ऊन तापे डोईवरी–पर्वा त्याची कोण करी !
ढग आला आळाभोर–थैय्या थैय्या नाचे मोर
नाचे तसा कातकरी–ढोलकाच्या तालावरी
आज इथं फूलगावी–उंद्या तिथं सोनगावी
फिरतसे भिरिभिरी–वाऱ्यापरी कातकरी

२५ सप्टेंबर १९५८
पुणे

# २०. वाघ्या-मुरळी * *

येळकोट !

सदानंदाचा येळकोट !

आमची जेजुरी जेजुरी
समद्या जगात साजरी
नऊखऊ लाखांची पायरी
चढता भेटेल मल्हारी
आमुचा मल्हारी मल्हारी
उधळू भंडार सोनेरी

देखा मुरळीचा शिणगार, भाळी लाविला भंडार
झोक पिवळ्या पातळाचा, हाती घाटीचा झणकार
आली वाघोबाची स्वारी, गर्जे तोंडाने मल्हारी
दिमडीचा ठेका देतो खंडेरायाचा पुजारी
" अग मुरळे, इकडं ये ग "
" का रं वाघ्या, कशाला ? सांग "
" देवाम्होरं जाग्रण आता करायचं का नाय ग ? "
" करायचं करायचं–करायचं ! " हब् हब् हब्

लागला लो आंबे, लागला लो
हेगड्या लो तुझ्या बागड्या लो
वाईच्या गणपती, जाग्रणा ये
पुण्याच्या पर्वती, जाग्रणा ये
तुळजापूर भवानी, जाग्रणा ये
कोल्हापूर लक्षुमी, जाग्रणा ये
जेजुरीच्या खंडोबा, जाग्रणा ये
तेहतीस कोटी देवा, जाग्रणा या हब् हब् हब्

गाव होतं चंदनपूर, तिथं न्हातो एक धनगर
त्याच्या पोटी एक पोर, जशी चांदोबाची कोर
नाव तिचं बानूबाई, काय सांगू चपळाई !
अशी हुम्मा-फुगडी खेळे, मोर नाचे थुई थुई
आली पणामध्ये पोर, लागे धनगराला घोर
" कुठं शोधावा, शोधावा हिच्याजोगता भरतार ? "
बानू म्हणे, " मी गुलजार, नका बाबा, करू घोर
मला नेइल उचलून कुणी वाटेवरला चोर "
" माझी लेक गोरीगोरी नगं जाया चोरापोरी "
" माझं लगीन ठरलेलं, माझा भरतार मल्हारी "
तोडलं कर्दळीचं दळ, काढलं डोळ्यांतुन काजळ
लिवलं, " देवा, या हो या हो, माया केली का पातळ ?"
" जा रे घेऊन हे पत्तर, आण तू देवाचं उत्तर "
दिलं सोडून आभाळात राजबन्सी कबूत्तर हव् हव् हव् हव्

पावलं पत्र देवाला
म्हाळसेशी झगडा केला
थेट चंदनपुरला आला
बानू पाहून येडा झाला
वेष धनगराचा त्याला
म्हणे, " नोकरी द्या हो मला "
दुनियेचा पालनवाला
प्रेमापायी नोकर झाला हव् हव् हव्

झाला खंडेराया सुन्न बानुबिगर घेइना अन्न
म्हणे, " बानू, होई प्रसन्न, लाव माझ्यासंगं लग्न "
बोले बानू, " रे रडतोंड्या, जा, चार ईळभर मेंढ्या
माझा ठरलेला भरतार, देव जेजुरीचा खंड्या !"
हव् हव् हव् हव्

देव साक्षात् प्रगटला
सौशय बानूचा फिटला
लोकरिच्या घातल्या माळा
झाला लग्नाचा सोहळा
घातली घोड्यावर नवरिला
देव आला जेजूरिला हब् हब् हब्

हाती घेऊन पंचारती आली म्हाळसा सामोरी
पाहून तरण्या बानाइला घाव बैसला जिव्हारी
दिली फेकून पंचारती, आली रागाची शिरशिरी
म्हणे, "एका म्यानी सांगा दोन कैशा समशेरी ?"

जुंपे सवतींचं भांडण, झाली बानाईची दैना
देव आंजारी गोंजारी, कोणी ऐकेना, ऐकेना
दिला अर्धा डोंगर हिला, दिला अर्धा डोंगर तिला
माथ्यावरल्या देवळात देव एकटा राहिला !
हब् हब् हब हब्

२३ ऑगस्ट १९५९
पुणे

# २१. कोळयांचे गाणे * *

दरीयाच्या शेतामंदी आपसुक माल पिकतो ॥ ध्रु० ॥

आमी कोळी खेळीमेळी पाण्यात होडी सोडतो
शिडात वारा भरला खारा, सपसप वल्ही मारतो
कापित पाणी, चालली राणी, फेसाला भांग फुटतो
पाण्यामंदी चमचम चांदी, आमी जाळं टाकितो

चढती लाटा बारा वाटा, झोका होडीला बसतो
सुटला वारा, करतो मारा, धसका उरात बसतो
देवाजीची किर्पा भारी, जाळं हळूच ओढतो
बांगडा, झिंगा, मरळ, सुरंगा, मासा मस्ताड गावतो

चल गो गोमू, चल गो सोमू, ओढा घरचा लागतो
चालली होडी, पाणी तोडी, सपसप वल्ही मारतो
अल्याड खाडी, पल्याड वाडी, शेंडा माडाचा डुलतो
चला मागारी, जाऊ बाजारी, पैका पदरी पडतो

आमी कोळी चंदरमौळी झापामंदी नांदतो
साडी हिरवी, चोळी हिरवी, वेणी फुलांची माळतो
ओली रेती चमचम करती, चंदा वरती चढतो
चल गो रंगू, चल गो गंगू, ढोलकवाला घुमतो

चल गो नाचू, रेती चेचू, दरिया हमेष नाचतो
घ्या गो गिरकी, मारा फिरकी, नाचाला रंग चढतो !

ता. १४ सप्टेंबर १९५७
पुणे

# २२. गरिबीचा संसार * *

( चाल :—तू टाक चिरुन ही मान )

चल व्हतीस का तैयार ?
करू सौंसार

ही औट बिघ्यांची शेती
जरि भरति न कणग्यापोती
तरि अपुल्या पोटापुरती
बघ जमिन कशी ही काजळापरी दिसती काळीशार !

चरतात बैल हे चाऱ्ही
कामाला अवखळ भारी
घे बघुन गुरं ही सारी
तूं सांजसकाळी काढित जा गं या पवळीची धार

हे माझे झाप कुडाचे
वर छप्पर सरमाडाचे
कवडसे पडति दिवसाचे
पर यातच येती झोप सुखाची, हे माझे घरदार

ही मडक्यांची उतरंड
तिन दगडांचे चुलखंड
सौसार नीट हा मांड
मग तुझ्या हातच्या सैपाकाला झकास चव येणार !

झोपण्यास खाट न मजला
ही वाकळ हंतरायाला
काही न पांघरायाला
पर घट्ट मिठीच्या उबाऱ्यामधी हीव कसं शिरणार !

हौस तुझी पुरवायाला
करिन मी जिवाचा काला
द्यायचो न तकलिफ तुजला
या दणगट माझ्या छातीवर तू टाक रेलुनी भार !

मी भणंग न्हाई अगदी
धनदौलत माझी नगदी
घेतलीस पाहुन समदी
मग हुकुम द्यायला मालकीण तू सांग कवा होणार ?

१८ सप्टेंबर १९३१
पुणतांबे

# २३. लक्षुमी * *

( मुद्रिका )

हे गच्च दाटलं पीक वावरामधी
फुलवरा असा कणसांना तरतरला नव्हता कधी

हंतरली भुइवर जशी हरळ लसलशी
जोगुनी डुबकण्या घेती खाचरात गाईम्हशी

लागला फुटू जोसात गहू-हरभरा
हा मुबलक दाणागोटा सरणार न वरसाभरा

करवलिचा धरुनी हात मारगेसरी
चढलीस घराची माझ्या तू प्रेमानं पायरी

उंबऱ्यावरी तू पाय टाकल्यावर
साजरं गोजरं सारं लागलं दिसाया घर

उतरला जवा विहिरीत तुझा पोहरा
लगि तुडुंब भरलं पाणी, लागतो निमा कासरा !

शेतात हळदिचा हात खपू लागला
लागलीच त्याला आली सोन्याची पिवळी कळा

मातीत तुझ्या अंगची टिपं ठिबकली
ही कणसं बघ मोत्यांच्या ओझ्यानं भारावली

तूं आल्यापुन काइबी न पडलं कमी
संपलं दळिदर माझं, उतरली घरी लक्षुमी !

ता. २ डिसेंबर १९३२
कोल्हापूर

# २४. मोटेवरलं गाणं * *

( केशवकरणी )

दिवस तापतो डोईवरती अगिन पाखडीतसे
शेत हे जसे तापले शिसे

वारा पडला, निऱ्ही चालली अंगाची काहिली
समदी पैरण घामेजली

इरभळ मोटा वढूनशानी बैल टाकती कसे
उसासे भरभर भाते जसे

ही मोट अली वर, खेचूद्या सौंदर
मग भरंल सारं थारोळं भरभर
दंडांतुन पाणी जाइल सर सर सर

भरत चाललं वाफं, आतां लइ थोडं ऱ्हायलं
गड्यांनो, उचला तर पावलं !

साफ नांगरुन शेत त्यावरी औतही चालीवलं
जोंधळं मगशानी पेरलं

साबरफणिचं काटंकुंपण सभोवार घातलं
कुठं तर केकताड वाढलं

होता कोंबडसाद घालतो बैलांना दावण
चालते मोट तवापासुन

असं होता येतिल कोंब कोवळं वरी
पोपटी दिसल मग शेत पाचुचं परी
कोळपून करु या तण गवताचं दुरी

लहडतील ताटांना कणसं मग शाळूची जवा
देऊ देवाजीला दुवा !

घेउन गोफण करील राखण बसून माच्यावरी
आमची पोर लाडकी सरी

निंदुन टाकील समदी हरळी टहाळवंब्यांतली
जिवाची धनीण माझ्या भली

अन् सोन्यापवळ्या हो, आपण असंच पाणी भरू
मशागत उभ्या पिकाची करू

या इकडं हिरवं शिवार सळसळ करी
त्या तकडं वंबी कवळं दाणं धरी
कलतील जराशी उनं अशा औसरी

येतिल हुरडा खायाला मग खेड्यातिल सोबती
बसतिल चिंचेच्या खालती

मगरं पेटवुन कणसं भाजू, लागल हुरडा किती
खरपुस चटणीच्या संगती !

तुम्हांलागुनी खाया देइन बरका ठेउन सई
मायंदळ ताटं गुळचट लई

पल्याड माचीवरून आली हाक कुणाची पण—
शिदोरी शिरी कारभारिण !

शिवळाट उतरतो खांद्यांवरचं अता
पाजतो पलिकडं पाणि पाट वाहता
या हिरव्या कुरणी चरा, जिवाला जता

जातो आता, भूक लागली, दोन घास जेवतो
तिच्याशी गोड शब्द बोलतो !

६ नोव्हेंबर १९२७
नेवासे

# २५. आंब्याच्या झाडाखाली * *

( केशवकरणी )

दुपार आली ऐन भराला, कहर उन्हाचा करी
कशाला जातिस आता घरी ?

भाकर घेउन येताना तुज बघून माचीवरी
उतरलं शिवाळ मी लौकरी
आलीस थेट तू या इठवर लांबुन
हे तोंड जाहलं लाल ऊन घेउन
हा ऊर खालवर होय धाप लागुन
असतिल आले फोड तरारुन नाजुक पायांवरी
कशाला जातिस आता घरी ?

मोटवणावर बसून सोडू अणिलेली भाकरी
त्यातलं दोन घास घे तरी
बावरून ऐशी नकोस मागं फिरू
चल येकाम्होरी बसून जेवण करू
या इठं पघाया न्हाई चिटपाखरू
नंतर पाणी पिण्यास जाऊ पल्याड ओढ्यावरी
कशाला जातिस आता घरी ?

तुझ्या हातचं, तुझ्याच संगं जेवण झाल्यावरी
यायची झोपेची शिरशिरी
त्या आंब्याखाली चल माझ्यासंगती
मउमऊ हरळ ती झोपण्यास खालती
सांडते सावली थंडगार भोवती
करील राखण, मोत्या भुंकुन आल्यागेल्यावरी
कशाला जातिस आता घरी ?

३१ मे १९३४
नेवासे

# २६. गरिबीचा पाहुणचार ★ ★

( मुद्रिका )

या बसा पाव्हनं असं, रामराम घ्या !
कोनच्या तुम्ही गावाचं ? गाठुडं तिथं राहुद्या !

घोंगडी टाकली इथं, बसा तीवर
अनमान करु नका आता, हे समजा अपुलं घर

वाढूळ चालता जनू, लई भागला
हे पगा, काढलय् पाणी, आंघूळ कराया चला

आटपा बिगीनं जरा, ताट वाढलं
पाव्हनं, चला या आता, हे पगा पिढं टाकलं

वाढली पगा ज्वारिची जाड भाकरी
निचितीनं जेवा आता, जायचं न शेतावरी

लइ सुगरण मपली बरं कारभारिण
किती अपरुक झालं हाये हे कांद्याचं बेसन !

लसणीची चटणी उजून पगा वाढली
ती मधून तोंडी लावा, लागती तिखट चांगली !

चापून आतां होउ द्या, करु नका कमी
मीठभाकरी गरिबाची घ्या गोड करोनी तुम्ही

इक्त्यात कसं उरकलं ? हे नव्हं खरं
आनकी एक चतकोरा घ्यायला पाहिजे बरं !

का राव, हात राखुनी असं जेवता ?
ए अग ऽ वाढ की त्यांना, हां ब्येस जाहलं अता !

हो, झालंच आता, उठा, चला भाइर
घ्या हातावरती पाणी नी बसा पथारीवर

पाव्हनं, नीट भिंतिला बसा टेकुनी
हे खांड घ्या सुपारीचं, द्या तोंडामदि टाकुनी

ही भरली चिलमीमदी तमाखू अहा
पेटली कशी पण नामी, झुरका तर घेउन पहा !

जायचं काय म्हंगता ? झोप घ्या जरा
जाताल उद्या, का घाई ? छे, बेत नव्हं हा बरा

भारीच तुम्ही हे बुवा, जायचंच का ?
तारीख चालली वाया, गरिबाचं ऐकू नका

शेवटी निघालात ना ? जपूनीच जा
गरिबाची ओळख ठेवा, या बरं, रामराम घ्या !

७ ऑक्टोबर १९२८
अकोले

# २७. घरधनी * *

( केशवकरणी )

झांजड पडली, दिवस चालला घराकडं परतुनी
येइना अजुन कसा घरधनी ?

वावरातलं दिलं माळवं काढुन पाटीभर
घेउनी गेला डोईवर

वर चढला होता दिवस कासराभर
गेलाय् खाउनी तसा शिळी भाकर
माळवं आपलं वपुन टाकल्यावर
येइल त्याची आठ दिसांची मिठमीरची घेउनी
येइना अजुन कसा घरधनी ?

काम टाकलं उरकुन सारं दोनपारपोतुर
खायला उठलं नंतर घर

या जोगुनी आल्या गाई रानातुन
टळटळीत झाली बघा दिवेलागण
केधूळ उभी मी राहू खोळंबुन ?
बाजाराचे लोक घरोघर आले ना परतुनी
येइना अजुन कसा घरधनी ?

डोईवरती वझं घेउनी लांब जायचं किती
ऊन वर, फुंफाटा खालती !

येईल घरधनी भुकेजून तेथुन
जेवण्यास त्याला दुधभाकर वाढिन
मग देइन कांबळ खाटेवर टाकुन
दूर करिन मी शीण तिकडचा हातपाय चेपुनी
येइना अजुनी कसा घरधनी ?

७ एप्रिल १९३२
घोडनदी

# २८. नदीपल्याड ★ ★

नदिपल्याड गं—झुले कुणाचा पटका ?
लावितो जिवाला चटका

नदिपल्याड गं—कोण घालितो शीळ ?
देतसे मिशीला पीळ

नदिपल्याड गं—कोण मारितो चकरा ?
किति करशिल बाई नखरा !

नदिपल्याड गं—वीर गडी ये खासा
जिव होई तोळाभासा

नदिपल्याड गं—बसला राघू गहिना
ही मळचात लपली मैना

नदिपल्याड गं—पान नागवेलीचे
ते पान या सुपारीचे !

ता. १०-२-१९४४
पुणे

# २९. तुझ्याबिगर * *

( चाल : मला मुंबईला जायचं )

आक्षि येड्यावाणी
तुझ्याबिगर झालो गं राणी
राहुन राहुन लई
तुझि होती सई
जिव झाला गडे किलवाणी
जातो शेतावर
काम व्हयना पर
तुटेना गं डोळ्याचं पाणी
अता चटणीभाकर
कोण तुझ्याबिगर
येइल शेतात घेऊनशानी ?
शेतावरून जवा
घरि यावं तवा
कोण म्हणून दाविल गाणी ?
गोड गोड बोलुन
शीणभाग हरुन
टाकायला न्हाई गं कोणी
तुझ्याबिगर तण
सांग निंदिल कोण ?
झालि पिकाची गं धुळधाणी !
जिव पस्तावला
कारभारणी, तुला
अगं, माहेरि धाडुनशानी !

१७ सप्टेंबर १९२९
अकोले

# ३०. पावसा ! * *

( अङ्कूर )

ही भुई कशी ठाक कोरडी पडली
    पावसा, उतर ना खाली !
हा पाणकळा सरुन चालला सारा
    नगं जाउ असा परभारा
का राग असा गरिबावरती केला ?
    जिकिरीस जीव हा आला
  भिजवली गुदस्ता वाडी
  पर कसूर केलिस थोडी
  न्हायली न वैरणकाडी
कशि जनावरं जगतिल पेस्तर साली ?
    पावसा, उतर ना खाली !
का शिपकारा निसता मारुन जाशी ?
    ठेविसी अम्हांस उपाशी
जर यंदा बी पुरं न पडलं पाणी
    सावकार लादिल गोणी
  लावून हात कर्माला
  मग रोजगार करण्याला
  लागल जावं ममईला
न्हाईल इठं एकलीच घरवाली
    पावसा, उतर ना खाली !

३१ ऑगस्ट १९३१
पुणतांबे

# ३१. जात्यावरलं गाणं * *

( ओवी )

झुंजूमुंजू झालं, सुकदेव वर आला
पहाटचं वारं कसं झोंबतं अंगाला
परसात माझ्या आरवतंय कोंबडं
लई वक्त झाला, आता फुटंल तांबडं
केधुळ वढत्ये बाई जातं घरघर
पारुस गं काम माझं पळ्डं घरभर

देवळीत जळे पणती गं मिणमीण
भळभळ गळे पीठ कसं जात्यातून
अवंदाचं साल न्हाई आलं पीकपाणी
दूरदेशी गेला बाई माझा घरधनी
दूरदेशी गेला मला एकली टाकून
तिठं न्हाई त्येला जीव लावायला कोण

राया, डोळ्यामंदी तुझ्या मोतीयाचं पाणी
राया, तुझा रंग जवसाच्या फुलावाणी
तुझ्या डोईवर अक्षी पागूटं कुसुंबी
तुझं वठ बाई जशी फुलली दाळिंबी
राया, तुझं दात जसं धुतलं तांदूळ
तुझ्यासाठी मला जणू भरलंया खूळ
तुझ्या बिगर रे, मला घासही जाईना
तुझ्या बिगर रे, मला पाणीही घोटंना
तुला आवडतो हुळा भुजून ठीवला
कसं करूं बाई, सम्दा वाळून चालला

कवाशीक याल माझ्या कुडीतल्या जीवा ?
कवाशीक याल माझ्या देवाच्या बी देवा ?

१७ ऑक्टोबर १९२८
अकोले

# ३२. सावकारी पाश * *

( सारंगीवाला )

गरिबांच्या पालनकर्त्या देवा, लौकर धाउन येई !

संपला संसार सारा
नाहि कोणाचा निवारा
या अफाट दुनियेच्या पाठीवर मजला कोणिच नाही

ना मिळे खायास रोटी
पेटला अंगार पोटी
लोंबतात चिंध्या अंगावरती, डोळे उघडुन पाही

छान काळीभोर शेती
मालकी माझीच होती
या इकडे खळखळ ओढा वाहे, तिकडे आंबेराई !

राहण्याला चंद्रमौळी
झोपडी होती निराळी
वर्षाचा दाणागोटा होती पुरवित काळी आई

शेत, घर, संसार, गोते
सर्व काही ठीक होते
बेचिराख झाले सगळे देवा, सावकारिच्या पायी

पीक नव्हते एक साली
पावसाने पाठ केली
उंबरठा चढलो मग वाण्याचा, आणिले पैसे काही

पीक आले पुढिल साली
त्याच वेळी फेड केली
ते खंडोगणती दाणे देउन केली मी भरपाई

पण कळेना काय झाले
सावकारी दूत आले
नशिबाचे चक्कर फिरले, सरली वडिलांची पुण्याई

शेत गेले, घरहि गेले
सर्व काही जप्त झाले
ती जोडी खिल्लारी बैलांची आणिक दुभत्या गाई

वाणिदादा, तू अम्हांला
लाविले देशोधडीला
मज भणंग केले रस्त्यावरला, खाण्याची टंचाई !

का अम्हांला ठोकरीले ?
सांग आम्ही काय केले ?
का भरल्या संसाराचे केले तुकडे राई राई ?

मी कशाला शाप देऊ ?
रे तुझे कल्याण होऊ
संसार तुझा सोन्याचा दादा, राखो अंबाबाई !

३० ऑक्टोबर १९२८
अकोले

# ३३. मजूर * *

( राजहंस )

तांबडेहि फुटले नव्हते जुंपलो तोंच कामाला
पळ उसंत नाहि मिळाली माथ्यावर दिवसहि आला
मातीच्या वाहुन पाट्या मानेचा काटा ढळला

नाही भाकर पोटाला
पाणीहि नसे प्यायाला
व्याकूळ जीव हा झाला

पोटाला पडला ताण—डोळ्यांत साचले प्राण !

हे जिणे असे मजुरांचे बैलावाणी राबावे
लागता भूक पोटाला मातीचे घास गिळावे
कंठाला कोरड पडता अश्रूंचे पाणी प्यावे

सारखे उन्हातान्हात
राबणे असे नशिबात
मग झाल्यावरती रात

मातीत अंग टाकावे—गारठ्यामध्ये झोपावे

कुचराई काही नसता बोलणी तडातड मिळती
पेकटात बसती लाथा चाबूक फडाफड उडती
लागून उन्हाच्या झळया रक्ताचे ओघळ सुकती

पोटाची वितभर खाच
भरण्या अर्धामुर्धीच
हा गुलामगिरिचा जाच

लागतो अंम्हा भोगावा—सोडीव यातुनी देवा !

झोपडी पडाया झाली		मोडकी शेरवाशांची
छे, भांडीकुंडी कुठली !	उतरंड आत मडक्यांची
कोपऱ्यात लाकुडफाटा	ती चूल तीन दगडांची

मालकीण माझी गोड
तळहातावरला फोड
प्रेमाला नव्हती जोड

पण हाय, कोपला देव—आडवे पडे दुर्दैव !

संसार असा गरिबीचा	चालविता शिणुनी गेली
सारखी राबराबून		ती अंथरुणाला खिळली
त्यात पिते अंगावरती	लाडकी बाळ सोनुकली

आणुनिया औषधपाणी
वाचेल जिवाची राणी
पण ढीग डोंगरवाणी

उचलून टाकले पार—तर मिळतील दिडक्या चार !

एक पसाभरही दाणे	गाडग्यात शिल्लक नाही
अब्रू झाकाया पुरते	अंगावर चिरगुट नाही
तान्हुली भुकेजे, तिजला	वाटीभर दूधहि नाही

चालवू कसा संसार ?
रातंदिस चिंता फार
जाहलो अती बेजार

हा जीव कसा कंठावा ?—सोडीव यातुनी देवा !

२७ ऑगस्ट १९२८
अकोले

# ३४. भिकारीण * *

(अक्रूर)

मज दीनेची कीव येउ द्या काही
घाला हो भिक्षा माई !

हे ऊन किती कडक तापते बाई
अंगाची फुटते लाही

या तीन दिसांपासुन खाया काही
शीतही मिळाले नाही

मी कितीतरी फिरले दारोदार
घेउनी कडेवर पोर

कंठात गुंतले प्राण
जाहला जीव हैराण
भीक मागण्याला त्राण

काहीच बरे आता उरले नाही
घाला हो भिक्षा माई !

ज्या दिवशी हे कुंकू माझे पुसले
मज अभाळ उघडे पडले

दो महिन्यांचे सवे घेउनी बाळ
वणवणले रानोमाळ

मी आजवरी वाचविले बाळाला
चिंचेचा खाउन पाला

पण अता फुटेना पान्हा
वाचवा लाडका तान्हा
देखवे न याची दैना

तिळतीळ तुटे माझे काळिज बाई
घाला हो भिक्षा माई !

दो दिवसांचा शिळा वाळला तुकडा
चालेल अम्हांला वाढा

तो चाउनिया बाळाला भरवीन
मांडीवर मग निजवीन

का माई हो, अशा लाविता दार ?
नाहि मी पुन्हा येणार

बाळा, चल, पुढती जाऊ
केविलवाणे नच पाहू
हा मुकाच घे तुज खाऊ

चल, भीक अता आपण मागायाला
देवाच्या जाउ घराला !

६ ऑगस्ट १९२८
अकोले

# ३५. मूठभर दाणे * *

(चाल :- संशय का मनि आला ? )

घाला मुठभर दाणे !

सणवाराला दार उजवितो आंब्याच्या ढगळीने
रोज झाडते अंगणओटा घरवाली नेमाने
टाकित असतो तुमच्या येथे केरसुणी महिन्याने
आडाला कासरा हवा तर देतो मी निकडीने
चिंध्यापांध्या द्या मज, फिरतो मी उघडया अंगाने
गोडधोड जर केले तर मज ठेवा उष्टी पाने
शिळा नि पाका भाकरतुकडा फेकु नका रस्त्याने
कुटक्यासाठी कच्चीबच्ची बघती केविलवाणे
नका थांबवू रखडत मजला, भुजती पाय उन्हाने
भले करिल देवाजी तुमचे, टाका दुरुनी दाणे !

११ सप्टेंबर १९३१
पुणतांबे

# ३६. कपिलेचे गाणे * *

सांज पांगली—दाटे अंधार
कपिले, तुझी—काढित्ये धार
कुंदा, हरळी—आणिला भारा
हिरवागार—टाकिला चारा
प्याले ओढून—तुझे वासरू
भुके राहिले—माझे लेकरू
नको कपिले—आखडू पान्हा
उभा राहिला—पाठीशी तान्हा
चांदीच्या तारा—रुप्याच्या तारा
आचळातून—झरू दे धारा
फेसाळलेले—दूध पांढरे
अमृताने गं—चरवी भरे !

ता. ४-७-१९४४
पुणे

# ३७. साक्षरतेचे गाणे * *

( चाल :– हरहर महादेव बोला )

जमलो आपण खेडुत सारे, चला शिकू, गाऊ
आपण सगळेजण भाऊ !

दूरगावचा कागद आला, येइ न वाचाया
लाज वाटुनी बेत ठरविला की साक्षर होऊ

जरी लागले केस पिकाया, जरी हालते मान
तरि गिरवु या पाटीवरती गऽ मऽ भऽ आ ऊ

कुणीहि यावे, फसवुनि जावे, गत ऐशी झाली
विचार ठरला, आता आपण अडाणी न राहू

शेत कुणाचे गेले, गेले घरही कोणाचे
मुले उपाशी राहु लागली, हे कुठवर साहू ?

पुराणपोथी सांगे कोणी, परंतु समजेना
उघडू आपण हे रामायण, वाचुन तर पाहू

एकमताने झटून आपण वाचू आणि लिहू
हात जोडुनी देवाजीला शिकलेले वाहू !

९ नोव्हेंबर १९४८
पुणे

# ३८. गोंडांचे गाणे * *

ओबड धोबड, भंगार काळी
आली रे आली गोंडांची टोळी ॥ ध्रु० ॥

विंध्य डोंगराची रांग उंचाडी
पहाड, दऱ्या, जंगल झाडी
राजपुतांची पांगली वस्ती
त्यांच्या कुळाची गोंडांना मस्ती
मराठी वाणी बोली गोंडाळी
आली रे आली गोंडांची टोळी

रानात पिकती पांढरे ससे
खायाला मऊ रेशीम जसे
होले, तित्तर, उंदीर, घुशी
चवीला गोड साखर जशी
तोंडी लावाया मधाची पोळी
आली रे आली गोंडांची टोळी

शेतीचा घाणा पिकतो दाणा
येतो कटाळा लई कुटाणा
घ्या रे हातात छिन्नी, हातोडा
घडवा उखळ पत्थर फोडा
पाटा, वरोटा जात्याची पाळी
आली रे आली गोंडांची टोळी

हातात पेलू कुराड, वेळू
चला गड्यांनो, शिकार खेळू
जंगलपट्टीत मारू चक्कर

घळीत लपला जंगी डुक्कर
वाजवा टाळ्या ठोका आरोळी
आली रे आली गोंडांची टोळी

सप्पाटा सुळा मापाला खंडी
बघा तो चिडून मारी मुसंडी
जाड खोडाला दिली टक्कर
झाड पाडून आलं डुक्कर
मारा कुराडी भाल्याच्या फाळी
आली रे आली गोंडांची टोळी

किर्पा झाली रे दुल्हा देवाची
झाली बेगमी आठ दिसांची
विस्तू पेटवा भाजा डुक्कर
चवीला मस्त जसं खोबरं
बायांना, पोरांना मारा रे हाळी
आली रे आली गोंडांची टोळी

आज शिमगा सण वर्साचा
खाण्याचा, पिण्याचा, नाचगाण्याचा
मुखिया दादा वस्तीचा राजा
दादा, करा हो होळीची पूजा
दाखवा निवद पुर्णाची पोळी
आली रे आली गोंडांची टोळी

२९-१-१९६५
पुणे

# ३९. शिलंगण * *

शिलंगणाला चला
गड्यांनो, शिलंगणाला चला

गाव सोडुनी, शीव सोडुनी, शिलंगणाला चला

थंडी कवळी आली जवळी, पाणकळा संपला
भात डोलतो, तीळ नाचतो, चढला वर जोंधळा
नवरात्रीचा सण खात्रीचा, दीप जळत ठेवला
मातीवरती घट पाण्याचा पाझरता राहिला
दुर्गा चिडली, भिडली, लढली, महिषासुर मारिला
तिच्या कृपेने पृथ्वीचा हा गोल फिरत राहिला
दर दिवसाला चढती माळा, नवधान्याचा मळा
नवव्या दिवशी पूजा करुनी तुरा शिरी खोविला
सरली सुस्ती, चढली मस्ती, मुलुखगिरीला चला
ढाल पाठिला, फाळ काठिला, कमरेला चंचला
टाच मारुनी घोड्यावरती निघे वीर मावळा
वारा सुटतो, फडफड उडतो, पटक्याचा शेमला
म्हणतो दसरा, घरास विसरा, विसरा घरवालिला
ध्यानी आणा, शिपाई बाणा, गनीम जिंकू चला !
हिरवे सोने, पिवळे सोने, लुटून आणायला
चला गड्यांनो, चला मुलांनो, शिलंगणाला चला
सण शूरांचा, सण वीरांचा, सण अगदी वेगळा
नाचनाचुनी करू साजरा दसऱ्याचा सोहळा !

ता. ९-९-१९६१
पुणे

# ४०. भिल्लांचे जग * *

मोराचं पीस माझ्या केसांमधी
भिल्लांची जात आमची साधीसुधी– जात साधीसुधी

ऊन खातो, ऊन पितो
सूर्या आग पाखडतो
भाजभाजुन रंग झाला काळा उदी– रंग काळा उदी

गाव नको, शीव नको
छाया नको, झाप नको
ठाव ठेवू डोंगराच्या पोटामधी– वस्ती गुहेमधी

जंगलात खाऊ चला
बिब्बा फुला, मोह फुला
रानमेवा शबरीचा खाऊ कधी– बोरं खाऊ कधी

काळारोम बाण्या गडी
कंबरेला बांधी घडी
बाईबापडीची साडी साधीसुधी– साडी साधीसुधी

दागिन्यांचा सोस खुळा
गोठ हाती, पोत गळा
चांदीची चमकते हाती मुदी– माझ्या हाती मुदी

ढाण्या वाघ ढोर मारी
रगत पिऊन न्हयारी करी
भाल्याची फेक करू म्होरं सिधी– फेक म्होरं सिधी

हाका घालू, रान उठे
कामठीचा तीर सुटे
डरंकाळी जिरे त्याच्या तोंडामधी— तीर तोंडामधी

देव आमचा भोळाखुळा
नागफणी शोभे गळा
माथ्यावर धार धरी गंगा नदी— अहो गंगा नदी

भिल्लिणीचा वेष धरी
शंकराला खूष करी
चाळ वाजे गवरीच्या पायांमधी— वाजे पायांमधी

पाणकळा जोर करी
मोर निळा फेर धरी
मोरणीचा नाच बघा तालामधी— त्याच तालामधी

तारप्याचा सूर उठे
ढोल उरी खोल फुटे
गाणं म्हणून नाच करू सणासुदी— नाचू सणासुदी

७-१०-१९६२
पुणे

# ४१. लमाणांचा तांडा * *

लमाण आम्ही, येकसारखं हिंडायाचं काम
माल वाहतो इकडुन तिकडं, मोजुन घेतो दाम

आम्ही लमाण शंभरजण
संगती बैलांची पलटण
चालली घंटांची घणघण
मागुनी वाळच्यांची रुणझुण
कहर उन्हाचा, लोट धुळीचा, टपटप सांडे घाम

कशाला पुसता आमचं गाव ?
आम्हांला गावच न्हाई राव
न्हाई घरदाराचा ठाव
आम्ही रस्त्याचं उमराव
सूर्यासंगं चाल आमची, आभाळ आमचं धाम

इमानी कुत्र्यांची सोबत
कोंबड्या-शेळ्यांची संगत
बायकापोरांची पंगत
गोडुल्या गप्पांची रंगत
बिऱ्हाड पाठीवरी आमचं, मुखी शिवाचं नाम

टेकडी उंचाडी वेंघतो
नदीच्या पाण्यातुन पोहतो
भाकरी कष्टाची चाखतो
जातिची आब नीट राखतो
न्हाई ठाउक दुसरं, न्हाई ठाउक दुनिया आम

सावली दिवसाची लाँबली
खळखळी पाण्याची ऐकली
टोळकी बैलांची थबकली
पोतडी उतरुन घ्या मंडळी
धुवून काढू शीण, करू या आज इथं मुक्काम

मांडुनी धोंडे, ठेवा तवा
आगटी ढलप्यांची पेटवा
लमाणी नाच, गड्यांनो, हवा
चौंडकं, हलगी रे वाजवा
नाच न्हाय तर न्हाय, गड्यांनो, जगण्यामंदी राम !

२५ नोव्हेंबर १९६४
पुणे

# ४२. आकाशगंगा * *

( भूपती–वैभव )

हा हार गळ्यातिल रजनीच्या ओघळला ?
की वेणीवरचा सुंदर गजरा चळला ?

की भांग काढिला मोत्यांनी भरलेला ?
की तोरण स्वर्गी जाणाऱ्या मनुजाला ?

गगनीच्या बाला खेळति शिवणापाणी
हे काय तयांच्या मृदुल स्मिताचे पाणी ?

की नील नभाच्या सागरि उसळे फेन ?
की मंगल गंगा पावन करिते गगन ?

स्वर्गंगे, माते ! धावत ये तू खाली
ओतीत सुधेचे धोत माझिया भाली

अंधार गडद हा करितो कडु मन्नयना
भूवरी उतर, चल, तेजस गे करि त्यांना

हृदयाची झाली ज्याच्या राखन् राख
शिपणा करुन तो पामर पियुषे माख

दुःखाने करपुन रान जिवाचे झाले
धर गळती त्यावर, घाल भीज, कर ओले

आळवू तुला किति, कुठवर वंदू चरणा ?
पाषाणहृदय तव, तुजला येइ न करुणा

का उगाच लावू परंतु तुजला बोल ?
प्राक्तनी भोग जे कुणा कसे चुकतील !

तू तशीच वरती राही झुलवित जगता
आणीन लोचनी प्राण तुजकडे बघता

अंगणी नभाच्या घाल सडा मोत्यांचा
भिजवीन भूतला, पूर असा असवांचा

मायेची पाखर मिळली जर कधिकाळी
वितरीन श्वास मी शेवटचा ते वेळी !

३ मे १९२७
अहमदनगर

# ४३. बंदिवान * *

( मदालसा-गझल )

उत्तुंग डोंगर वाकडे ओलांडुनी जावे पुढे
जेथे कडे चोहीकडे, रस्ता अडे, कोडे पडे !

एकीकडे झाडेझुडे, दरडीत भालू ओरडे
फोडी पशू डरकावण्या, ऐकून त्या छाती उडे !

किंवा मला विक्राळशा दरियामधे ढकला कुणी
ठेचाळती लाटा जिथे खडकांस कर्कश गर्जुनी

घोंघावुनी फेकीतसे वारा ढगांचे झुंबके
वासूनिया जबडे खडे नक्र कृतांतासारखे !

किंवा मला अवसेचिया रात्री नभी द्या झोकुन
तेथेच मी काळ्या ढगा पकडून लोंबत राहीन

या बाजुला बिजली सुटे, त्या बाजुला उल्का फुटे
तारा तुटे, पेटे नभी, झळ लागुनी काटा उठे !

दैना मला ही पत्करे, बेड्या परंतू या नको
वैतागलो या जीवना, दारूण ही बंदी नको !

२७ ऑक्टोबर १९२७
नेवासे

# ४४. झोपी जा रे बाळ ! ★ ★

( कोकिळा )

झोपी जा रे बाळ !

हो रात्रीची भलती वेळा
नकोस जागू माझ्या बाळा
लाव जरा डोळ्याला डोळा
नको वाजवू असे राजसा, पायांमधले चाळ

तिकडुन झोपी जाणे झाले
मांडीवर मी तुला घेतले
केव्हाची थोपटीत बसले
रंजिस झाला जीव ग बाई ! तू भारीच खटयाळ

किनई बाजारातुन तुजला
आणिन खाऊ, चित्ले, घोला
अशं काय ले वेल्या बाला !
हसू नको तू, असा कसा रे दिला सोडुनी ताळ !

झोपी जर तू नाही गेला
बोलाविन मी भोकाडीला
धरील येउन ती मग तुजला
हात टेकले तुझ्यापुढे मी, शिजू न देशी डाळ

झोपत नाही काही केल्या
मार खायचा असेल मेल्या
अगं बाइ पापण्या झाकल्या
मार द्यायचे नाव काढता झोपी गेला बाळ !

१७ सप्टेंबर १९२८
अकोले

## ४५. दृष्ट * *

( चाल—धर्मलोप झाला देवा )

दृष्ट लागुनी सुकले गं बाई लेकरू
आता काय मी करू ?

बाळ आज खेळत नाही
दूड दूड धावत नाही
लागला गं माझा बाई– जीव बावरू

अंग भारि तापुन गेले
झाकलेत चिमणे डोळे
चोच वासुनी गं पडले– दीन पाखरू !

गोजिरा गं माझा तान्हा
घास काहि तो घेईना
दाटला कसा हा पान्हा–सांग आवरू ?

तान्हुल्या, तुझे हे ओठ
पारिजातकाचे देठ
नाचती कपाळी थेट-केस भुरुभुरु

गालबोट गाली काळे
वाजतात पायी वाळे
सोनुल्या, कधी तव चाळे–व्हायचे सुरू ?

जीव गुंतला तुजपाशी
सांग का असा रुसलासी ?
पाडसा, जरा माझ्याशी–बोल चुरुचुरू

दृष्ट तुझी काढायाला
लागते अता मी बाळा
जीव जणू वारा प्याला-काय तरि करू ?

१६ जुलै १९२९
अकोले

# ४६. एकटी * *

( चाल—दृष्ट हिला लागली )

तुझ्यावीण हिंपुटी-सख्या, मी राहु कशी एकटी ?
गोड गोड मज वचने देउन
निघून गेला आपण येथुन
किती तरी दिन गेले लोटुन
पत्रही न शेवटी–सख्या, मी राहु कशी एकटी ?

झुंजुरके दिसताच उठावे
काम पारुसे उरकुन घ्यावे
नंतर पाणोठ्यावर जावे
घागर घेउन कटी–सख्या, मी राहु कशी एकटी ?

सडणे, निसणे, झाडसारवण
कामातच दिन जातो संपुन
वाढविते ही पाणी घालुन
परसातील रोपटी–सख्या, मी राहु कशी एकटी ?

पडते जेव्हा खाटेवरती
आठवणींना येते भरती
दिसू लागते डोळ्यांपुढती
यष्टी तव गोरटी–सख्या, मी राहु कशी एकटी ?

नको नको हे जिणे वाटते
अळेबळे मी घास लोटिते
कसाबसा हा काळ कंठिते
पाहुन तव अंगठी–सख्या, मी राहु कशी एकटी ?

छातीवर दुःखांचे डोंगर
झेपुन धरता खचली कंबर
तुझ्यावाचुनी जीव खरोखर
आला मेटाकुटी–सख्या, मी राहु कशी एकटी ?

नाव तुझे घेताच मनोहर
डोळचांतुन ये पाणी दरदर
पेटली सख्या, हृदयी खडतर
विरहाची आगटी–सख्या, मी राहु कशी एकटी ?

वाट किती मी पाहू अपुली ?
माया का हो पातळ केली ?
ओकी ओकी मजला झाली
ही अपुली खोपटी–सख्या, मी राहु कशी एकटी ?

जीव वाहिला तुझ्याच पायी
विलंब लावू नकोस काही
राया, केव्हा संपणार ही
अपुली ताटातुटी ?–सख्या, मी राहु कशी एकटी ?

घाम केधवा येउन पुसशिल ?
विडा प्रीतिचा केव्हा घेशिल ?
केव्हा करशिल गोष्टी गुलगुल
गळचास मारुन मिठी ?–सख्या, मी राहु कशी एकटी ?

२२ जुलै १९२९
अकोले

# ४७. बकुळीची फुले * *

( सुनीत )

छाया गर्द सुरेख, गार हिरवी शोभे तुझी पालवी
सो सो गर्जत वाहुनी गदगदा वारा तुला हालवी

भोती कुंपण दाट, त्यावरुनही विस्तारल्या डाहळ्या
झाला भूमिवरी किती खच तरी; पाने, फुले, पाकळ्या !

पुष्पांचे झुबके किती लहडले प्रत्येक खांदीवरी
त्यांचा गंध चहूकडे पसरला, वर्णू किती माधुरी !

छोटे गोंडस, पांढरे सुम तुझे, हुंगू किती मी तया !
छोट्या, सुंदर पाकळ्या किति तरी, येती न मोजावया !

उद्यानात अनंत वृक्ष फुलले, त्यांची सुगंधी फुले
घेतो जो न करात तोंच सुकती, पस्तावतो त्यामुळे

पुष्पे वेचुनिया तुझी जर तया मी ठेविले गुंफुनी
त्यांचा गंध अनंत काळ टिकतो, जाती न कोमेजुनी

पुष्पांच्या तव ओंजळी तरुवरा, डोक्यावरी ठेवितो
यावज्जीव असो शिरावर तुझी छाया असे इच्छितो !

२८ जुलै १९२९
अकोले

---

* गुरुवर्य के. ल. टेंभुर्णीकर हे माझे कवितेच्या प्रांतामधले गुरुजी. त्यांचा 'बकुळीची फुले' या नावाचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे.

# ४८. मराठा * *

( मंदारमाला )

पोटास ज्याच्या मिळे एक वेळा सुकी कोरडी खायला भाकरी
केली इमानास जागून ज्याने मराठी स्वराज्यामधे चाकरी

ज्याला रहायास साधीसुधी ती असे खिडखोऱ्यामधे झोपडी
हातावरी घेउनी मस्तकाला रणी झुंजला तो मराठा गडी !

आता कुठे पूर्विचा तो मराठा जयाने स्वराज्यास संरक्षिले ?
आता कुठे तो जयाने स्वतांचे असे रक्त युद्धामधे सांडले ?

कांडी फिरे यक्षिणीची कशी ही ? यशोदेवता जाय देशोधडी
दास्यामधे गुंतला देश आता, दडाला कुठे तो मराठा गडी ?

शेतामधे औत जुंपून आता करी तो मराठा गडी शेतकी
झाली जरी पायबंदी तयाची, अशी सेवितो मायभू सारखी

स्वातंत्र्य जिंकून आणावयाला तयावाचुनी शक्त नाही कुणी
आता असे लाभली योग्य संधी, पुढे येतसे अंग तो झाडुनी

लागे दिसू चेतलेला निखारा, निघू लागली राख एकीकडे
ज्वालामुखी लागला पेट घ्याया, धडाडून बाहेर लाव्हा पडे

लागे सरू घोर अंधार आता, फुटू लागले तेज पूर्वेतुनी
स्वातंत्र्य नांदेल देशात माझ्या, मराठाच आणील ते जिंकुनी !

३ ऑगस्ट १९२९
अकोले

# ४९. शारदेस * *

(कोकिळा)

घे पदरी हा रंक

शारदे, घे पदरी हा रंक !।

अखिल जगाची तूच माउली
लोळण घेतो तुझ्या पाउली
तुजविण झाली तगमग, अजुनी फुटले नाहित पंख

किर्र करी भवती हे जंगल
हिंस्त्र पशूंची एकच दंगल !
फणी उभारुन, सळसळ करितो नाग मारण्या डंख

वणवा भडके राहुन राहुन
गेले सारे काळिज करपुन
सभोवार माजला भयंकर परिस्थितीचा पंक

मनोवांछिते खचून गेली
आयुष्याची परवड झाली
तनसडिलाही महाग झालो, पुरा पुरा मी खंक !

दुर्दैवाने डाव जिंकला
ठेचाळुन पडतो हरघडिला
कुठवर खाऊ धूळ कोरडी ? कुठवर झेलू थुंक ?

हाक मारितो टाहो फोडुन
घेई पदराखाली झाकुन
होरपळा जाहला, हवी मज तव मायेची फुंक !

माझ्या एकलकोंडया जीवा
तुझ्यावीण नच दुजा विसावा
झापड आली, क्षणभर पडतो, पुढे करी नव अंक !

८ ऑगस्ट १९२९
अकोले

# ५०. पहाट * *

( सुनीत )

झाली रंगुन तांबडी उगवती, तारा फिक्या जाहल्या
झाले डोंगर पांढरे उजळुनी, साऱ्या दिशा फाकल्या

आनंदे किलबील गोड करती रानातली पाखरे
वाऱ्याच्या झुळुका हळू बिलगती, अंगा सुटे कापरे !

मोत्यांचे सर ओघळून पडती, ओलावली हिर्वळ
गेला मोहरुनी पुरा फुलवरा, झाला सुरू दर्वळ

जाते चालतसे कुठे घरघरा, आवाज ये मंजुळ
निंबोणीवरती बसून करिते त्या साथ ही कोयळ

ह्या ह्या हाकित बैल शेतकरि हा शेतावरी चालला
मेंढ्या घेउन शेळक्या हळुहळू चालावया लागला

खांदा घेउनिया कुऱ्हाड अपुली मोळीविक्या चालला
पोटासाठी मजूर घाम अपुला गाळावया लागला

आता सोनसकाळ होइल, रवी फेकील मोतीहिरे
माझा देश कधी पहाट असली पाहील तेव्हा खरे !

१० ऑगस्ट १९२९
अकोले

# ५१. तू * *

( सुनीत )

तू माझी हरिणी, खरोखर तुझे डोळे टपोरे तसे
चित्ताच्या कुरणामधी विहरसी निःशंक तू राजसे

गोरा रंग तुझा, मनोहर गती, तू राजहंसी खरी
घेसी डुंबण सारखी हृदयिच्या बेफाट पाण्यावरी

भारी मंजुळ लाडके तव गळा, तू गोडवी कोकिळा
केला मी तुजला बहाल पुरता, माझ्या मनाचा मळा

तुझ्या ठायि प्रशांत तेज विलसे, ताराच गे तू खरी
माझ्या अंतरिच्या अफाट गगनी तेजाळसी तू पुरी

अंगी यौवन तूझिया बहरले, झेलाच तू काश्मिरी
भारी सात्त्विक तू, जणू तुळशिची हेलावती मंजिरी

पाडाचे फळ तू, तुझ्या निथळते लावण्य अंगातुनी
तू ओली हिरवी, सुरेख हरळी, तू नम्रतेची खनी !

प्रेमाचे मनि चांदणे फुलविसी, तू अक्षयी पौर्णिमा
तू माझी सहधर्मिणी, तुजपुढे नाही जगाची तमा !

१५ ऑगस्ट १९२९
अकोले

# ५२. आईचे दूध * *

(मोहिनी)

बेफिकीर रोखा अमुच्या छातिवरी भाले
दूध आमुच्या आईचे मनगटात खेळे !

जरी धूळ खाती अमुचे किरिट वैभवाचे
जरी पार लुटुनी नेले ढीग कांचनाचे
तरी तेज अमुचे लवहि नष्ट नाहि झाले

जरी मान सोडुनी गेली जाड जोखडांनी
जरी पाय अमुचे झाले बद्ध शृंखलांनी
तरी आडवा येईल जो हाणु तया टोले

सत्त्व मायभूचे अमुच्या अढळ राखण्याला
चंग बांधुनी हे बसलो प्राण द्यावयाला
जागता पाहरा करितो फाडुनिया डोळे

किती वीर अमुच्यामधले ठाणबंद झाले
किती जायबंदी झाले, किती कामि आले
अघाडीस आलो तरिही दाबुनी उमाळे

शीर घेउनी तळहाती चाललो रणाला
अहर्नीश झुंजुनि आणू जिंकुनी यशाला
रक्त मराठ्यांचे अंगी आमुच्या सळाळे

जिने वैभवाने अपुल्या दिपविले जगाला
त्याच मायभूला अमुच्या लाविले भिकेला
सूड घ्यावयाला याचा रक्त हे उफाळे

जिच्या पदांखाली होती रत्न, हिरे, मोती
हाय, तिच्या हाती आता दिसे धूळमाती !
त्वेष खाउनी मन अमुचे कळंजून गेले

दगड पिळुन पाणी काढू असा जोम अंगी
वाघिणीस वेसण घालू खवळल्या प्रसंगी
डसमगू न जरि तोफेचे कोसळले गोळे !

१ सप्टेंबर १९२९
अकोले

# ५३. तुझ्याखातर * *

( चाल :–घट भरे )

किति फिरू सख्या मी तुजकरिता ?
हा विटून गेला जिव पुरता !

बावरलेल्या हरिणीवाणी
वणवण फिरले रानोरानी
जुमानिले नच पाउसपाणी
किती वलांडिल्या डोंगरसरिता !

सर्वस्वावर पाणी ओतुन
संसाराला काडी लावुन
आले धावत मी तुजमागुन
तरि न का भरवसा ये धरिता ?

हृदयाला या कीड लागली
नजर कशी अंधारुन गेली
पायांची तर चाळण झाली
जिव डहाळला फिरता फिरता

मी हरळी, तू सुंदर कुंदा
मी फांदी आणिक तू बुंधा
मज शेवंतीच्या निशिगंधा
किति तुझी आठवू सुंदरता ?

गांवाबाहिर नदिकाठावर
घालविलेल्या सांजा सुंदर
विसरलास का इतुक्या लौकर ?
का घडा प्रीतिचा करिसि रिता ?

कुठेहि असला तरि तुज शोधिन
पायांवरती डोके ठेविन
खुशाल नंतर डोळे झाकिन
हा जीव ठेविला तुजकरिता !

७ सप्टेंबर १९२९
अकोले

# ५४. शोध * *

(वसंत-गझल)

समुद्राच्या निळ्याकाळ्या जळाखाली रहासी का ?
तळीच्या दाट वेलींना धरोनी घेसि का झोका ?

करोनी शिंपलेमोती तुझ्या ओच्यामधे गोळा
गळा घालायला का गे तयांच्या गुंफिसी माळा ?

तुझ्या कंठातुनी येती तिथे का गोडशी गाणी ?
तयांनी हालते का गे समुद्राचे निळे पाणी ?

जयांचा रंग सोनेरी, कुमा ज्यांची फुलावाणी
अशा त्या नागकन्यांची जहाली काय तू राणी ?

सखे, आहेस तू कोठे ? मनी घोटाळती शंका
समुद्राच्या निळ्याकाळ्या जळाखाली रहासी का ?

× × ×

अभाळाच्या महाली का सखे जासी रहायला ?
तुला पाहून आला ना सखे गं राग चंद्राला ?

ढगांची रेशमी शय्या करोनी झोपसी का गे ?
विजेचे पंख लावोनी भरारी घेसि का वेगे ?

फुले गुंफून तारांची शशीच्या शुभ्र किरणांनी
तयांची घालिसी का गे तुझ्या केसांवरी वेणी ?

कराया स्नान घेसी का बुडी आकाशगंगेत ?
मृगाशी खेळसी किंवा गडे तू चंद्रलोकात ?

तुझ्यावाचून हा झाला जिवाचा पानपाचोळा
अभाळाच्या महाली का सखे जासी रहायाला ?

२४ सप्टेंबर १९२९
अकोले

## ५५. उन्हाळा * *

( भिल्लीण–गझल )

‘आलोच पहा’ ग्रीष्म अशी दे ललकारी
ओकीत सुटे आग नभी सूर्य दुपारी
या ऊन झळाया करिती तप्त शरीरा
आता कुठला शीतळसा विंझणवारा !
कासाविस हो जीव अती सूर्यकरांनी
घामेजुन अंगांग निघे चिंब भिजोनी
देई फिरताना चटके ऊन फुफाटा
अंगात भरे पूर्णपणे शीण, गळाठा
एकेक तरू लागतसे पार झडाया
कोठून मिळावी हिरवी पाखरछाया !
खाऊन उन्हाळा सुकली ही वनराई
दृष्टीस पडेना हिरवेचार कुठेही
काळी डिखळे आणिक हे कुंपणकाटे
यावाचुन शेतात दुजे काहि न भेटे
या शुष्क तृणांनी भरल्या पाउलवाटा
रानात दिसे जीर्ण उभा लाकुडफाटा
बारीक ढगाळी दिसती सुन्न अभाळी
रोडावुन ओढ उघडी होत लव्हाळी
झाडांवर पक्षी दिसती केविलवाणी
आणीक पिकांची सरली साखरगाणी
ओहोट कधी घेइल हा तीव्र उन्हाळा ?
देईल कधी पाणकळा सूख जिवाला ?

२० एप्रिल १९३१
अहमदनगर

[६]

# ५६. तिच्याविषयी * *

( मंदारमाला )

आटोपुनी रोजचा कामधंदा निघावे घरी ओढणी लागुनी
वाटेकडे पाहताना दिसावी उभी रोज दारात ओठंगुनी

काढून घ्यावी करी कोटटोपी, बघावे जरा गोडसे हासुनी
वाफाळ पेला चहाचा करावा तिने तोच स्टो पेटवोनी झणी

गालातले गोड हासू तिचे ते बिजेचे जणू कोवळे चांदणे
द्यावा सदा कान ज्याला असे ते खडीसाखरेसारखे बोलणे

डौलात खाडीमधे पोहणाऱ्या पडावापरी ते तिचे चालणे
रेखीव चित्रापरी नाकडोळे, विधीने कशाला न केले उणे !

हातांमधे बांगड्या मोरपंखी, कपाळी खुले कुंकवाची चिरी
साध्यासुध्याची तिला हौस भारी, अलंकार थोडेच अंगावरी !

देई करोनी स्मृती अमृताची तिच्या हातची आमटीभाकरी
लावण्यलक्ष्मी जणू वावरे ती अशा माझिया चंद्रमौळी घरी !

वेणीफणी आटपोनी सकाळी बसावे सखीने चुलीच्या पुढे
स्वैंपाकपाणी वगैरे करोनी म्हणावे, "चला, आटपा ना गडे !"

बंबातले काढुनी ऊन पाणी, तिथे ठेवुनी साबणाची डबी
टॉवेल घेऊन हाती रहावी निऱ्या धोतराच्या करोनी उभी

होताच आंघोळ बिंघोळ माझी करावे झणी पाटपाणी तिने
मारीत माझ्यासवे गोड बाता किती आग्रहाचे तिचे वाढणे !

जेवून झाल्यावरी छानपैकी करावा तिन राजवर्खी विडा
घेऊनिया तो अळेने बळेने करावा तिचा गाल मी तांबडा

गुंडीसवे गोड चाळा करावा तिने मान टेकून वक्षस्तटी
श्वासातली गोडवी धुंदता ती जणू दर्वळे चंदनाची उटी

कोटावरी एक खोवून द्यावे तिने फूल वेणीतले काढुनी
अस्मादिकांनी हफीसात जावे पुन्हा एकदा गाल उष्टावुनी

वाऱ्यावरी हिंडतो जीव आता, तिची याद हो राहुनी राहुनी
माहेरला चालती जाहली ती सहा मंथरांची रजा घेउनी

कुंडीमधे आमुच्या प्रीतिच्या या नवा कोवळा कोंब आला वरी
आणील ती संगती खेळण्याला नवे गोजिरे बाळ माझ्या घरी !

१४ मे १९३१
अहमदनगर

# ५७. काळ्या पाण्यावर * *

(दिंडी)

बांधलेला दंडास दोरखंड
आणि बेड्या पायात या अखंड
बोट झाली ती सज्ज निघायाला
दूत काळाचे खेचिती अम्हांला

आइ, करताना जरा तुझी सेवा
मुळी कष्टांचा ठेविला न केवा
परी त्यांना ते गमे घोर पाप
दिली ठोठावुन मला जन्मठेप !

बुरे नाही चिंतिले कुणाचेही
नाहि केला अपहार धनाचाही
विजेत्यांशी तंडलो तुझ्यासाठी
म्हणुन आले हे भोग या ललाटी

नाहि शिक्षेची खंत मला काही
प्राण माझा वाहिला तुझ्या पायी
परी आता जायचे दूर दूर
म्हणुन लागे हा उलायास ऊर !

आप्तइष्टांपासून दूर झालो
मुलांबाळांना अंतराय झालो
तिचा शेवटचा घेतला निरोप
अता घेतो भरवून तुझे रूप

तुझ्या ताटातिल खाउनिया घास
तुझ्या पाण्याने भागविली प्यास
तुझ्या मांडीवर झोपलो सुखाने
थोर केले मज तूच निगोतीने

पुन्हा नाही दिसणार मला आई
राख माझी पडणार इथे नाही
डोंब आगीचा उसळला उरात
आणि शिणका मारिती मस्तकात !

जरी घोंगावे भोवती निराशा
तुझा आठव होईल मज हमेशा
पीळ पडतो सारखा आतड्याला
नको विसरू माउली, लेकराला

तुला डोळेभर बघुन घ्यावयासी
जीव माझा हा जाहला अधाशी
परी पाणी ये टचाचून डोळां
आंचवीते मज तुझ्या दर्शनाला

देइ आशीर्वाद तू लेकराला
तुझी माती लावितो कपाळाला !

४ जुलै १९३१
बडोदे

# ५८. दर्भांकुर * *

( चाल—जमुनातट )

( दुष्यंत राजाकडे वळून पाहण्यासाठी शकुंतला दर्भांकुर टोचल्याचे मिष करते.)

रुतला ग सखे, पायाला दर्भांकुर

आडदांड हा कोण शिकारी
हातात घेउनी आला-कमठातिर ?

ही ग कशाची मृगया याची
हा चाप रोखुनी बसला-माझ्यावर !

तिखट धारिचे तीर तयाचे
जणु दुजे रुपति हृदयाला-दर्भांकुर

सखे अनुसुये, थांब ना जरा
जायचे कुठे मुलुखाला-तुज लौकर ?

नको एवढे हिणवायाला
मी मुळीच थांबायला-नच आतुर

सुटला बघ दणक्याचा वारा
अडकवी पदर झुडुपाला-वरचेवर

आणि पायही उचलु देइना
किति खोल जाउनी रुतला-दर्भांकुर !

८ जुलै १९३१
बडोदे

# ५९. मं मं * *

( चाल—कृष्णा, मजकडे पाहू नको )

बाळा, झाली वेळ भुकेची
   घेई तू मं मं करून
साऱ्या दिनभर
हुदडसी घरभर
   भूक न तरि का अजून ?
तुजसाठी केला
दुधभात काला
   टाकिते साखर वरून
कडेवर घेते
तुज भरवीते
   जाऊ नको रे पळून
छांदिष्ट बाळा
नेईल तुजला
   बागुलबोवा धरून
हा जीव बाई
जिकिरीस येई
   खोड्या तुझ्या निस्तरून
घास मुळीही
का घेत नाही ?
   हलसी न जागेवरून
आले हं समजून
येताच तिकडून
   जेवायचे ना मिळून ?

१२ जुलै १९३१
बडोदे

# ६० पोट. * *

( दिंडी )

जीव पोटातुन आईच्या निघाला
भूक सोडी भंडावुनी तयाला
टयहां करुनी आईस दूध मागे
हरेकाच्या पाठीस पोट लागे

हिंदभूची लेकरे तीस कोटी
पोट कितिकांचे जातसे खपाटी
जरी थोडयांना मिळे तूपरोटी
किती फिरती हे घेउनी नरोटी !

बाळ जाई सोडून माउलीला
जाय नवरा टाकून बायकोला
दूर जाती हे नोकरी कराया
आग पोटाची जाळितसे माया

न्यायनीतीचा उडवुनी चुराडा
पोट लावी घालायला दरोडा
येथ चुकले अगदीच प्रभूजीचे
पोट नव्हते निर्माण करायाचे !

पहा गरिबाच्या हाल नी अपेष्टा
कष्ट करण्याची करी पराकाष्टा
सटीसायासी लाभतो तयाला
भाकरीचा पाण्यात चुरुन काला

गुरे चरती गवतावरी निवांत
पाखरांनाही कशाची न भ्रांत
नसे खाण्याची कुणालाही तंगी
पहा मिळवी पोटास किडामुंगी

फक्त गरिबाला नसे खावयाला
जरी खस्ता खाउनी त्रस्त झाला
जरी घामाच्या सांडतात धारा
तरी पोटाचा होय कोंडमारा

गरीबांचे शिपुनी लाल रक्त
तक्त राजाचे होय शोभिवंत
मजूरांच्या वर करोनी मुजोरी
धनिक भरतो हा आपुली तिजोरी

कुणी श्रीमंती दिली राक्षसांना ?
दिले कोणी भलतेच हक्क यांना ?
व्यर्थ पैशांची होत असे माती
नका ठेवू कोलीत भुताहाती !

हवा सगळ्यांना रीतशीर वाटा
गोरगरिबांच्या मिळू देत पोटा
प्रभो, याचा कर योग्य तू निवाडा
असे सगळा हा तुझा पोरवाडा !

२३ जुलै १९३१
मुंबई

# ६१. पारधी * *

तिरकमठा सरसावुनी
सावजा बसे हेरुनी
नजरेत धार भरलेली ही बहिरससाण्याहुनी

खळखळा वाहते नदी
मृग उतरे पाण्यामधी
टप्प्यात गवसण्यासाठी, थांबला जरा पारधी

साधुनी किरण त्यावरी
ताणुनिया कंकर धरी
टपतसे झडप घालाया हा बिबल्या चित्त्यापरी

काळाने धरिला दबा
बघुन ते राहिला उभा
जंगलात परके येती का असा फासण्या बिबा ?

शर येइल सोसावुनी
जाईल ऊर विंधुनी
थरकाप जाहला त्याचा छातीत धस्स होउनी !

पळवाट न उरली कुठे
बळ एकवटोनी उठे
फनगडे तिखट शिंगांचे रोखुनी तयावर तुटे

उलटली पहा पारडी
पळ व्याधा, कर तातडी
निघतील नाहि तर सारी बाहेर तुझी आतडी !

७ ऑगस्ट १९३१
पुणतांबे

# ६२. अनुनय * *

( चाल— वैशाखमास वासंतिक )

का निबोल आज मशी राहिला प्रिया ?
ही कठोरता धरली सांग कासया ?

शब्दही न बोलला दुपारपासुनी
बैसलात पुस्तकात तोंड घालुनी
जीव तोडुनी करिते मी गयावया

सांग, काय हातुन या जाहला गुन्हा ?
मज सुनाव शिक्षा, पण राग सोड ना
वागणूक ही हृदया खुपशिते सुया

एकदा न डोळे वर करून पाहिले
गोड हास्य दिसणे मग कुठुन आपुले !
मुलुखाचा राग कधी जायचा लया ?

होता का आज चहा गोड जाहला ?
आपुल्या मनास काय नाही उतरला ?
तरि मी करिते मुठीत जीव धरुनिया !

वरण जाहले होते काय आळणी ?
नव्हती का भाजीला नीट फोडणी ?
तांदळात होते का कोदरू सया ?

होता मी शानदार लाविला विडा
रंगलाहि होता तो जर्द तांबडा
होता का जास्त चुना जाहला तया ?

येत अती काकुळती आपल्यापुढे
रागाचा शब्द तरी ऐकु द्या गडे
दासीची नाही तुम्हां येत का दया ?

अमुची इतुकीही पर्वाच नाहि ना ?
जळले ते पुस्तकही दूर होइना
जीवाची किती माझ्या करितसा रया !

★ ★ ★

म्हणक्याने उठून तिने काय पाहिले ?
होते पतिराज बुकाआड झोपले
नव्हते पण कोणी फोटोच घ्यावया !

१८ ऑगस्ट १९३१
पुणतांबे

# ६३. अर्धांगी * *

( चाल— सुरेख संगम किती )

( एखाद्या सुसंस्कृत व प्रेमाचा ध्येयवाद धरलेल्या तरुणाला जर, 'तुला कशी बायको हवी ?' असे विचारले, तर तो म्हणेल-- )

जणू भूवर उतरे शशी
मिळावी अर्धांगी मज अशी

तनु नाजुक, अति कोवळी
जणु मदनाने निर्मिली
ओतुनी फुलांच्या मुशी

गोरटी असावी अती
जणु फुल्ल, धमक केतकी
की लिंबाची रसरशी !

तनु सडपातळ, गोमटी
जणु वेताची कामटी
उलटली नसावी विशी

बोलण्यामध्ये कोकिळा
जणु टाकि सुधेच्या चुळा
एकतार घुमते जशी

लाघवी असावी सखी
आणखी फार बोलकी
जणु बाल्य घेतसे हुशी

माहिती असाव्या कला
विणकामहि यावे तिला
घरकाम कराया खुषी

जशि रूपाने देखणी
तशि विनयशील नी गुणी
झटुनिया सुखविल मशी

हा प्रपंच साधायला
हातभार लावुन मला
उजळवील अपुली कुशी !

२४ ऑगस्ट १९३१
पुणतांबे

# ६४. स्वर्ग ★ ★

( सूर्यकांत )

( एका लहान मुलाची स्वर्गाविषयीची कल्पना )

असतिल तेथे जिकडे तिकडे विखरुन पडली फुले
असतिल पक्षी झाडांवरती गोड गात बैसले

असेल तेथे वहात सुंदर दुधासारखी नदी
असतिल डोलत हिरवीपिवळी कमळे पाण्यामधी

घरे तेथली सुरेख असतिल चमकत सोन्यापरी
आत लाविल्या असतिल रंगीबेरंगी तसबिरी

झगमग झगमग करीत असतिल तिथले सुंदर दिवे
विझतहि नसतिल ते वाऱ्याने, जणु दुसरे काजवे

रोजच जत्रा भरत असावी तिथे नदीच्या तटी
असतिल खाऊ देत घेउनी पैसे दाटूमुटी

पंख लावुनी हिंडत वरती असतिल तिथली मुले
असलिल चालत ढगावरुनही टाकित हळु पावले

असतिल भारी, रंगित कपडे बाळांचे तेथल्या
शिवले असतील शेवंतीच्या गुंफुनिया पाकळ्या

खूप दागिने असतिल त्यांनी अंगावर घातले
पुन्हा काढुनी नसतिल कधिही पेटिमधी ठेविले

मुळीच नसतिल त्यांच्या नशिबी अभ्यासाची बुके
मनास माने तितुके भटकत असतिल ते सारखे

नसतिल त्यांना ठोक द्यावया तिथे खाष्ट मास्तर
स्वर्ग असा मज बघावयाला मिळेल का लौकर ?

२२ ऑगस्ट १९३१
पुणतांबे

# ६५. घराकडे * *

( दिंडी )

पहा गेले वाजून तीन टोले
चला, शाळेचे तास पुरे झाले
मुले गर्दीने जायला निघाली
आणि तारांबळ मास्तरची झाली

बसुन खाली आंबून अंग गेले
लिहून पुस्त्या हे हात घाण झाले
म्हणुन परवाचा तोंड दुखुन गेले
छड्या खाउन हुळहुळे हात झाले

वेळ नाही मज कुठे थांबण्याला
नको उशिराने घरी जावयाला
खास ताई असणार उभी दारी
खेळण्याला उत्सुक मशी भारी

आणि आई पाहील फार वाट
घरी गेल्यावर थोपटील पाठ
मला देइल मग खिसाभरुन खाऊ
चला, जलदीने घराकडे जाऊ

२५ ऑगस्ट १९३१
पुणतांबे

# ६६. निर्धार * *

( चाल-- दृष्ट हिला लागली )

देऊ नका डागण्या-निघालो वैऱ्याशी झुंजण्या

घेतलेत मज बोलबोलुनी
सरळ आणिले घाव घालुनी
अता बरिक आतल्या आतुनी
मन लागे टोचण्या-निघालो वैऱ्याशी झुंजण्या

खावे प्यावे खुशाल दिनभर
असाच गेला काळ आजवर
कुशीवरून या दुज्या कुशीवर
चाळवल्या पापण्या-निघालो वैऱ्याशी झुंजण्या

हवालदिल देशाला पाहुन
गेले अंतर हे कांढावुन
जीव इरेला गेला पेटुन
समरांगण गाठण्या-निघालो वैऱ्याशी झुंजण्या

घालमोल झाली जीवाची
पर्वा नच आता देहाची
मिजास नच्च खाण्या न पिण्याची
मिळोत खाया कण्या ! -निघालो वैऱ्याशी झुंजण्या

पाउसवारा करो धुमाळी
निवाऱ्यास वाघाची जाळी
अंथरायला मिळोत खाली
निवडुंगाच्या फण्या-निघालो वैऱ्याशी झुंजण्या

संगीनीवर नाच कराया
विस्तवामधे हात धराया
असे तयारी खुपसुन घ्याया
अंगामधि टाचण्या–निघालो वैऱ्याशी झुंजण्या

असली नसली शक्ती वेचुन
स्वातंत्र्याचे देउळ गाठिन
नेवोत मला तेथे बांधुन
दंडांना काढण्या !–निघालो वैऱ्याशी झुंजण्या

२६ ऑगस्ट १९३१
पुणतांबे

## ६७. कर्णा * *

( चाल– हे हिंद राष्ट्र झेंडया )

शूर हिंदवी तरुणा— ऐक हा कर्णा !

युद्ध शांतिचे अंगिकारुनी
फुंकितसे कर्णा सेनानी
नाद तुझ्या नच भिडला अजुनी
का अंतःकरणा ?

पैरण खादीची घालाया
पंचा साधा गुंडाळाया
याविण काही नकोच घ्याया
वस्त्रप्रावरणा

रक्त प्यावया क्रांति सवकली
प्यास तिची नच अजुनी शमली
कर्णा ऐकुनी ती भोवळली
भीति पडे मरणा !

नको कराया हाणामारी
नको वापरू शस्त्र अघोरी
टाचा घाशित येउन वैरी
धरील तव चरणा !

२९ ऑगस्ट १९३१
पुणतांबे

# ६८. रेशमाची गाठ **

( कोकिळा )

किती बघावी वाट ? अशी गं
किती बघावी वाट ?

बाळपणाचा काळ आपुला
खेळीमेळित सरुनी गेला
लुटुपुटिचा संसार संपला
घरकुल मांडुन केला आपण भातुकलीचा थाट

खेळामधले नाते अपुले
वाऱ्यावरती विरुनी गेले
किल्ले वाळूचे कोसळले
दैवाने घेतले हिसकुनी पक्वान्नाचे ताट

लवल्या जो डोळ्यांच्या पाती
अक्षदा तुझ्या पडल्या माथी
बघुन तुला दुसऱ्याच्या हाती
सुटलो तुटल्या वावडीपरी जगामध्ये मोकाट

धनसंपत भोवती धनंतर
किती भेटल्या मुलीही नंतर
लालचावले परी न अंतर
तुफान दरियावरी भडकले तारू हे भन्नाट !

काहिच आशा नव्हती बाकी
कंठित होतो दिवस हलाखी
मधेच आले कळुन मला की
पुसून कुंकू तुझे जाहले ढवळेशिपित ललाट !

तुजवर हा पडलेला घाला
बघुन बसे हिसका हृदयाला
परि मी खोटे सांगु कशाला ?
लवचिक आशा मनात शिरली परतुन पाठोपाठ

चैत्रपालवी गालांवरली
तिची न तांबुसता ओसरली
अजुन दिसे कांती लवथवली
एकलीच का आयुष्याचा चढसी डोंगरघाट ?

प्रेम मजवरी नाही म्हणुनी
सांग बरे मज शपथ घेउनी
चल तर लवकर हा कर धरुनी
पाप न याच्यामधे ठेविली धर्माने पळवाट !

फुलासारखे ठेविन तुजला
फोड जणू तळहातावरला
सुरवात करू संसाराला
तुझ्या नि माझ्या जीवांची चल बांधू रेशिमगाठ !

२७ ऑगस्ट १९३१
पुणतांबे]

क्रमांक २२६८७ २४०३

# ६९. सुखाचे ओझे * *

( चाल– दृष्ट हिला लागली )

नको सुधेचा गडू
जिवाला सुख हे लागे कडू

नको गर्द सावली शिरावर
नको कशाची छायापाखर
खुशाल सूर्याला अंगावर
विस्तव दे पाखडू— जिवाला सुख हे लागे कडू

नको हवेली संगमरवरी
नको तिच्यातील वैभव जहरी
गरिबाच्या या झोपडीवरी
जीव लागला जडू— जिवाला सुख हे लागे कडू

येत गळचुटी गोडा पाहुन
उतरते न हे पेय घशातुन
मीठभाकरीवाचुन जेवण
माझे लागे अडू— जिवाला सुख हे लागे कडू

राहिन मी खादी पेहरुनी
बरे न वाटे वस्त्राभरणी
तलम रेशमी कपड्यांवरुनी
मन हे लागे उडू— जिवाला सुख हे लागे कडू

गाद्यागिरद्या, मच्छरदाणी
करिती झोपेची धुळधाणी
निजेन अपुला मी अनवाणी
चल, तरटावर पडू— जिवाला सुख हे लागे कडू

हसुन हसुन हे गाल तडसले
सुस्कारे केव्हा न सोडले
कधी न हे डोळे डबडबले
हवे यायला रडू— जिवाला सुख हे लागे कडू

ऊन हवे दुःखाचे खडतर
शरीर सारे डबडबले जर
तरच सुखाच्या झुळुका तिळभर
लागतील आवडू— जिवाला सुख हे लागे कडू

७ सप्टेंबर १९३१
पुणतांबे

# ७०. पपी **

( चाल– किती हाक मारू देवा )

तुझ्या गोड गालावरली— पिऊ दे सुधा
रे पिऊ दे सुधा

खुले बुंद लाली
तुझ्या गोड गाली
कुठे ही मिळाली- तुला संपदा ?

पुढे गाल देसी
लगे ओढ घेसी
असा चाळवीसी- मला का सदा ?

हवा घ्यावयाला
पपी एक बाळा
दुजी ना जिवाला- कशाची क्षुधा

गुणी बाळ देई
पपी गोड बाई
न सांगे कधीही—मला वायदा

परी एक काही
पुरा होत नाही
मला घेउ देई- पुन्हा एकदा !

१४ सप्टेंबर १९३१
पुणतांबे

# ७१. ठोक चल दंड ! * *

( चाल– हे हिंद राष्ट्र झेंडया )

होसि का असा षंढ ? ठोक चल दंड !

वेढा घालुन बसला वैरी
वाजु लागल्या या रणभेरी
बळी गिळाया अपुल्या उदरी
पेटे रणकुंड ठोक चल दंड !

रणचंडी कोपली भयंकर
झाली युद्धाची घनचक्कर
ऊन फेकतो हा डोक्यावर
चेवुन मार्तंड ठोक चल दंड !

वाघापरि चवताळून गुरगुर
घाल उडी संग्रामी सत्वर
काप शत्रुच्या मुंड्या चरचर
तोड खंडखंड ! ठोक चल दंड !

झाड कट्यारीवरचा गंज
दे वैऱ्याला खडतर झुंज
पाड क्षणी प्रेतांचे गंज
बांधी उतरंड ठोक चल दंड !

कडकड त्यांच्या नरड्या फोडुन
घटघट रक्ताचे कर प्राशन
तव बाहुंची टाकी शमवुन
सुटलेली कंड ठोक चल दंड !

चल हो पुढती बांधुन कंबर
कर बर्चीची फेक बरोबर
बाणांचा कर मारा खडतर
खेचुन कोदंड ठोक चल दंड !

गिरगिर फिरवुन गोफणगुंडा
फेक सारखा अरिवर धोंडा
तव देशाचा भगवा झेंडा
मिरवी नवखंड ठोक चल दंड !

समरी जर मृत्यूची माला
पडली तर जाशिल स्वर्गाला
लोटेल तिथे तुज बघण्याला
देवांची झुंड ठोक चल दंड !

येशिल जर तु विजय घेउनी
ओवाळील तव धनिण हासुनी
प्रेमाचा मग तिच्यापासुनी
वसूल कर दंड ! ठोक चल दंड !

२१ सप्टेंबर १९३१
पुणतांबे

# ७२. ऊठ * *

(चाल :- दृष्ट हिला लागली )

ऊठ ऊठ रे गड्या !
करी तू भरल्या का बांगड्या ?

युद्ध आजचे संपुन गेले
समरांगण हे उघडे पडले
विजयी झाले वैरी अपुले
डरकाळ्या फोडीत मारिती उन्मादाने उड्या

फौज आपली उधळून गेली
सगळी दाणादाण उडाली
चिमूटभर सेना न राहिली
कितीक गेले तरणेताठे जीव सोडुनी कुड्या

प्रेते पडली जिकडे तिकडे
घिरट्या घेती वरुन गिधाडे
कोल्हेकुत्री चघळिति हाडे
रक्ताच्या चिखलात पहा हे किडे मारिती बुड्या

निशाण पडले वैऱ्याहाती
सर्वस्वाची झाली माती
सापडेल ते उचलुन घेती
घेउन जाती सोनेमोती गच्च भरुन पोतड्या

पहा जरा वर झापड झाडुन
शिथीलता ही देई सोडून
घास काढ नरड्यातुन ओढुन
नको डगमगू जरी उडाल्या शरिराच्या चिंधड्या

नकाशातला भारत अपुला
दिसे त्यावरी लाल अवकळा
करु या त्याला आपण पिवळा
उभवू नंतर घरोघरी मग आनंदाने गुढचा·!

२३ सप्टेंबर १९३१
अहमदनगर

# ७३. मिनतवारी * *

( चाल– मशि बोलु नको रे )

अशि नको मजवरी रोखू भिवयांच्या धनुकल्या

का म्हणून राग हा धरिला ?
अपराध काय तरि घडला ?
नखलिसी कशाला माझ्या हृदयाच्या पाकळ्या?

रात्रंदिन राबायाला
हा दास तुझ्या सेवेला
का उगाच मग पदराच्या चुरगळिसी झिरमिळ्या ?

तुज सांग मुदी करवू की
आणवू हिऱ्याची चमकी ?
की घडवु लगोलग आता जाळीच्या पाटल्या ?

पातळे रंगरंगाची
ब्लाउझे तुझ्या अंगाची
निवतील काय अणिल्याने तव रागाच्या झळ्या ?

आताच लगे जावोनी
आणितो फुलांची वेणी
केसांवर बांधिन मी ती हाताने आपुल्या

बोल तू गडे, या वेळी
हास तू एकदा गाली
तरळु दे जरा लाजेच्या सोनेरी सावल्या

तरि राग नाहि का सरला ?
किति धरू तुझ्या हनुवटिला ?
हो गडे, अशाच फुलू दे तुझिया गाली कळ्या

पण आता माझी पाळी
बोलणार नच या वेळी
हसणार न मी थोडाही जरि केल्या गुदगुल्या

का मजला इतुके छळिले ?
रीण हे पाहिजे फिटले
तुजकडे मागण्या भारी बघ लागू जाहल्या !

२४ सप्टेंबर १९३१
अहमदनगर

# ७४. रात्र * *

( पंचचामर )

पश्चिमेतुनि रवीस लोटुनी रसातळी
राज्य लागली करावयास रात्र काजळी

या नभांगणामध्ये असंख्य पेटल्या चुडी
किट्ट अंधकार हा तरीहि मारिना दडी

धावतात मेघ चंद्रकोर ही गिळावया
पार पेंगली हवा, हळूच देत जांभया

किर्र किर्र कीटके दुरून काढिती गळे
ही भयाण साद घालतात घूकवाघळे

चोरटे फिरावयास लागले इतस्ततां
लागल्या भरावयास पोट वारयोषिता

लागली करावया भुते स्मशानराखणी
प्रेत लागली असेल खावयास डाकिणी

येत मागुनी परी दयाळ देवता कुणी
गोड मारिते मिठी हळुच नेत्र झाकुनी !

२५ सप्टेंबर १९३१
पुणतांबे

# ७५. तिचे पत्र ★ ★

( मुद्रिका )

'श्री. गऽ लऽ ठोकळ' असे नाव घेउनी
दारातुन पोस्टमनाने पाकीट दिले झोकुनी
हे बारिक, तिरपे खास तिचे अक्षर
फोडुनी म्हणुन घाईने काढले पत्र बाहिर
घेउनी वहीचे एक पान फाडुनी
त्यावरी दिसे लिहिलेले पत्र हे कोरकोरुनी
हा प्रथम दिसे 'श्रीराम', वार नी मिती
'सेवेस प्राणनाथांच्या' मायना असे खालती
त्यापुढला मजकुर गोड किती हा बरे !
वाचल्यावरी फणसाचे लागतील फिक्कट गरे
ही लाडिक भाषा भिडे हृदी जाउनी
बोलते जणू माझ्याशी लाजेत शब्द घोळुनी
हा शेवट केला तिने किती लाघवी
'चरणाची दासी' सांगा अधिकार कसा चालवी !
मी लिहिले होते, 'पत्र टाक लौकर'
तरी उशीर तिजला झाला धाडण्यास हे उत्तर
जलदिने पत्र तरी तिने लिहावे कसे ?
धबडका घरी कामाचा, आणखी खूप माणसे
सापडे सवड एवढी तिला कोठुनी
म्हणुन ती जागुनी रात्री लिहितसे पत्र चोरुनी
लिहिताना कोठे जरी खुट्ट वाजले
तरि असेल हे घाईने चोळीत तिने ठेविले
हे मिठास पत्रा, तुझे नशिब चांगले
तू तिच्या हृदयिचे ठोके कान देउनी ऐकले !

२९ सप्टेंबर १९३१
पुणतांबे

# ७६. काटा * *

( मदालसा-गझल

संक्रांतिच्या दिवशी मला हलवा दिला तू धाडुनी
सांभाळुनी हा ठेविला थोडाच त्यातिल खाउनी

कांत वेळी जेधवा येतेस तू माझ्या मनी
मी पाहतो याच्याकडे हा काढुनी ट्रंकेतुनी

रात्री अवेळी जागुनी, तू शेगडी शिलगावुनी
पाकामध्ये तिळ घोळुनी, केलास हा जिव लावुनी

मग रेशमी पिशवीमध्ये अलगेच याला घालुनी
पत्ता वरी लिहुनी दिला पोष्टामधे तू टाकुनी

दाणे किती हे पांढरे बगळ्याचिया पंखापरी
पावित्र्य का हृदिचे तुझ्या प्रतिबिंबले यांच्यावरी ?

आणीक या हलव्यामधे दिसतात दाणे केशरी
पघळून का प्रीती तुझी ओसंडली यांच्यावरी ?

हलव्यास या सखये तुझे कर लागले कितिदा तरी
म्हणुनीच का चढला बरे काटा असा याच्यावरी ?

१ ऑक्टोबर १९३१
पुणतांबे

# ७७. सासरी * *

( चाल- मशि बोलु नको रे )

पडलीस लेक धनिकाची मज गरिबाच्या घरी

बंगला तुझ्या माहेरी
आंतला थाट सरदारी
या इथे शेणमातीचे घर साधे सासरी

पातळे तेथ जरतारी
रेशमी ब्लाउझे भारी
मिळतील इथे खादीची तुज वस्त्रे पांढरी

दागिने अंगभर तेथे ।
विसरुनी जाय पहिले ते
भागेल ना तुझे येथे मंगळसूत्रावरी ?

फिरण्यास तिथे मोटारी
झुलतात माणसे दारी
लागेल करावी येथे तुज सेवाचाकरी

आकाश उमलते वेळी
उरकुनी सडारांगोळी
खोवुनी पदर कामाला लागत जा लौकरी

झाडून, सारवुन सारे
उरकून चूलपोतेरे
लागतील तुज थापाव्या ज्वारीच्या भाकरी

धबडका इथे कामाचा
दिनभरी उपस पाण्याचा
करुनिया नदीवर ये जा आणित जा घागरी

बोलले तुला जर कोणी
तर घेइ निमुट ऐकोनी
बिलकूल नये ओलांडू वडिलांची पायरी

घर हेच मानुनी राही
विभवात खरे सुख नाही
गरिबीतच कळुनी येई प्रेमाची माधुरी

२२ एप्रिल १९३४
नेवासे

# ७८. उशीर * *

( चाल– वैशाखमास वासंतिक )

मावळतीवरुन दिवस लागला ढळू
सांगितली वेळ पहा लागली टळू

उतरुनी उन्हे अभाळ लाल जाहले
चिवचिवाट पक्षी हे करित चालले
गाईंचे कळप घरा लागले वळू

वावरात गच्च पिके डोलडोलती
कणसांवर किरणे ही नाचनाचती
झुळुझुळुनी वारा हा बिलगतो हळू

विसरले न जागा मी, हाच तो झरा !
हाच तरू सांगितला तूच प्रियकरा
स्मरणाने पदर जरा लागला चळू

' देवदर्शनास ' असे सांगुनी घरी
मैत्रिणीस चुकवियले मी परोपरी
मुळि न दिले कोणाला काहिही कळू

जाहले अधिर अती भेटण्या तुला
पुसटही न दिसशी का अजुन तू मला ?
इवलासा वेळ तुला का नये मिळू ?

या निर्जन जागेवर मीच एकली
टाकिल अंधार अता गडद सावली
भीतीने लागतसे धीर डळमळू

येशिल तू खास, असे खातरी मला
बघण्याला अंत असा वेळ लाविला
उशिर लावुनी उगीच मज नको छळू !

२६ मे १९३४
नेवासे

# ७९. मुले आणि फुले * *

( सूर्यकांत )

इवली इवली मुले आणखी इवली इवली फुले
यांतिल कोणा पाहुन सांगा मन हे माझे झुले ?

इवली बाळे जणु आशेच्या किरणांचे कवडसे
इवली पुष्पे, मधुर रसाचे झरे वाहती जसे

इवली बाळे खुदखुद हसती हृदय करुन मोकळे
इवली इवली फुले फुलविती सौंदर्याचे मळे

इवली इवली मुले, वसंते रंग जणू टाकला
इवली पुष्पे जणु चंद्राच्या सुंदर सोळा कला

इवली इवली मुले आणखी इवली इवली फुले
काय करावे तुमच्यासाठी हेच मला ना कळे !

१२ डिसेंबर १९३५
कोल्हापूर

---

* सुप्रसिद्ध गुजराथी कवी ललित यांच्या 'बालको अने फूल' या कवितेचा अनुवाद.

# ८०. शरणचिठी * *

( कोकिळा )

राग तुझा हा सोड
लाडके, राग तुझा हा सोड

उणे बोललो तुज काहि तरी
रागाची येउनी तिरिमिरी
लगेच गेलिस तू माहेरी
होउन गेला महिना, आता जिवास लागे ओढ

बरीच केली तूही चुरचुर
चढला मजला घुश्शाचा भर
म्हटले, ‘ जाऊ द्या गेली तर ’
परंतु आता वाटे व्हावी आपुल्यात तडजोड

अपसुख येशिल आपण होउन
स्वस्थ राहिलो असेच वाटुन
परंतु आता मी कंटाळुन
‘ शरणचिठी ’ धाडतो तुला ही, उरलि न दुसरी तोड

चहा पिण्याचे मनात येता
स्टो नच येई मज पेटविता
सामानाचा नसतो पत्ता
आणि चहा तो हॉटेलातिल मुळी न लागे गोड

नको डबा हा खाणावळिचा
अगदिच आला वीट तयाचा
प्रयत्न करिता स्वैपाकाचा
बेबनाव होउनी चुलीशी, कितीक आले फोड !

वादळ होउन खवळे सागर
परि स्थिरस्थावर होई लौकर
फुटे न का तुज अजुनी पाझर ?
गच्च बांधलो गेल्यावर ही उगाच का धरसोड ?

पत्र मिळाल्यावर घाई कर
बिस्तरा तुझा आवर, सावर
गाठुन गाडी येई सत्वर
स्टेशनवर घ्यायला येतो, नको करू हिरमोड !

८ एप्रिल १९३६
पुणे

# ८१. स्वातीचे थेंब * *

( कोकिळा )

करुनी यातायात
पातलो आज तुझ्या दारात !

उतरलो न जों मी बोटीतुन
तोंच समजले हे परिवर्तन
गिळुन टाकले मूग, जिरविली आग आतल्या आत

दिवस रुपेरी आता येतिल
हा आशेचा उतरुन अंमल
दिसू लागले भकास भवती, झाली वाताहात !

गाव तुझे हे मज कळल्यावर
आलो झरझर, कापुन अंतर
बघुन घ्यावया तुज डोळाभर, कोराया हृदयात

आलिस बाहिर चाहुल ऐकुन
मजला पाहुन गेलिस चमकुन
जणू लागली केळ हलाया सुटता झंझावात !

एक वेळचा पाहुन प्रियकर
नको भयाने कापू थरथर
जहर न आलो कालवावया तुझिया संसारात

अंगावरली अहेवलेणी
फुलली पिवळी जणु फुलराणी
अशीच सांडो तुझ्या शिरावर सौख्याची बरसात !

ही शेवटली भेट आपुली
निघालोच हा परतपावली
बोल शब्द एखादा आता, अडवु नको ओठांत

अश्रु तरळते तव नयनांवर
पुसू नको ते अश्रूंचे सर
थेंब स्वातिचे असेच माझ्या पडू देत हातांत !

८ एप्रिल १९३६
पुणे

# ८२. बदामची राणी * *

(सुनीत)

रागाने भिवया जरा उचलुनी माझ्याकडे पाहशी
खाली घालुन मान, गप्प बसतो होऊन कासाविशी

एखादी उठली अठी जर तुझ्या गोऱ्या कपाळावरी
माझे काळिज हे लगेच उडुनी वाजे घड्याळापरी

ओठांच्या कुलुपातुनी जर तुझे बाहेर आले हसू
येतो स्वर्ग नजीक, शीव मजला लागे तयाची दिसू

एखादा अनमोल शब्द जर तू माझ्याकडे टाकला
माझा जीव जणू सुखात भिजतो, ऐसेच वाटे मला

काळे कुंतल गुंतवून मजला तू टाकले बांधुन
खेळे अंचळ वायुने, हलतसे त्याच्यासवे हे मन

प्रेमाचा गळ लावुनी हृदय हे काबीज केले पुरे
राणीच्या हुकुमाविना न मुळिही माझे सुकाणू फिरे

राणी लाल बदाम तू, हुकुम तो झाला म्हणोनी तर
एक्का इस्पिकचा असून मजला केलेस हाती सर !

५ मे १९३६
पुणे

---

Queen of Heart

## ८३. पन्हाळगड * *

( भिल्लीण-गझल )

हा उंच पुढे पाहुनिया दुर्ग पन्हाळा
डोळ्यांत चढे रक्त, उरी येत उमाळा !

नाही तलखी यास, मुळी घाम फुटेना
चेवून जरी दे चटके तीव्र उन्हाळा

धो धो पडते कोसळुनी पाउसपाणी
याला न तमा, साफ निघे फक्त धुराळा !

हा शांत उभा राहतसे ताठर किल्ला
दे पालटुनी कूस जरी भेट हिवाळा

दक्षीण करी सह्य गिरी काबिज सारी
देतोच जणू चुंबन हा उंच अभाळा

कोल्हापुरला राज्य करी वंश शिवाचा
झेंडा भगवा दूर दिसे, दे पडताळा !

ही गर्जतसे देवनदी पंचकगंगा
हे दृश्य असे पाहतसे रोज पन्हाळा

पूर्वी लढले येथ किती शूर मराठे
होताच तशी याद, उठे शीर कपाळा

ते शौर्य उरी चेतविती येथिल धोंडे
' व्हा मुक्त पुन्हा ', मंत्र असा देइ पन्हाळा !

२७ जानेवारी १९३८
पुणे

---

सुप्रसिद्ध गुर्जर कवी श्री. ललितजी यांच्या ' पन्हालाने किल्ले ' या कवितेचा अनुवाद.

# ८४. आशा * *

( गझल-पांडव दिडकी )

झोप आता, झाक डोळे, वेळ झाली तान्हुल्या
मीट आता पाकळ्या

खेळुनी केलास दंगा तू दुपारी सारखा
भागला नाहीस का ?

रांगण्याला ही पुरेना चंद्रमौळी झोपडी
अंथराया गोधडी

देउ मी झोका किती ? का पाहसी तू हासुनी ?
फाटक्या झोळीतुनी

खाउनी खस्ता तुझा हा कष्टुनी आला पिता
चालला झोपी अता

व्हायचे त्यांना सकाळी कारखान्याला रुजू
दे गडे, थोडे निजू

कष्ट घेती ते म्हणोनी आपणां लाभे बरी
मीठ आणि भाकरी

हात कामाला तयांच्या लाव, बोजा घे शिरी
होइ मोठा लौकरी !

१६ मार्च १९३८
पुणे

# ८५. शिदोरी * *

( चाल– उघडि नयन रम्य उषा )

घे पडशित वाटसरा, बांधुनी शिदोरी
देख मीठभाकरिची चाखुनी खुमारी
खाउनिया गोड घास
बसतसे मिठी घशास
चव ही वाटेल खास- आज तुला न्यारी
बघ हे माझे शिवार
नांगरले छानदार
घाम गाळुनी चिकार- पिकविली जवारी
कष्टाच्या जात्यातुन
पीठ काढले भरडुन
हृदयातिल धग लागुन-हो खरपुस भारी
जग अळणी प्रेमाविण
प्रेमाचे प्रतिक म्हणुन
मीठ दिले मी बांधुन- बघ लज्जत खारी
भाकरीत माझ्या गुण
द्रौपदिच्या थाळीहुन
देतो मी जरि ‘ बांधुन ’ —तरि न संपणारी
अंत ना असा प्रवास
घेतला करावयास
भूक लागता जिवास–सोड ही शिदोरी
तापल्यावरी दुपार
बैस सावलीत गार
घेइ घास दोन चार–येउ दे हुशारी !

२३ मार्च १९३८
पुणे

## ८६. दिवा ★ ★

( चाल : दृष्ट हिला लागली )

हुरूप आला नवा
दूरवर लुकलुक करितो दिवा

रात्र टाकिते पुढती पाउल
ढगाढगांतुन भिनले काजळ
गळती अंधाराचे ओघळ
लपले तारे, भकास दिसतो गगनाचा चांदवा

माळ पसरला अफाट पुढती
झाडे, झुडपे अवतीभवती
धोंडे, गोटे अडगळ करिती
पायवाटही दिसे न कोठे, सुचे न काहि जिवा

सुस्कारत, फिस्कारत वारा
उचकित पाचोळ्याचा भारा
ओसाडीतुन पळे भरारा
घुबड करी घू, किर्र बोलतो रातकिड्यांचा थवा

दिनभर वणवण चालुन चालुन
ठेचा लागुन, काटे बोचुन
पाय ठणकती, झाली चाळण
वल्ही मारुन दमला भलत्या दरियावर नाखवा

आग पेटली पोटी दारुण
तडके टाळू पाण्यावाचुन
भरे शिणवटा नसानसांतुन
त्राण न अंगी, प्रवास खडतर संपणार केधवा ?

परंतु सरली तळमळ, रुखरुख
समोर दिसतो प्रकाश बारिक
क्षणात उज्ज्वल, क्षणात अंधुक
दडून बसला जणु झुडुपांच्या कोंदाटित काजवा

असेल तेथे वस्ती, वापर
प्रपंच छोटा, छोटेसे घर
पाण्याने भरलेली घागर
चुलीत विस्तव धगधग, वरती असेल पडला तवा

मालक बाहिर येइल सत्वर
म्हणेल, 'या या,' दाविल आदर
खाउन भाकर, देइन ढेकर
हसून, गप्पा करून होइन ओटीवर आडवा

आशेने डवडवले अंतर
पाय लागले चालू भरभर
जीव जाहला अतीव आतुर
आले अंतर हे थोड्यावर, धीर धराया हवा !

१० जानेवारी १९४३
पुणे

# ८७. पाणवारा * *

( चाल–उघडि नयन रम्य उषा )

झेपावुनि अंगावर येत पाणवारा
'आली सर, आली सर' दे असा इषारा !

तरुलतिका हादरती
पानफुले थरथरती
ओघळती, चोहिकडे– उधळिती पसारा

गारवा करी बहार
बिलगती हळू तुषार
पालवला अंगावर– कोवळा शहारा

कलकलुनी हे विहंग
देति आसऱ्यास अंग
बगळ्यांची मात्र रांग– धावते भरारा

वेळावुन तरल मान
मोर घेइ उंच तान
थय् थय् थय् नाच करी– उभवुनी पिसारा

हो पश्चिम कुंद, सुंद
मेघ धावतात धुंद
एकावर एक असा– साचला ढिगारा

वीज लवे, चम् चमके
मारिते जणू फटके
धिग धडड गडड गुडुम्– गरजतो नगारा

तापली धरा विराट
पाहते तुझीच वाट
उतर पावसा मुकाट– ओत ओत धारा

कधि कलथा करिसि कुंभ ?
टपकला न अजुनि थेंब
गडगडून मारिसि का– उगिच येरझारा ?

होउनि अति चिंतातुर
शेतकरी बघतो वर
साफ नांगरुन वावर– थांबला बिचारा

अवलंबुन हा तुजवर
कर करुणा, धर पाझर
तुजवाचुन सांग कसा– व्हायचा गुजारा ?

ता. १०–१२–१९४३
पुणे

# ८८. वादळात * *

( चाल– भाव धरा रे )

जबर ये धोका
डगमगते माझी नौका

गच्च गदरले वरती अंबर
घोंगावत ये वारा भिरभिर
खवळुनि उसळे, उकळे सागर–घेतसे झोका

मेघ धावती गरजत गडगड
वीज चमकते, करिते कडकड
उठला दरिया झाडुन झापड-देइ पिळोखा

चढू लागल्या लाटा भरभर
पाण्यावरती उठले डोंगर
नाव चालली माझी वर वर–कोठल्या लोका ?

विराट अंबर, पिसाट वारा
अफाट सागर फुटला सारा
खवळुनि लाटा करिती मारा–वखत ये बाका

दणकत आला पाउस खळखळ
दात खाउनी घुमते वादळ
निसर्ग नाचे तांडव तुंबळ–देइ तडाखा

उरात काहुर, उरे न ताकत
सरली आशा, दिसे न धडगत
तुटली या दुनियेची संगत—हीच ये शंका

दूर किनारा, दूर दूर घर
नकोच ती सय, मन हो कातर
काळ पुढे ये, त्याला सत्वर–प्रभूजी रोखा !

तू असती हे विसरुन देवा
पूजिले न तुज, कुठली सेवा !
परंतु आता करितो धावा–मारितो हाका !

ता. ७–१–१९४४
पुणे

# ८९. आंधळा भिकारी **

( भूपतीवैभव )

हा अंध भिकारी काठी टेकित आला
द्या एकच पैसा, भीक एवढी घाला
उघडिला न याने जन्मापासुन डोळा
पाहिला न याने रम्य धरेचा गोळा
माहिती न याला प्रकाश अथवा रंग
दिनरात आपुला अंधारातच दंग
कुणि देइल काही, तेच तेवढे खावे
कुणि द्यावे, म्हणुनी भीक मागणे ठावे
सांगाल तुम्ही, पण कसे करावे काम ?
अंधास तरी द्या कामावाचुन दाम
हा अंध भिकारी रखडत खरडत येई
पसरितो पदर हा, कीव येउ द्या काही
द्या कान, शब्द हे ऐका–बापुडे
साकडे रुक्याचे एका–का पडे ?
हा गरीब, याचे तुम्हीच दादा, काका
कर खिशात घाला, एकच दिडकी टाका !

ता. १२–२–१९४४
पुणे

# १०. इषारा * *

(केशवकरणी)

उभा राहसी कशास टकमक पहात चोहीकडे
नीट जा समोर नाकापुढे !

दिनमणी लागला मावळतीला वळू
पाऊल तुझे का असे पाहते खिळू ?
चल, नकोस आता मधेच तू घुटमळू
पडेल झांजड, रजनी ओतिल अंधाराचे घडे
नीट जा समोर नाकापुढे !

तो कळस दूरवर अंधुक दिसतो अती
तुज दूर जायचे किती न याची क्षिती
चल उचल पावले, वाढव अपुली गती
वाट कठिण ही, बसतिल ठेचा, रुततिल पायी खडे
नीट जा समोर नाकापुढे !

दिसतसे जवळ ही सुरेख हिरवळ मऊ
फुलवरा डवरला, कोकिळ करितो कुहू
थबकुनी असा सौंदर्य नको हे पिऊ
मोह नको हा, पडेल याने पाउल तव वाकडे
नीट जा समोर नाकापुढे !

ता. १०-२-१९४४
पुणे

# ११. गळ्याची शपथ * *

गळ्याची शपथ तुला जिवलगा !

मुखी सुधेचा कलश लाविला
एकहि नाही घोट घेतला
नकोस घेऊ असा हिसकुनी, नकोस देऊ दगा

वेल प्रीतिची तूच लाविली
रुजली, फुटली, फुलू लागली
नको चुरगळू असा कठोरा, तूच राखिली निगा

तहान हरली, भूकहि हरली
एकच आशा उरात धरली
पुन्हा बोल ती नाजुक भाषा, तूच जिवाचा सगा !

ता. १६-६-१९४४
पुणे

# १२. अभिसारिका * *

चम चम चमके वर बिजली
दिसली, वाट मला दिसली !

दाट पडे अंधार, रात ही अडवाया सजली
ठेचा लागुन नाजुक माझी बोटे ही सुजली
'कुठली त्याची भेट व्हायला !' झाडे कुजबुजली
निराश होउन उरात माझ्या धडकी गऽ भरली
टप टप पडतो पाउस, लागे चमकाया बिजली
मुळी न परवा अंगावरली साडी जरि भिजली !

ता. ४-७-१९४४
पुणे

# १३. मृगजळ ★ ★

आग जिवा लागली
हरी रे, टाक तुझी सावली !

रण रण तापे ऊन, भडकली भवताली काहली
चटके बसती पायांखाली, भुई कढत तापली

घाम वाहतो झरझर, त्याची सुकुन वाफ जाहली
ओठ तडकती, डोळ्यामधली डळमळते बाहुली

पुरे नखाचा एक कोपरा, उचल जरा अंगुली
हात पसरता साल जगाची मिठीमधे मावली

गरीब हरिणी कळपामधुनी धुडकारुन लावली
दिसते पाणी, परी न पाणी ! भिरभिरुनी भागली

तुझ्या हातच्या शितोड्यावर आशा अडकावली
तुझ्या मुठीतुन गंगामाई धो धो धो धावली

बाप दारचा तूच, घरातिल तूच मायमाउली
हाक मारिते जीव तोडुनी, पोर तुझी कावली !

ता. १८-२-१९४५
पुणे.

# १४. क्रांतीचा ओनामा * *

भिवयांच्या खोबणीत—माझ्या बाळाचे ग डोळे
जसे विस्तवाचे गोळे

उंच कपाळाच्या खाली—माझ्या बाळाचे ग नाक
जशी जंबियाची फाक

इवलाले लाल लाल—माझ्या बाळाचे ग ओठ
जसे पोवळ्यांचे गोठ

लवतसे चुटुचुटु—माझ्या बाळाची जिभली
जशी ढगात बिजली

× × ×

बाळा, उगारून मुठी—फोड पहाड, फत्तर
काढ पिळून अत्तर

बाळा, हलवून पाय—सारा हलव डोंगर
ओढ पाण्याचे पाझर

बाळा, फुगवून छाती—मोठे उठव वादळ
पाड पालथे जंगल

बाळा, वटारून डोळे—ओत तांबडे इंगळ
कर जाळून काजळ

× × ×

पाड जुनेपाने घर—बांध नवा सोपा, माडी
मांड नवी वस्तीवाडी

कर शेतांचा खुर्दळा—घाल पिकामध्ये पिंगा
कर उभ्या नव्या बागा

काटयाकुटयांनी कोंदल्या—मोड जुन्या पायवाटा
बांध नवे रस्ते, पेठा

तोड जुन्या वहिवाटी—मूठ आवळी, हो सज्ज
नवा दांडू, नवे राज्य !

२४ फेब्रुवारी १९४५
पुणे

# १५. पऱ्यांचे गाणे * *

चल, चल, धरतीवर उतरू
छुम् छुम् छननन नाच करू

मी पहिली, ही दुसरी
मी दुसरी, ही तिसरी
सुंदर पंख हळू पसरू

रात पडे, चांद चढे
ओरडती रातकिडे
हलती, डुलती तालतरू

गवत किती मउ हिरवे
चल, मिळवू हळु तळवे
लगबग लगबग हात धरू

गगन वरी नाच करी
जग अवघे फेर धरी
नाच पऱ्यांचा होय सुरू

घ्या गिरकी, घ्या फिरकी
पूर्व दिशा हो भुरकी
दहिवर दिसता परत फिरू !

८ जानेवारी १९४७
पुणे

## १६. पुढे * *

उचल पाय, उचल पाय, उचल पाय, हो पुढे
शिंग वाजले, निनाद उंच उंच हा चढे !

चालसी कशास मंद ?
कोणता जिवास बंध ?
दूर दूर राहिले तुझे उदास झोपडे

माळ हा पुढे अफाट
रान दाट, तुंग घाट
लंघुनी तुला अजून जायचे पलीकडे

फडकते तिथे निशाण
गाठण्यास ते ठिकाण
लावुनी पणास प्राण, हो पुढे, पुढे, पुढे !!

११ जानेवारी १९४७
पुणे

# १७. सासुरवास * *

दमले ग बाई !

पुढ्यात भांडी बसले घेउन
लख्ख काढली घासुन घासुन
तरी गरजते सासू आतुन

तडतडते लाही !

ओढ्यावरती धुणी उपशिते
चुबकित बसता दुपार सरते
डगरीवरती नणंद दिसते

टपुन उभी राही

उसंत नाही, काम दिवसभर
रात्री पडता अंथरुणावर
हात तिकडचा ये अंगावर

फुलती जुइजाई !

२२ ऑगस्ट १९४७
पुणे

# ९८. परवाचा * *

नाहि आजचा, नाहि कालचा, अगदिच परवाचा
कशी मी घोकू परवाचा ?

सहा दुणे बारा, चार त्रिक बारा
तीन चोक बारा, गोंधळ सारा !
एकच बारा या पाढ्यांतुन किती फिरायाचा !

एक पाव पाव, एक दिडे दीड
पावकी, दिडकी – सारी गिचमीड
रोजरोजचा हा परवाचा, त्रास किती याचा !

आइ मला सांगे, 'बैस घोकायाला'
दटावुन बाबा जाती फिरायाला
आम्ही पडलो लहान म्हणुनी धाकच सगळ्यांचा !

परसात आल्या शेजारच्या पोरी
खेळतात सारे, मला मात्र चोरी
दगड मारुनी झाडावरल्या पाडतात चिंचा

पाच एके पाच, वाजले की पाच
पुरे परवाचा, उठते आताच
रुसते, फुगते, जाउन धरते आईचा ओचा !

१२ एप्रिल १९४८
पुणे

# १९. बिचारा मामा * *

( चाल—जो जो रे जो जो )

मामी नेसली पातळ भारी
थाट करूनी ठाकली दारी
जुन्या कोटात उभा शेजारी–बिचारा मामा !

मामी घालिते नवा पोलका
जरीचे काठ, जरीच्या टिका
घाली सदरा जुना फाटका–बिचारा मामा !

तोंडा सफेती लावुनी नीट
मामी रेखिते कपाळी तीट
वाढले किती दाढीचे खुंट ! बिचारा मामा !

सैल अंबाडा बांधुनी वर
मामी घालते वेणी सुंदर
शेंडी उडते टोपीबाहेर – बिचारा मामा !

मामी टांग्यात बसे जाऊन
टांगा सगळा जाई भरून
पुढे बसतो अंग चोरून – बिचारा मामा !

मामी गर्जते जोरजोरात
घुमे आवाज साऱ्या रस्त्यात
पुटपुटतो हळु ओठांत – बिचारा मामा !

मामी बाजार करी पेठेत
सौदे ठरवी, घाली हुज्जत
संगे घेऊनी बोजे हातात – बिचारा मामा !

म्हणे मारितो मामा मामीला
म्हणे फुटाणे चारी आम्हांला
परी उलटा दिसे मामला – बिचारा मामा !

२५ जून १९४८
पुणे

# १००. दमयंतीचे गाणे ★ ★

(अक्रूर)

बघ पडला रे, फासा उलटा पडला
चल, जाऊ वनवासाला !
ते राज्य नको, नको नातलग सारे
मनि त्यांच्या काळेबेरे

का उगाच तू हळहळसी नळराजा ?
चल पुढे, हात धर माझा
तो पुष्कर, दुष्कर भाऊ
तव वैभव सजला घेऊ
तू नकोस वळुनी पाहू
ही दमयंती आता एकच तुजला
चल, जाऊ वनवासाला !
ही थंड हवा, अंग तुझे का उघडे ?
घे फाडुन अर्धे लुगडे
का दाखविसी वाट तिकडची मजला ?
जायची न माहेराला
मज भीति न वनवासाची
मज पर्वा नच कष्टांची
काळजी मला नाथांची
तू मात्र नको सोडुन जाऊ मजला
चल, जाऊ वनवासाला !

११ मार्च १९४९
पुणे

# १०१. वादळ * *

( लावणी )

आले वादळ वरती भरून
        वीज कडकडून चमकते बाई !
चल, उचल पाय भरभरा
        जाउ दे घरा, सख्या, कर घाई !

अंगास झोंबतो वारा
टपकती तडातड गारा
झडझडून येतिल धारा
हे लुगडे जाइल भिजून
        समज तरी अजून, ऊठ लवलाही !

हा खेळ पुरे प्रीतीचा
घरि मला धाक सगळ्यांचा
तू चावट रे मुलुखाचा
मी कुळवंताची नार,
        मला संसार, लाज तुज नाही !

२८ मार्च १९४९
पुणे

# १०२. विडा * *

(लावणी)

राजसा, राग का असा? थोडं तरि हसा
जवळ मी बसते–जवळ मी बसते!
हे पान गजरलं छान, विडा मी करते!

काढते देठ, लावते केशरी चुना जी
बारीक सुपारी कातरते मोहना जी
टाकते कात, लावते जरासा हिना जी

प्रियकरा, काय ही तऱ्हा! बोला ना जरा,
विनवणी करते–विनवणी करते! १

वेलची टपोरी सोलुनिया घातली जी
गोविंदविड्याची घडी छान बांधली जी
ही कट्यार काळी उरामधे खोचली

घ्या विडा, प्रीतिचा पुडा, लाल तांबडा
ओठ रंगवते–ओठ रंगवते! २

१२ ऑगस्ट १९४९
कोल्हापूर

# १०३. दिवाळी * *

आली ग आली दिपवाळी

थंडीचा काळ
स्वच्छ आभाळ
सृष्टी हिरवी मखमाली

चला ग बाई
करू सफाई
काढू अंगणी रांगोळी

लोंबे दाराशी
दिवा आकाशी
पणत्यांच्या ग, कर ओळी

भल्या पहाटे
गंमत वाटे
होती भुडभुड आंघोळी

खाऊ करंजी
मिठाई ताजी
खाऊ कडकड कडबोळी

बांधू मजेचा
किल्ला मातीचा
मांडू शिपाई, दे टाळी

लडी पेटवा
दारू उडवा
बाण फेकू या आभाळी

लक्ष्मी पुजा
पुजू सारजा
टिळा लावितो मी भाळी

सण वर्षाचा
किती हर्षाचा !
साडी मागते घरवाली

बीज भावाची
रंकरावाची
ताई भावाला ओवाळी

हसू दिवाळी
खेळू दिवाळी
नाचगाण्याच्या कल्लोळी !

१६ नोव्हेंबर १९५९
पुणे

# १०४. जनाबाईचे गाऱ्हाणे * *

देव माझा वेडा ग वेडा
ताळ सोडला, मेळ सोडला, कसा इतका भावडा !

पाणी भरतो, दाणे दळतो, झाडुन शिंपतो सडा
धुतो धुण्याची मोट बापडा, घाशी चंदनखोडा

कधी नेसतो पंचा, धोतर, कधि काठी, घोंगडा
करतो कामं भलतीसलती, त्यास न बुडखा झेंडा

कुठेही जातो, कधीही जातो, विचार नाही थोडा
आवळा देउन याच्यापासुन खुशाल कोहळा काढा

खातो उष्टे घास कुणाचे, खातो कळणाकोंडा
अलाबला मी घेते बाई, दृष्ट ग याची काढा !

७-१-१९६४
पुणे

# १०५. मुग्धा **

मी खुळी, कोवळी कळी
मला ग माहित नाही मुळी

एक रानवट येतो भुंगा
गुंगत, रंगत करतो दंगा
झटतो माझ्या नाजुक अंगा
ओरबाडतो मखमल माझी, चुरगळतो पाकळी

फिरफिरुनी हा मारी चकरा
खातो दहिवर, देतो टकरा
छळतो मजला, करतो नखरा
हिरव्या मखरामधली राणी का करतो खिळखिळी ?

तो आल्यावर चिडते, रडते
नच आला तर मनात कुढते
का कुढते हे कोडे पडते
वाट पाहते, उगाच बसते अळीमिळी गुपचिळी !

१८-२-१९६४
पुणे

# १०६. तयार आम्हीं * *

सरहद्दीवर सज्ज आमुच्या बलशाली तोफा
पल्याड शत्रू, आल्याड आम्ही, खडा आमुचा ताफा

माथ्यावरती बर्फच बर्फ
तो ओलांडुन आले सर्प
'किती उंच मी!' चढला दर्प
हपापलेल्या डोळ्यांपुढती लडाख आणिक नेफा

पुढे ठाकला खडतर धोका
तयार टिपरी, तयार डंका
तयार शत्रू, नाही शंका
लचके तोडायला वाटला भारत का सोपा ?

आज उद्याला होइल हल्ला
मग बर्फाचा लढवू किल्ला
थेट मृत्युचा गाठू पल्ला
मरता मरता काढू वचपा, अंत न संतापा

मोर्चे बांधुन उभा पहारा
गडबड दिसता करू इषारा
नको न्याहरी, नको निवारा
चापावरती बोट आमुचे, नकोत आम्हां झोपा

निशाण हाती, प्रणाम त्याला
प्रणाम करितो शिवरायाला
प्रणाम अमुच्या मायभूमिला
बोला, 'हरहर महादेव जय,' सत्वर आटोपा !

१० ऑगस्ट १९६४
पुणे

# १०७. मोटवणावरले प्रियाराधन * *

( विडंबन गीत )

सखे, तू असं ग काय करती ?
तुजवरती माझी पिरती
चल फिरू मळ्यात
चल फिरू खळ्यात
करू विहार तळ्यात
वर अस्मान, खाली धरती
बघ माझं शिवार
कुठं पिकली जवार
कुठं पिकली गवार
ढवळ्यापवळ्या पाला चरती
तु बाइल ग नवतरणी
बैसलीस या मोटवणी
लागला जीव हा झुरणी
तुझी होइल मजला स्मिरती
शेतीचा अमुचा धंदा
न्हयारीला भाकरकांदा
लग्नाचा पटवू सौदा
दे वचन मला या वखती !

११-९-१९६१
पुणे

* खेड्यामध्ये कधीही न फिरकलेल्या शहरवासी कवीने मारून मुटकून बनवलेले ग्रामीण गीत. म्हणून मग तळ्यातला विहार, ढवळ्यापवळ्यांना पाला वगैरे. आणि पिरती, स्मिरती अशी शब्दांची मोडतोड.

# १०८. सुनीता * *

( जाती-मंजिरी )

( १ )

ही अल्लड मुलगी तेराचवदातली
   शाळेत पुस्तके घेउनिया चालली
राहिले मुखावर गोड हास्य गुंतुनी
   आनंद शिगोशिग सांडे डोळ्यांतुनी
पांखरापरी ही चंच दिसे; कारण
   नच गळ्यात काळ्या पोतीचे बंधन !

(२)

बसलीस किशोरी, अलगद झोक्यावरी
   दिसतेस चवळिच्या लवचिक शेंगेपरी
चढविलास झोका उंच उंच अंबरी
   कमरेत वाकशी करकर वेतापरी
देशील जेधवा झोका तव बालका
   शिडशिडित बांधा असाच दिसणार का ?

(३)

घेऊन शुभ्र हा पेळू डाव्या करी
   ही सूत काढिते अपुल्या टकळीवरी
नेसली खादिची भरडी साडी जरी
   दिसतसे तरी पण सुरेख चित्रापरी
मस्तवाल पोरी, चाललीस येथुनी
   त्या सुतात माझे मनही गुंडाळुनी !

( ४ )

गवताचा भारा आली घेउन शिरी
पेठेत चालली विकावया सुंदरी
खणखणा वाजती पायांतील जोडवी
मुसमुसे शरीरी यौवनशोभा नवी
टकमका पाहती लोक राहुनी खडे
कमरेस कोयती पाहुन जाती पुढे

( ५ )

पाहिली गुदस्ता हिला फिकट पांढरी
इतुक्यात कशी ही बदलुन गेली पुरी !
टवटवित लागली दिसू केवड्यापरी
जणु अडूळ लिंबू फुटले अंगावरी
हो खरेच, झाली अता आठवण बरी
लागली हळद हिज गेल्या मार्गेसरी

( ६ )

घेऊनी धण्याचे खांद्यावरती पिळे
चालली घरी ही, मुखी घाम ओघळे,
सारखी शिरावर करताना चुंबळ
डुमडुमुक वाजते घागरीतले जळ
लगबगा अशी का ठेचाळत चालली ?
का हाक पोचली हिला पाळण्यातली ?

( ७ )

डोळ्यांत या तुझ्या कमळण पाणी भरी
तनु तुझी तिर्येच्या नाजुक देठापरी
हसतेस अशी की लाटच पाण्यावरी
लागतो स्पर्श तव ओल्या रेतीपरी
जलदेवी दिसशी मूर्तिमंत तू मला
का दिसति न माझे अधर कोरडे तुला ?

# १०८. सुनीता * *

( जाती–मंजिरी )

( १ )

ही अल्लड मुलगी तेराचवदातली
  शाळेत पुस्तके घेउनिया चालली
राहिले मुखावर गोड हास्य गुंतुनी
  आनंद शिगोशिग सांडे डोळ्यांतुनी
पांखरापरी ही चंच दिसे; कारण
  नच गळ्यात काळ्या पोतीचे बंधन !

(२)

बसलीस किशोरी, अलगद झोक्यावरी
  दिसतेस चवळिच्या लवचिक शेंगेपरी
चढविलास झोका उंच उंच अंबरी
  कमरेत वाकशी करकर वेतापरी
देशील जेधवा झोका तव बालका
  शिडशिडित बांधा असाच दिसणार का ?

(३)

घेऊन शुभ्र हा पेळू डाव्या करी
  ही सूत काढिते अपुल्या टकळीवरी
नेसली खादिची भरडी साडी जरी
  दिसतसे तरी पण सुरेख चित्रापरी
मस्तवाल पोरी, चाललीस येथुनी
  त्या सुतात माझे मनही गुंडाळुनी !

( ४ )

गवताचा भारा आली घेउन शिरी
पेठेत चालली विकावया सुंदरी
खणखणा वाजती पायांतील जोडवी
मुसमुसे शरीरी यौवनशोभा नवी
टकमका पाहती लोक राहुनी खडे
कमरेस कोयती पाहुन जाती पुढे

( ५ )

पाहिली गुदस्ता हिला फिकट पांढरी
इतुक्यात कशी ही बदलुन गेली पुरी !
टवटवित लागली दिसू केवड्यापरी
जणु अडूळ लिंबू फुटले अंगावरी
हो खरेच, झाली अता आठवण बरी
लागली हळद हिज गेल्या मार्गेसरी

( ६ )

घेऊनी धण्याचे खांद्यावरती पिळे
चालली घरी ही, मुखी घाम ओघळे,
सारखी शिरावर करताना चुंबळ
डुमुडुमुक वाजते घागरीतले जळ
लगबगा अशी का ठेचाळत चालली ?
का हाक पोचली हिला पाळण्यातली ?

( ७ )

डोळ्यांत या तुझ्या कमळण पाणी भरी
तनु तुझी तिर्येच्या नाजुक देठापरी
हसतेस अशी की लाटच पाण्यावरी
लागतो स्पर्श तव ओल्या रेतीपरी
जलदेवी दिसशी मूर्तिमंत तू मला
का दिसति न माझे अधर कोरडे तुला ?

( ८ )

काकडीसारखी काया तव कोवळी
 की हलते हलक्या वाऱ्याने कर्दळी ?
रुळतात रेशमी बटा कपाळावरी
 लागती मृदुल हे गाल मखमलीपरी
तारतम्य नाही विधिस राहिले कसे ?
 का हृदयच त्याने केले दगडी असे ?

( ९ )

हे अधर तुझे, छे ! ही सागरपोवळी
 हे दात कशाचे ?–या मोत्यांच्या वळी
श्वासात गारवा समुद्रवारा जणू
 हे डोळे तुज का 'मीनाक्षी' मी म्हणू ?
सागरासारखिच अथांग असशी सदा
 नच कळे हृदी तव हालाहल की सुधा !

( १० )

हा भांग तुझा स्वर्गंगेला लाजवी
 हा मंगळ–कुंकू कपाळास शोभवी
ही चंद्रकोर, की पडते गाली खळी ?
 चांदणे पिकविते हास्य तुझे भूतळी
उचलुनी चेहरा जवळ तुवा आणिला
 हा स्वर्ग राहिला दोनच बोटे मला !

( ११ )

हे डोळे सुंदर, फुलली कमळे निळी
 तरतरित नाक, ही पिवळी चाफेकळी
हे दात तुझे, की कुंदकळ्यांचे सर ?
 ओठांत गदरला जास्वंदीचा भर
फुलमाळिण दिसशी मूर्तिमंत तू मला
 दे फूल मला तू एकच हुंगायला !

( १२ )

हे नयन तुझे, की टपोर ही भोकरे ?
हे गाल तुझे, की सफरचंद गोजिरे ?
हनुवटी तुझी, की आंब्याची कोयटी ?
हे पिकले जांभुळ काय ओष्टसंपुटी ?
फळबाग मजपुढे जिकडे तिकडे फळे !
यातले कोणते खावे मज ना कळे !

( १३ )

तव अधरी भरली द्राक्षांची माधुरी
रसरसले यौवन टपोर घोसापरी
तव शीतल आलिंगनी, वाटते मनी
मांडवाखालती बसलो सायंतनी
तव रूपाची मज पाजुनिया वारुणी
उठविले गडे, तू मला माणसांतुनी !

( १४ )

खाउनी नेहमी नागवेलिचा विडा
शिपिसी तांबडा ओठावर तू सडा
मेंदीची तुजला हौस तरी केवढी
करितेस नखे तू बोटांची तांबडी
पण रंग असा कां उसना घेसी गडे ?
हा गालावर बघ साठा उघडा पडे !

( १५ )

ठेवुनी केस हे तेलाविण कोरडे
बांधलेस त्यांचे सुरेख चक्कर गडे
विस्कळून थोडे होउ नये वाकडे
चेपुनी म्हणुन तू खोविलेस आकडे
पण हृदय तुझे का स्नेहाविण कोरडे ?
पकडतेस मासे का लावुन आकडे ?

( १६ )

" छे, मुळीच नाही शक्य ! " असे सांगुनी
 गेलीस निघुन तू माझ्या खोलीतुनी
घाईत सांडला काटा केसातुनी
 ठेविली जपुन ही जिन्नस मी उचलुनी
मी चढलो नाही अजुन बोहल्यावरी
 हा काटा पाहुन सलतो काटा उरी

( १७ )

पटल्यावर ओळख आपआपुल्या मना
 प्रेमाचा चढलो आपण अवघड जिना
मी घाटावरला देशस्थ ब्राह्मण
 तू गौर कुमारी कोकणकडली पण
डोंगरावरील मी असे आवळा, पण-
 तू मीठ, लोणचे घालू या आपण !

( १८ )

अंगणात आमुच्या आम्रतरू बहरला
 त्यावरती मोहर गच्च दिसे गदरला
घातला पाचुचा ढीग कुणी अंगणी ?
 त्यावरी पसरला थर मोत्यांचा कुणी ?
हे उघड्यावरती पडे जवाहिर किती
 सजवू का माझी ' लंकेची पार्वती ' ?

( १९ )

अंगणात आपण फुलझाडे लाविली
 घालुनी तयांना पाणी जोपाशिली
लहडली फुले ही झाडाझाडांवरी
 हा गंध वाहतो तुझिया श्वासापरी
पारिजात शोभा देत असे अंगणा
 तुजसवे वाटतो स्वर्ग मला ठेंगणा !

( २० )

" हे कपाळ दुखते, " असे बोलता तिला
 ती बाम घेउनी लागे चोळायला
गुलगुलीत बोटे जशी लागली फिरू
 तसतसा लागला पारच ठणका जिरू
पण हळूच वदलो, उचलता न पापण्या,
 " छे, अजुन कशा या थांबती न झिणझिण्या ! "

( २१ )

तापात गुंगुनी पडलो गादीवर
 ती उशास होती बसली चिंतातुर
लागली झोप मज, असेच तिज वाटले
 वाकुनी मुखावर हळुच ओठ ठेविले
औषधे इतर ती देतो मी फेकुनी
 घेतले परंतू हे गुपचिप राहुनी

( २२ )

झरझरा चालते तुझी सुई घाइने
 कणकणा वाजती हातांतिल काकण
हा रुमाल विणुनी तयार झाल्यावर
 देईन खोवुनी खिशात वरच्या वर
काढलेस माझे नाव एक बाजुला
लागतो उखाणा का मग ते घ्यायला ?

( २३ )

बाहेरुन येता दिसलि न दारी सखी
 पहुडली पांघरुन चादर ही मंचकी
उघडिले नयन, पण मुळि न बोलता मशी
 चुळबूळ करुनिया फक्त बदलली कुशी
" चल ऊठ ! दे मला चहा करुन सिगल
 हे पुरे चहाच्या कपातले वादळ ! "

( २४ )

धरि कवेत रविला आवळून पश्चिमसा
  रजनीला बिलगू बघतो हा चंद्रमा
चोचीत घालिती चोच पहा पांखरे
  घासतात शिंगे शिंगांवरती गुरे
चल, आटप सखये, जाइल अंधारुन
  हातात घालुनी हात फिरू आपण

( २५ )

मज सिगारेटचा शौक जरा लागला
  हा धूरपणा मम माहित नव्हता तिला
ओढली एकदा घरी तलफ येऊनी
  तिज वास पोचला चूलघरी जाउनी
बाहेर येउनी झणक्याने बोलली,
  " मजपेक्षा का ती प्रीय तुम्हां जाहली ? "

( २६ )

बघु नको रोखुनी भिवयांच्या कामट्या
  कर साफ गडे त्या भालावरल्या अठ्या
सार तू जराशा मागे कुरळ्या बटा
  कर कमी गुलाबी गालांचा फुगवटा
सोडुनि राग हा, बोल गडे लौकर
  घालीन गळ्याची शप्पत नाही तर !

( २७ )

दिलि आज पाठवून माहेराला सखी
  चालली जिवाची तगमग ही सारखी
घर ओकेबोके दिसावया लागले
  उशिवरी पेटले डोके मी टेकले
' गुड नाइट् ' दिसली अभ्र्यावर अक्षरे
  जायची कशी ही रात्र चांगली बरे !

( २८ )

जाउनी लगबगा बसलो जेवायला
घेतो न घास तों गुचकी लागे मला
" बायको आठवण करी, " बोलले कुणी
मी तसाच उठलो भात फक्त खाउनी
मज ध्यास तिचा हा पाहिजेच सोडला
येईल वाळुनी नाही तर प्रेमला

( २९ )

एकटाच गेलो सहल कराया दुरी
बैसलो झऱ्याच्या जवळिल खडकावरी
तांबूस गोल हे गवती फुल पाहुनी
मज तिच्या नखाचे स्मरण जाहले मनी
ती तिची अंगुली गोवुनी हातामधी
मी फिरावयाला येइन इकडे कधी ?

( ३० )

हा रुमाल सुंदर जाताना तू दिला
दे वरचेवर हा तुझी आठवण मला
हे प्रतिक तुझे मी घेतो हुंगावया
घमघमतो अजुनी यावरला पाँपिया
मारलीस बारिक गाठ एक बाजुला
हो, पत्र हवे तुज आज पाठवायला !

( ३१ )

पाकीट गुलाबी पोष्टमनाने दिले
हा सुगंध त्याचा हवेमधे दरवळे
काढुनी गुलाबी कागद मी आतले
झरझरा सखीचे गोड पत्र वाचले
धाडले तिने जे मज या पत्रातुन
ते काढुन घेतो यास ओठ लावुन

( ३२ )

टुमदार बंगली, बाग भोवती खुले
ती परडी घेउन खुडिते सुंदर फुले
बाहेर जायचे, गरम सूट घातला
ये मोटर दारापुढे, हॉर्न वाजला !
होउनी गजर मी उठलो झोपेतुनी
हे स्वप्न जातसे लवकर का संपुनी ?

( ३३ )

" मज नकोस देऊ ही मेथीची जुडी
ए भाजीवाली, दे कवळी काकडी
तुजपाशी असतो माल चांगला मुली,
देणार कोणत्या भावाने तोंडली ?"
" हे तरुणा, जाई परत, ही न तोंडली,
ही मिरची पिकुनी लाल लाल जाहली ! "

( ३४ )

झिरमीर बरसतो पाउस अंगावरी
मी भिजून गेले चिंब तयाने पुरी
गावच्या शिवेवर एकलीच मी उभी
दिपविते नयन ही चमकुन बिजली नभी
भेटल्यावरी तू होइल भीती कमी
वाळतील कपडे याची वाटे हमी !

( ३५ )

ही पिकली पाने घेउन केला विडा
घवघवेल अपुल्या मुखी जर्द तांबडा
घातली यात मी सोलुनिया वेलची
छे मुखात घ्यावा, हातात न द्यायची
मजसाठी न पण मी करायची वेगळा
द्याल ना गडे, मज थोडासा यातला ?

( ३६ )

उडतसे पदर तव भिरभिर वाऱ्यावर
  हा मनात माझ्या उडवितसे काहुर
हे शीड प्रीतिचे जाउ नये भडकुन
  दातात म्हणुन तू टोक दिले अडकुन
तुज शरण येत मी दाती धरुनी तृण
कर पुढे पदर तू, घे मजला बांधुन

( ३७ )

हे गुलाबी फुलले तुझिया गालांवरी
  बोचतील काटे, भीती माझ्या उरी
तू पिवळी पिवळी जर्द केवडयापरी
  बिलगता तुला मी कापिल करवत परी
पण शहारुन ये काटा, भय हो दुरी
  घातले प्रीतिचे चिलखत अंगावरी !

( ३८ )

डोळयांत या तुझ्या झळक मारिती हिरे
  माणीक तांबडे ओठांवरती विरे
हुरमुजी मौक्तिके एकसरीने मुखी
  पोवळी नखांवर लागतात सार्थकी
ही अमूल्य रत्ने नैसर्गिक कोंदणी
  मी रत्नपारखी, बघु दे मज निरखुनी

( ३९ )

कचभार विपुल तव त्यावर घालायला
  ही सुरेख, ताजी वेणी अणिली तुला
खेटून गुंफिल्या कळया गुलाबापशी
  डोकवी मधूनच लोकर ही थोडिशी
चल, मीच बांधतो, नकोस होऊ श्रमी
  हलतेस अशी का ? खातो तुज काय मी !

( ४० )

बांधलेस जर तू केसांचे चक्कर
   तर फिरू लागते शिरि माझ्या चक्कर
नागीण ठेविली खेळत मागे जर
   लागते भयाने कलकल करु अंतर
सोक्षमोक्ष लावुन कर मजला मोकळा
   पण नकोस कापू केसांनी तू गळा

( ४१ )

उडतसे पदर तव फडफड वाऱ्यावरी
   फडकते काय हे निशाण किल्ल्यावरी ?
आवळून कंबर बांधलीस मेखला
   अडविण्यास अरिला तट हा का बांधिला ?
देतसे इषारा किल्लेदारा, तुला
   हा निघालोच मी वेढा घालायला !

★

परिशिष्ट

( श्री. वि. स. खांडेकर यांनी ‘ सुगी ’ या ग्रामीण कवितासंग्रहाला लिहिलेली प्रस्तावना )

# वानगी

श्री ठोकळ यांनी ‘ सुगी ’ ला प्रस्तावना लिहिण्याच्या कामी माझी योजना का केली, याचे माझ्याप्रमाणे अनेकांना कोडेच पडेल. वाचकांकडून पैसे घेऊन हे कोडे सोडविण्याकरिता बक्षीस लावण्याची शक्यता नसल्यामुळे मीच ते उलगडण्याचा प्रयत्न करतो. काव्यसंग्रहाला प्रस्तावना लिहायला अधिकारी पुरुष, उत्कृष्ट कवी हाच होय. त्या दृष्टीने पाहिल्यास, उद्या एखाद्या मराठी विनोदी लेखकाला औट घटकेचे राज्य मिळून त्याने आपल्या काव्यपिनलकोडाप्रमाणे शिक्षा फर्माविल्या, तर ( अहिनकुल, इळाभोपळा हे जुने स्नेही सोडाच, पण अत्रे-वरेरकर अगर अलमगीर-भोपटकर या आधुनिक जीवश्चकंठश्च ( ! ) मित्रांना लाजविण्याइतके मराठी विनोदी लेखक व कवी यांचे रहस्य आहे, हे काय सांगायला पाहिजे ! ) माझ्या अनेक कविमित्रांना फाशी अगर जन्मठेप मिळेल, पण माझी मात्र थोडयाशा दंडावर सुटका होईल, अशी माझी खात्री आहे. ( फाशीची शिक्षा झालेल्या कविमित्रांवर नवीन कविता लिहून दंड वाढवून घेण्याइतका मी वेडाही नाही. ) माझी कविता वाचताना जांभया येऊ लागतात, असे नुकतेच माझ्या एका चहात्याचे मत मी वाचले. सध्या निद्रानाशाच्या रोगाचे प्रमाण वाढत आहे, असे म्हणतात. अशा वेळी माझा काव्यसंग्रह प्रसिद्ध केला, तर तो निश्चित खपेल, काव्यानंद नसला तरी निद्रानंद तो देऊ शकेल, या कल्पनेने मी तो प्रसिद्ध करून त्याला प्रस्तावना जोडली असती, तर ते योग्य झाले असते ! पण ही प्रस्तावना—

वहिवाट अगर रसिकता या दृष्टीनेही ही प्रस्तावना लिहिण्याचा हक्क मला पोचत नाही. वी कवींनी महाराष्ट्रकवींच्या परंपरेला अद्यापि खंड पडला नाही,

अशी ग्वाही एका कवितेत दिली आहे. पण महाराष्ट्रातले प्रस्तावनाकारही या बाबतीत कवींना हार जाणार नाहीत. दुर्दैवाने मी मात्र या परंपरेतला नाही. रसिकतेची गोष्टही थोडीशी तशीच आहे. तिखट टीकाकार म्हणून ज्याची प्रसिद्धी, त्याच्या अंगी प्रस्तावकाला साजेल अशी गोडीगुलावी कुठून असणार ? त्याच्याकडे ही कामगिरी द्यावयाची म्हणजे कुत्रे इमानी आहे, म्हणून सरस्वतीच्या वाहनाच्या जागी त्याची नेमणूक करण्यापैकीच प्रकार व्हायचा ! व्हायचा कसला ? झालाच म्हणा ! या बनावाची मुख्य कारणे दोन आहेत. पहिले— ठोकळ कवी आहेत. या संग्रहातील पृ. ८३ वरील त्यांच्या कवितेतील गरीब यजमान अपरिचित पाहुण्याची यस्थास्थित उठाबस करून म्हणतो—

' जायचं ' काय म्हंगता ? झोप घ्या जरा
जाताल उद्या का घाई ? छेः बेत नव्हं हा बरा ! ”

अनोळखी पाहुणा लफंगा असेल, हा विचार ज्याच्या काव्यनायकाच्या मनाला शिवतसुद्धा नाही, तो प्रेमळ कवी प्रस्तावनाकार निवडताना फसावा, यात नवल ते कसले ? दुसरे कारण—कुणी बादरायणसंबंध म्हणो, हवे तर त्याला—हा खेडवळ कवितांचा संग्रह आहे आणि मीही खेडवळ आहे. ' समसमा संयोग की जाहला ! ' या कविवचनाच्या आधारावरच मी हे धाडस करण्याला प्रवृत्त झालो.

' खेडवळ कविता ! ' या संग्रहातील कवींपैकी एखादा तापट कलावंत “ खेडवळ शब्द योजल्याबद्दल तुमच्यावर बेअब्रूची फिर्याद का करू नये ? ” म्हणून मला नोटीस देण्याची कल्पनासुद्धा मनात आणील. त्याच्या समाधानाकरिता मी एवढेच म्हणेन, “ हे कलावंत कविबंधो, खेडवळ या शब्दाने तुझ्या कवितेचा विरस करण्याऐवजी जानपद अगर त्यापेक्षाही अधिक कठीण असा एखादा संस्कृत शब्द वापरावा, असे मलासुद्धा वाटते. पण हुंड्याच्या मानाने करणी आणि करणीच्या मानाने दिवाळसण केल्याशिवाय व्यवहारात चालत नाही. ' जानपद ' शब्द वापरून त्याच्याच तोलाचे ' प्रथितयशा ' सारखे संस्कृत शब्द मी त्याच्या शेजारी बसविले की, माझी भाषाशैली पाहून तू विसाव्या शतकातून माझी उचलबांगडी करशील; पण अठराव्या शतकातील मोरोपंतांचा मित्र होण्याची काही माझी इच्छा नाही. तेव्हा आता आपण तडजोड करू या. आमच्या कोकणात, ' मासळी काय आणली आहेत ? ' असे विचारण्याऐवजी, ' काय बाजार हाडलात ? ' असा प्रश्न

करतात. ज्या कारणाकरिता मासळीचे नामांतर ‘ बाजारा ’त होते, त्याच कारणाकरिता खेडवळ शब्द बदलला पाहिजे असे तुला वाटत असेल, तर आपण खेडवळ कवितेला ग्रामगीते म्हणू या. ”

‘ पॅस्टोरल पोएट्री ’ या शब्दावरून सुचलेले गोपगीते, किसानगीते वगैरे शब्द याच अर्थी क्वचित वापरण्यात येतात. परंतु या सर्व शब्दांत अव्याप्तीचा दोष आहे. गोपगीतात कोळ्याच्या गाण्यांचा समावेश करणे हे मराठ्यांत मुसलमान बेमालूम मिसळून देण्याइतकेच कठीण आहे. ‘ कोळी हा एक प्रकारचा गुराखीच असतो; होड्या ही त्याची गुरे, समुद्र हे त्याचे रान– ’ अशी मल्लिनाथी या आक्षेपावर होण्याचा संभव आहे. पण होडीला सिंहासन म्हटल्यामुळे कोळी जसा राजा ठरू शकत नाही, त्याप्रमाणे असल्या ओढून ताणून आणलेल्या साम्यामुळे गावीत काही गुराखी होत नाही. किसानगीतांत फक्त शेतकऱ्यांविषयीच्या कवितांचाच समावेश होईल. जानपदगीते अगर ग्रामगीते ह्यांच्या ऐवजी हा शब्द रूढ झाल्यास ब्राह्मण म्हणवून घेण्याच्या भरात अनेक जातींनी जशी लोकविलक्षण नावे धारण केली, त्याप्रमाणे कोळ्यांच्या गाण्यांना अतिशब्द म्हणून ‘ सागरकिसान गीते ’ असले शब्द जन्माला येतील. रोग, संकटे आणि वाईट शब्द यांच्याशी झुंजत बसण्यापेक्षा त्यांचा जन्मच न होऊ देणे बरे नाही का ?

खेड्याविषयीची कविता म्हटली की अनेकांची तोंडे विश्वरूपदर्शन घेणाऱ्या अर्जुनाच्याप्रमाणे होतात. फरक इतकाच की, अर्जुनाला कृष्णाच्या तोंडात नाही नाही ते दिसले; आणि या श्रोत्यांना खेड्यात जे आहे ते सुद्धा दिसत नाही ! टर्जीनिवने आपल्या Virgin Soil या कादंबरीत एका पांढरपेशा लब्धप्रतिष्ठिताचे मोठे गंमतीदार चित्र रेखाटले आहे. स्वारीची मातृभाषा रशियन. पण निम्मे तरी फ्रेंच शब्द वापरल्याखेरीज त्याचे वाक्य पुरेच होत नाही. या भाषेच्या खिचडीतूनही त्याची मुक्ताफळे अधिक मौजेची आहेत. रशियन कादंबऱ्या शपथेला देखील न वाचण्याचे कारण सांगताना तो नाक मुरडून म्हणतो, “ छी ! या अलीकडच्या रशियन कादंबऱ्या ! रांधपिणीला नायिका करून लिहिलेल्या या भाकडकथा कोण वाचणार ? ” नोकरी मिळायला जशी विशिष्ट परीक्षा पदरी असावी लागते, त्याप्रमाणे वाङ्मयात नायक–नायिकेचे स्थान लाभायला उच्च कूळच हवे, असे या सद्‌गृहस्थाचे ठाम मत असते. जणू काही नायक–नायिकांचे स्थान म्हणजे राजपदच. ते वंशपरंपरेनेच चालायचे !

स्वयंपाकीण ही फक्त चुलीजवळील साहित्याची नायिका होऊ शकते, असे म्हणणाऱ्या वरील गृहस्थाचे आमच्यापैकी अनेकांना हसू येईल. पण आमच्या पायांखाली तरी काय जळत आहे? हरिभाऊ आपट्यांसारखा सागराएवढी अफाट सहानुभूती असलेला प्रतिभासंपन्न कादंबरीकार! पण त्यांच्या सामाजिक कादंबऱ्यातील सारी पात्रे सदाशिव पेठेतल्या हौदाभोवती फिरणारी! फार लांबची मजल मारली, तर ती बंड गार्डनपर्यंत पोचावयाची! खेड्यातल्या खळखळणाऱ्या ओढ्याच्या काठी त्यांच्यापैकी कोण कशाला जाणार? कोल्हटकर, गडकरी, वा. म. जोशी, फडके ह्यांच्या सामाजिक नाटके–कादंबऱ्यांकडे पहावे! हरिभाऊंचे वाङ्मय निदान चंद्रकांतासारखे आहे. दलितांच्या दर्शनाने त्याला पाझर फुटलेला स्पष्ट दिसतो. पण बाकीच्या साऱ्या कल्पनाप्रिय, तात्त्विक अगर कलाविलासी ग्रंथकारांचे वाङ्मय म्हणजे शुद्ध संगमरवर! दिसायला किती नितळ अन् सुंदर! पण खेड्यात संगमरवर जितका दुर्मिळ तितकेच दलितांचे अगर खेडवळांचे जीवन यांच्या वाङ्मयात प्रतिबिंबित झालेले दिसणेही कठीण! गडकऱ्यांच्या लोकप्रिय 'एकच प्याला' चीच गोष्ट घ्या! दारूचा प्याला हा स्थितप्रज्ञ आहे. त्याला सुशिक्षित सुधाकर काय आणि अशिक्षित गिरणीतला मजूर काय, दोन्ही सारखेच! परंतु गडकऱ्यांनी नायक म्हणून दूरच राहो, पण दुसऱ्या तिसऱ्या दर्जाच्या पात्रांच्या द्वारानेसुद्धा खेडवळांवर दारूचे होणारे दुष्परिणाम चित्रित केले नाहीत. या नामांकित ग्रंथकारांनी समाजचित्रणाकरिता संकुचित क्षेत्राबाहेर पाऊल का टाकले नाही, याची जातिभेद, कालमहात्म्य, संस्कृतिभिन्नत्व इत्यादी अनेक कारणे असू शकतील. पण मराठीतील अद्भुतरम्य, कल्पनानिष्ठ आणि प्रणय-प्रधान वाङ्मयाला आमच्या खेडेगावांची हवा ती एरव्ही कितीही चांगली असली तरी–अद्यापि मानवत नाही, हेच खरे. प्रख्यात इंग्लिश कादंबरीकार हार्डी काय कमी सौन्दर्यवादी आहे? पण त्याच्या कादंबऱ्यांतून खेडवळांचे जीवन किती कुशलतेने रंगविलेले दिसते. नाटककाराच्या बाबतीतले आणखी एक कारण म्हणजे त्याची सासूबाई–नाटक मंडळी! स्त्रीला सासू असणे जितके अनिष्ट तितकेच पुरुषाला इष्ट, अशी आपल्याकडे जुनीपुराणी समजूत आहे. पण नाटककाराला ती सपशेल खोटी असल्याचा अनेकदा अनुभव येतो. चांभारणीवर उभारलेले नाट्यकथानक एका मंडळीच्या मालकांना मी सांगितल्यावर ते म्हणाले, "बाकी कथानक ठीक आहे. पण अं–अं–ही नायिका चांभारीण

आहे. छेः बुवा ! निदान तिला मराठीण तरी करा. ” मालकांचा उद्देश हरिजनांच्या उन्नतीचा नव्हता ! शिवाय युरोपियन बाईला चुटकीसरशी हिंदू करून घेणाऱ्या शंकराचार्यांच्या हाताखाली माझे शिक्षणही झालेले नाही. तेव्हा चांभारणीला मराठीण करून नाटकाच्या कथानकाचा कणाच मोडून टाकण्याचा राजमार्ग मी स्वीकारला नाही, ही गोष्ट निराळी !

जातिभेद मोडण्याच्या गोष्टी बोलणाऱ्या लेखकांनी वाङ्मयात नागर व खडबळ हा भेद तीव्रतेने पाळावा, हे विलक्षण विरोधाभासाचे उदाहरणच नव्हे काय ? हिंदु–मुसलमानांच्या एकीवर आणि विवाहावर आम्ही कादंबऱ्या लिहू; पण खेड्यातल्या कुणब्यांच्या भाऊबंदकीवर अगर जीवनावर लिहायची पाळी आली की, आमची लेखणी रुसून बसलीच ! खेड्यातल्या लोकांचा आमच्या ललित वाङ्मयात प्रवेश झालाच तर तो त्यांचा भोळेपणा अगर अडाणीपणा दाखवून विनोदाला रंग भरण्याकरिताच व्हायचा ! ब्राह्मण भिक्षुक किंवा शास्त्री दुष्ट अगर मूर्ख या भूमिकेत मराठी वाङ्मयात कितीदा अवतीर्ण झाला असेल, याची गणतीच करता येणार नाही. पण याच पेशातल्या किती तरी माणसांत वर्णनीय औदार्य आणि सहृदयता वसत असते ! अनेकांना आश्चर्य वाटेल, पण अगदी खरीखुरी घडलेली गोष्ट आहे ! कीर्तनात सामान्यतः सुधारकांविरुद्ध बोलणाऱ्या आणि कट्टर सनातनी गणल्या जाणाऱ्या एका प्रख्यात ह. भ. प. ( पांगारकरांनी या शब्दाचे पेटंट घेतले असल्यास त्यांची मी क्षमा मागतो. ) बुवांनी एका बालविधवेचा पुनर्विवाह मोठ्या खटपटीने जुळवून आणला. अशा मनुष्याचे स्वभावचित्र रेखाटण्याची इच्छा आमच्या लेखकांत तीव्रतेने कुठे वास करीत आहे ?

‘ गाता येईना, सतार मोडकी अन् साथ रडकी ’ अशांपैकीही अनेकांचा प्रकार असतो. ‘ आम्ही खालच्या वर्गाविषयी लिहू, खेड्यातली चित्रे रेखाटू पण–पण ती चित्रे पाहून जातिद्वेषाच्या आरोपावर सरकार ती पुस्तके जप्त करील आणि–’ हे उद्गार राणा भीमदेवापेक्षा शेखमहंमदाच्या थाटाचेच वाटतात. जेन ऑस्टेनचा कटाक्ष प्रत्यक्ष अनुभवाशिवाय एक अक्षरसुद्धा लिहायचे नाही, असा होता असे म्हणतात. तो योग्य असो वा नसो, त्याची ढाल आजच्या पांढरपेशा लेखकांना वेळी अवेळी उपयोगी पडण्यासारखी आहे. पण सरकारच्या ब्रह्मास्त्राचा उगीच बाऊ करण्यात काय मतलब आहे ? कला म्हणजे सौंदर्य, सौंदर्य हे श्रीमंती व

विलास यांचे एकुलते एक अपत्य. आणि प्रणयवृत्ती ही या अपत्याची दाई. या त्रिकोणात वावरणाऱ्या कल्पनेचा ज्यांच्या मनावर पूर्णपणे पगडा बसला आहे, त्यांना बहुजनसमाजाशी समरस होणे अगर खेड्यातल्या जनांचे, मनाचे आणि वनाचे विविध सौंदर्य आपल्या वाङ्मयातून कुशलतेने प्रगट करणे फारसे शक्य नाही. फार वर्षे पिंजऱ्यात राहिलेल्या पोपटाला स्वच्छंद वनविहार कसा आवडावा? त्याला बंधमुक्त केला तरी तो पिंजऱ्याभोवतीच घिरट्या घालीत राहणार!

अभिजात, उच्च वगैरे कितीही विशेषणे लावली, तरी व्यापक दृष्टीने पाहिले की, गेल्या अर्धशतकात निर्माण झालेले मराठी ललित वाङ्मय एखाद्या तळ्याप्रमाणे वाटते. संस्कृत व इंग्रजी वाङ्मयातून वाहाणाऱ्या अखंड धारांनी ते भरल्याचा भास प्रथम झाला. त्यात कल्पनाविलासाची कमळे फुलली. तळ्याच्या आसपासच्या शेतीला त्याच्या पाण्याचा फायदा व्हावा, त्याचप्रमाणे सामान्य लोकांना या वाङ्मयाने स्फूर्तीही दिली. गावातला गुलहौशी श्रीमंत तळ्यातच आपली नौकाविहाराची हौस भागवून घेतो, त्याप्रमाणे करमणुकीकरिता वाचन करणाऱ्या मूठभर अर्धशिक्षित सुखवस्तू लोकांना या वाङ्मयाने घटकाभर आनंदही दिला. पण सरोवरात आढळणारा पाण्याचा जिवंत झरा या तळ्यात बरेच दिवस दिसत नव्हता, हे मात्र खरे. अलीकडे त्याची—बोटभर का होईना—धार उत्पन्न झाली आहे. वरेरकर, कुमार रघुवीर, आनंद, वि. स. सुखटणकर प्रभृतींचे लिखाण म्हणजे या बदलणाऱ्या मनूची पूर्वचिन्हेच आहेत.

शहरातील दलित वर्गांची चित्रे रेखाटणाऱ्या लेखकांना आज ना उद्या खेड्याकडे वळावेसे वाटेलच. ही प्रवृत्ती म्हणजे काही वाङ्मयातली फॅशन अगर चवचाल लहर नव्हे. महात्मा गांधी 'खेड्याकडे चला' म्हणून उपदेश करीत आहेत; इलाखाधिपती ग्रामोद्धारासाठी दौरे काढीत आहेत; तेव्हा आपणही खेड्याच्या नावाने गोंधळ घालू या, अशा कल्पनेने या नव्या मनूचे स्वागत करणाऱ्या लेखकांची कीवच करावी लागेल. मराठी सारस्वताची गंगा पांडित्याच्या आकाशातून कल्पनेच्या मृत्युलोकावर उतरल्याला बरेच दिवस झाले. पण ती तिथेच घुटमळत राहणार नाही. पाताळातील सागरपुत्रांच्या रक्षेपर्यंत जाऊन त्यांचा उद्धार केल्याखेरीज तिला चैन कसे पडेल? शाळेत असताना निबंधात अगर

वादविवादसभेत खेड्यातील जीवनाची स्तुती करण्याचे काम कोणीही करील. पण समुद्राप्रमाणे अफाट पसरलेल्या आपल्या खेडवळ जीवनाचे मंथन करून त्यातली रत्ने काढायला मात्र प्रतिभासंपन्न लेखकच हवेत.

शहरातील आयुष्यक्रमाला चटावलेला लेखक म्हणेल, 'खेड्यात आहे काय असं पाहण्यासारखं? मोडकी तोडकी घरं, घाणेरडे रस्ते आणि दरिद्री लोक!' या मनुष्याचे पाहणे म्हणजे मुलगी पाहण्याचाच निराळा प्रकार. सौंदर्यजन्य आनंदाला आसावलेल्या अंतःकरणाला खेड्यासारखे दुसरे योग्य ठिकाण नाही. इथे पहाटे ट्रॅम गाड्यांनी झोपमोड व्हायची नाही; उलट कुठल्या तरी देवळातल्या चौघड्याचे मंद शांत ध्वनी झोपमोड न होईल, अशा बेतानेच वातावरणातून पावले टाकतील. ब्राह्म मुहूर्तावर एखाद्याला उठावयाचेच असेल, तर खेड्यात गजराचे घड्याळ कशाला हवे? कोंबडा त्याला वेळेवर साद घालायला कधीच चुकायचा नाही. डोळे उघडून खिडकीबाहेर पाहिले तर त्याची दृष्टी दगडांच्या बेडौल व अजस्र इमारतीवर कधीच पडणार नाही. प्रभातवायूच्या तालावर नर्तकीप्रमाणे नृत्य करणाऱ्या केळी आणि ते नृत्य पाहून रसिकतेने मान डोलावणारे माड त्याच्या स्वागताकरिता सज्ज झालेले दिसतील. त्या वेळी पडणारे दव पाहून जणू काही आकाश गुलाबपाणी शिंपडीत आहे, असाच त्याला भास होईल. पाहुणा कवी असेल आणि त्याला अरुणावर कविता करायची इच्छाच असेल, तर त्याने या वेळी जवळपासच्या एखाद्या टेकडीवर अवश्य जावे. 'हा अरुण कसला? कसाईखानाच आहे हा! पहा, जिकडे तिकडे अंधाररूपी बकऱ्याचे रक्त वाहात आहे,' असल्या अभद्र किंवा 'हा अरुण नव्हे शयनमंदिरातून घाईघाई बाहेर पडताना निशेचा पाय लागून सांडलेली ही सुरईतील मदिरा आहे,' असल्या चमत्कृतिप्रधान उत्प्रेक्षा त्याला मुळीच सुचणार नाहीत. त्याला जे सुचेल ते यापेक्षा अधिक सुंदर व रसपूर्ण असेल. ते इथे लिहिणे म्हणजे प्रस्तावनाकाराने गनिमी काव्याचा आश्रय करून आपली कविता वाचकांच्या गळयात बांधण्यासारखे होईल.

वाङ्मयातल्या पांढरपेशा म्हणा, नागर म्हणा अगर विलासी म्हणा, पण सर्वस्वी संकुचित अशा या दृष्टीत, काव्यापुरते का होईना 'सुगी' मुळे अंजन पडेल. बोरकरांच्या कवितेतले सुलक्षणाचे वर्णन ( पृ. १९-२० ), पाठकांच्या कवितेतील खेड्याचे ( पृ. २०-२१ ) आणि सोपानदेवांचे मळयान जातानाचे ( पृ. ३१-३६ ) वर्णन वाचताना फेसाने भरलेले गाईचे निरसे दूध आपण पीत

आहो, असे वाटते. आगगाडया, मोटारी आणि बंगले यांच्या वर्णनांचा कडक चहा नित्य पिणाऱ्यांना देखील ते निःसंशय आवडेल. ‘ कापसाचें शेत ’ (पृ. २८) या किशोरांच्या कवितेतील कल्पना-विलासही मोठा रमणीय आहे; मात्र हे शेत पिकविणारा शेतकरी जरा सुशिक्षित दिसतो. माडांच्या राया, कापसाची शेते आणि उसाचे मळे असली मंदिरे काव्यदेवतेला का आवडणार नाहीत ? पुरुषभर उंच वाढलेल्या उंसाच्या मळयात प्रौढ जोडप्याला नेऊन सोडले, तर त्यांनादेखील लपंडावाने अगर पाठशिवणीने खेळण्याची हिरिरी आल्यावाचून राहणार नाही.

कविहृदय निसर्गाकडून मनुष्याकडे वळले की, खेड्गावातले अकृत्रिम जीवन त्याला मोह घालते. ‘ शेवंती ’ (पृ. ३८), ‘ मंजुळा ’ (पृ. ३९-४०), ‘ रायबा ’ ( पृ. ५२ ), या कविता या दृष्टीने गोड वाटतात. जणू काही हिरवळीवर फुललेली साधी फुलेच. ‘ ही कोण ? ’ ‘ इरलेवाली ’ आणि ‘ सुंदरी ’ (पृ. ४०-४३ ) या कवितांतली मुग्ध तरुणींची चित्रे पार्श्वभूमीच्या नावीन्यामुळ ठराविक ठशाच्या प्रणयचित्रापेक्षा अधिक आकर्षक वाटतात.

पण खेडयातले हे साधेभोळे जीवन सुखी कुठे राहते ! अज्ञान आणि दारिद्र्य यांच्या जात्यात त्याचे हां हां म्हणता पीठ होते. ‘ पाटीवाली ’ (पृ. ४७ ), ‘ मोळीवाला ’ ( पृ. ८० ), ‘ कोकणचा शेतकरी ’ (पृ. ८७), ‘ कोकणचा कुळवाडी ’ ( पृ. ८९ ), इत्यादि कवितांत हे स्पष्टपणे प्रतिबिंबित झाले आहे. ‘ पावसाचे गीत ’ या कवितेत ज्येष्ठापासून आश्विनापर्यंतच्या शेतातल्या कामांचे सुंदर चित्र रेखाटून आनंद कवींनी शेवटी

‘ आला आला मंगशीर–भात झाले खळयाभर
करता सरकारी भर
शेत्याच्या नयनी नीर ! ! ’

असे उद्‌गार काढले आहेत. ‘ कलेसाठी कला ’ असा आक्रोश करणारे रसिक या कवितेतील हे शेवटचे कडवे कापून टाकायला तयार होतील. काय नेम ? त्यात समाजसत्तावादाचा किंवा कायदेभंगाचा वास यायचा ! कलावंतांची घ्राणेंद्रिये फार तीक्ष्ण असतात म्हणे ! तत्त्वाच्या अगर उपदेशाच्या लवंगेनेसुद्धा त्यांना उष्णता होते. पण या गाण्याचे शेवटले कडवे कापून टाकणे म्हणजे विंचवाची नांगी मोडण्यासारखेच आहे, असे मी तरी म्हणेन. ललितलेखनाचे मतप्रचारक ( Propagandist ) होण्यात धोका आहे; पण विशिष्ट मतप्रचार

( Propaganda ) आणि जीवनातील कूट प्रश्न (Problem) यांच्यात कलावादी लेखक समजतात त्याच्यापेक्षा फार अंतर आहे. सरस्वतीचे आसन व्यासपीठ नसून मयूरासन आहे, हे प्रो. फडके यांचे म्हणणे कुणीही मान्य करील. पण मयूरासन म्हणजे कमलासन मात्र नव्हे, अशी पुस्ती त्याला जोडलीच पाहिजे. शिवाय सरस्वती मयूरासनावर बसली असली तरी आपण सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाची कन्या व बुद्धिदात्या गजाननाची अर्धांगी आहोत, याची आठवण तिने ठेवायला नको काय ?

' सुगी ' च्या दुसऱ्या भागाच्या आरंभी खेडवळ शेतकऱ्यांचा साधाभोळा पण सुखी आयुष्यक्रम दाखविणाऱ्या ' समाधान ' ' आम्ही तर जंगलची पाखरे, ' इत्यादि कविता असून पुढे ' आगोट ', ' गोफणवाला ' या कवितांपर्यंत शेतातल्या निरनिराळ्या कामांचे समरसतेने शब्दचित्र रेखाटणारी गीते आहेत. ' गरिबीचा पाहुणचार ' या पृ. ८२ वरील कवितेपासून विविध नाटयगीतांचा ताटवा लागतो. भावना व कल्पना यांच्या सुंदर मिलाफामुळे यांपैकी बरीच गीते सरस वठली आहेत. उत्कृष्ट काव्य हे संगीतमय चित्रपटासारखे असते. संगीताच्या तालावर चालणारे शब्दचित्रांचे मोहक नृत्य ' लुटारूंनी म्हटलेले गाणे ', ' कोळ्यांचे गाणे ', ' शीळ ' इत्यादी गीतांत आढळते.

देवाप्रमाणे काव्यही बाह्य उपचारावर अवलंबून नसते. भाव हाच दोघांचा आत्मा या सत्याची प्रचीती ही ग्रामगीते वाचताना वारंवार येते. कुठे कालिदासाची अलकेतल्या रत्नमंदिरात राहणारी विरहणी यक्षपत्नी आणि कुठे ठोकळ्यांची पहाटे जात्यावर दळत बसलेली दुष्काळपीडित दारिद्र्याची कारभारीण ! परंतु हॅम्लेटच्या शब्दात–पण अगदी भिन्न अर्थाने कोणीही म्हणेल, हे चित्र पहा आणि हे चित्र पहा.

" पहाशील तू तिला कदाचित् देवांते पुजिताना,
किंवा न्हाउनि माझी मूर्ती चित्रपटी लिहिताना,
असेल अथवा पिंजऱ्यापाशी उभी पुसत मैनेला,
' कां गे, आठवतो तुजला तो प्राणसखा रंगेला ! '
घेउनि हाती सारंगी वा कालक्रमण कराया
स्वये रचियली मजविषयीची लागे गीते गाया,

तैं डोळयांतुनि गळुनि अश्रुजळ जाई भिजुनी तार
स्वये घेतला मधेच विसरे अलाफ वारंवार"

( मेघदूत )

" दूरदेशी गेला मला एकली टाकून
तिठं न्हाई त्येला जीव लावायला कोन
राया, डोळयामंदी तुझ्या मोतीयाचं पाणी
राया, तुझा रंग जवसाच्या फुलावाणी
तुझ्या डोईवर अशी पागुटं कुसुंबी
तुझं वठ बाई जशी फुलली डाळिंबी
तुझ्याबिगर रे मला घासहि जाईना
तुझ्याबिगर रे मला पाणीहि घोटंना "

( जात्यावरलं गाणं, पृ. १०३ )

दोन्ही चित्रे सारखीच हृदयंगम वाटत नाहीत का ?

चंद्रशेखरांचे सुगीच्या आरंभी दिलेले ' उगडं गुपित ' हे खंडकाव्य म्हणजे तर ग्रामगीतांच्या बाजूने केलेली उत्कृष्ट वकिलीच आहे.

" फिरे कलमवज्र हे वचनमौक्तिकांच्या वरी
ममायुगुण गोवुनी बनवितो तर्यांच्या सरी "

अशा बाण्याच्या राजकवीच्या खंडकाव्यातील नायक आपल्या प्रियकरणीला उद्देशून,

" जल्मांतरचं काइबी आपलं घ्येनं द्येनं असल
त्येच्यावाचुन तुजवर सहसा हे मन का ग बसल ! "

असे उद्‌गार काढतो. त्या वेळी, ' शकुन्तला क्षत्रियकन्याच असली पाहिजे. नाही तर माझे मन तिच्यावर कसे बसले असते ? ' या दुष्यंताच्या प्रेमळ तर्कशास्त्राची आठवण झाल्यावाचून राहत नाही. मदनाच्या मोहिनीमंत्रापुढे संताजी काय अगर दुष्यंत काय दोन्ही सारखेच ! संताजीने थारोळयावर पाहिलेल्या कबूतरांच्या जुळयाचे वर्णन आणि

' संताजीचं पडतच न्हाइत बोल तितं खालती,
पाडा आल्ये जनु आंबे त्ये झेल्यानं झलती '
' तुम्ही मिठाचा नवत वैन्स खडिसाकरेचा खडा ! '

‘ सदाच व्हावा नवा जिवाळा, सभाव ह्यो प्रीतिचा ’
‘ अन् गालाची गोड न्यहारी तिने दिली घेतली ’

इत्यादी ओळींमधे रातांब्याच्या पन्ह्याप्रमाणे अवीट माधुरी आहे.

श्री. श्री. बा. रानडे यांची लेजीम ही कविता नावीन्यपूर्ण आहे. तिच्या शेवटी ते पहाटेचे वर्णन करतात—

‘ पहाट झाली, तारा थकल्या
डफवाला तो चंद्र उतरला
परी न थकला लेजिममेळा,

चंद्राला कवींकडून आजपर्यंत अनेक पदव्यांचे आहेर झाले असतील, पण मदनाच्या या जिवलग मित्राला ‘ डफवाला ’ करण्यात रानड्यांनी दाखविलेली कल्पकता खरोखरीच मौजेची आहे. शब्दरचना अर्थसूचक व परिपोषक करण्यात कवि आनंद किती कुशल आहेत, हे ‘ गुराखीण ’ या कवितेवरून कळून येईल. ‘ Sands of the Dee ’ ही इंग्रजी कविता या कवितेशी तुलून पाहिली तरी आनंदांचे काव्यगुण डोळ्यांत भरल्यावाचून राहणार नाहीत. विंचवाप्रमाणे पाठी-वर बिऱ्हाड असणाऱ्या ‘ गोपाळ ’ नावाच्या जंगम जातीच्या जीवनाचे त्यांचे वर्णनही पण सुंदर आहे ( पृ. ४९ ).

‘ कोकणचा शेतकरी ’ या करुण गीतात भात कमी झालेले पाहून खोत रागावतो व लगेच भाताची रास हातोहात उंच होऊन,

‘ कोकणचा शेती ! नुसता नावात
पिकते ते सारे खोताचे भात.’

असे उद्गार काढतो. ही त्यांची कल्पना निःसंशय चमत्कृतिजनक आहे.

श्री. ना. घ. देशपांडे यांची शीळ गेल्या वर्षापासून लोकांच्या कानात घुमत आहेच. या संग्रहातील त्यांच्या इतर पाचही कवितांमधे मार्दव, माधुर्य आणि मोहकता यांचे सुंदर मिश्रण आढळते. ‘ सुगी ’, ‘ मोटकरी ’, ‘ भिंगरी ’ या त्यांच्या कविता गोड आहेतच. पण ‘ शीळ ’ या गीतात मनाला भारून टाकणारे काव्यसंगीत आहे, यात संशय नाही. केशवसुतांनी मराठी कवितेला पंडिती भाषेच्या कचाट्यातून मुक्त केली. पण काव्यात व्यवहारातली भाषा योजण्याच्या भरात त्यांनी ती गद्यप्राय केली. काव्याचे संगीताशी अगदी निकटचे नाते आहे, हे केशवसुतांच्या फारसे लक्षातच आले नाही. दत्त, बालकवी व तांबे यांनी ते पूर्णपणे

जाणले. श्री. देशपांडे यांच्या सर्व कवितांवरून त्यांच्या अंगी हा गुण बऱ्याच मोठया प्रमाणात वास करीत आहे, हे स्पष्टपणे दिसते. गिरीशांच्या भलरीतील,

" शिवारि जित्राप नागावानी
सळसळ आवाज, डुलती फनी
डुइवर धरले मोत्यांचे मनी
कवळुन आनु या वर्साचा सौदा
भलरी दादा! भल गडि दादा! "

हे कडवे आणि यशवंतांच्या दोन्ही कविता वाचून या प्रमुख कवींनी असली गीते विपुल लिहावी, असे कुणाला वाटणार नाही? साधुदासांचे ' उंद्या येदाळा ' हे गाईची समजावणी करून तिला पाणी प्यायला सांगणाऱ्या घरधनिणीविषयीचे गीत आकर्षक आहे. ' पाह्यलं गं दारी ', ' लक्षुमी ', ' विनवणी ', इत्यादि कविताही गोड आहेत. फिक्कट दिसणाऱ्या चंद्राला ' तुझा प्रेमभंग झाला आहे वाटतं?' असा प्रश्न शेलेने केला असेल. पण देशपांड्यांच्या ' रामपहारी ' या कवितेची नायिका त्याला म्हणते,

" अन् कशास येसी चंद्रा माझ्या मागं?
भयभीत अशी मी, कोणीच नाही जागं. "

या संग्रहातील ' पेरनीचा होका ' ही कविता पूर्वखानदेशस्थ लेवा पाटीदार शेतकऱ्यांच्या भाषेत आणि ' मागणी ' ही ऐराणी (म्हणजे इराणातील नव्हे. खानदेश, नाशिक व मोगलाई यांच्या काही भागात प्रचलित असलेली) भाषेत लिहिलेली आहे. विशिष्ट बोलीचे नमुने या दृष्टीने या कविता ठीक आहेत. पण गोमांतकापासून ग्वाल्हेरपर्यंत पसरलेल्या महाराष्ट्रात इतक्या बोली प्रचारात आहेत की, प्रत्येक कवीने आपापल्या बोलीत कविता लिहावयाचा निश्चय केला तर, गगनचुंबी बुरूज बांधणाऱ्या बाबिलोनच्या लोकांइतकीच वाचकांची दुर्दशा होईल. ईश्वराच्या शापाने त्यांच्या भाषा एकदम भिन्न झाल्या व एक काय म्हणतो ते दुसऱ्याला कळेना! बारा कोसांवर भाषा बदलते म्हणतात; पण कोकणात तर पावलांवर ती बदललेली आढळून येते. एकाच प्रदेशातील ब्राह्मण-सारस्वत ब्राह्मण-भंडारी-गबितकिरिस्ताव यांच्या बोलण्याच्या भाषा भिन्न आहेत. एवढेच नव्हे तर यांपैकी प्रत्येक जातीच्या जशा पोटजाती आहेत त्याप्रमाणे प्रत्येक पोटजातीगणिक पोटबोलीही आहे. खरेच आहे! जगात पोट मागे लागले नाही,

असा कोण आहे! मग जाती व बोलीच या नियमाला कुठून अपवाद ठरणार!

विपुल टीपा दिल्यावर अशा कविता लिहायला काय हरकत आहे? असा प्रश्न या बाबतीत साहजिकच उपस्थित होईल. पण टीपांच्या सहाय्याने काव्यरसाचा आस्वाद घेणे म्हणजे कुबड्या लावून नृत्य करण्यासारखे आहे. बखरी भाषा आणि फारशी भाषा यांच्याप्रमाणे खेडवळ भाषेचा अगर बोलीचाही अतिरेक कवितेत अक्षम्यच मानला जाईल. वर्णनपर, विचारात्मक अगर कवीची भावना रंगविणाऱ्या कवितांच्या बाबतीत बोलीचा प्रश्न उपस्थितच होत नाही! नाट्यगीते मात्र निव्वळ शुद्ध भाषेत लिहिल्यास रसहानी होईल. पण त्यांची भाषा कुणबाऊ असली तरी सर्रास प्रचलित असलेली अगर सहज कळेल अशी असणे आवश्यक आहे. या संग्रहातील चंद्रशेखर, यशवंत, देशपांडे इत्यादिकांची भाषा त्या दृष्टीने ठीक आहे. ठोकळ, सुरेश वगैरे खेड्यात वाढलेले, जातीने मराठे असल्यामुळे खेड्यातील बोलीशी त्यांचा परिचयही अधिक! यामुळे त्यांच्या कवितांत बोलीचा प्रभाव अधिक उठून दिसतो. पण त्यामुळे दुर्बोधता आली आहे, असे मात्र वाटत नाही. कला ही कृत्रिमच असायची. पण कलावंताचे कौशल्य ती नैसर्गिक आहे, असे भासविण्यातच नाही का?

दुसरा एक इषारा जाता जाता देणे आवश्यक वाटते. नवीन टूम निघाली की, तिचे अनुकरण हे व्हायचेच. अनुकरण म्हणजे आत्महत्या आहे, असे कुणीसे ( तो कुणी मी मात्र नाही. ) म्हटले आहे. पण वाईट अनुकरणात नुसती आत्महत्याच नसून दुसऱ्याचा खूनही होतो. ज्या चालीने, उद्धव गोकुळातल्या दुःखी लोकांचे शांतवन करण्याकरिता गेला, त्या चालीवर आपल्या शूर पूर्वजांच्या घोड्यांना व प्रसंगी त्यांनाही दौडायला लावून महाराष्ट्रात राष्ट्रीय कवितांचे कारखाने निघाले. प्रेमभंगाचीही तीच स्थिति! आईच्या पोटात मरणाऱ्या बालका-प्रमाणे जन्माला येण्यापूर्वीच कित्येक कवींच्या प्रेमाचा भंग झाला व ते अज्ञात ( कदाचित अजातही ) सुंदरींच्या नावाने रडू लागले. हातसुताच्या हाताने विण-लेल्या खादीला महात्माजी जेवढे महत्त्व देतात तेवढीच स्वतःच्या भावनासूत्रातून आपल्या कल्पनेने तयार केलेल्या काव्याला किंमत दिली पाहिजे. फोटोंचे फोटो व पुन्हा त्या छायाचित्रांची छायाचित्रे घेण्याची पद्धत सुरू झाली की, ती निर्जीवच व्हायची.

'मोले घातले रडाया' अशा थाटाची कविता खेडवळ जीवनावर लिहिण्याचा

मोह होतकरू कवींना होण्याचा फार संभव आहे. रात्रभर थंडीत कुडकुडत गाडी हाकणारा गाडीवान पाहिला की, धर त्याला आणि लिही त्याच्यावर कविता ! बांधावर कसले तरी फूल दिसले की, मार हाका स्फूर्तीला ! शेतकरी दिसला की, गेलाच हात फाउंटनपेनकडे ! असे झाल्यास रसिकांना जानपद कवितेचा 'जानुपदा' शी जवळचा संबंध आहे–गुडघे टेकून कवीचे पाय धरण्याइतका तरी–असे वाटल्यावाचून राहणार नाही. जिवंत भावना ( Emotion ) व तिची निर्जीव छाया ( Sentimentalism ) यांच्यातील अंतर न कळल्यामुळे आधुनिक मराठी काव्याचा बराच भाग नीरस व कृत्रिम झाला आहे. त्यात खेडी न पाहता, त्यातल्या आयुष्याशी समरस न होता, स्त्रीदाक्षिण्याप्रमाणे दीनदाक्षिण्य दाखविण्याच्या हेतूने लिहिलेल्या कृत्रिम कवितांची भर पडायला नको.

कल्पना व भावना ही काव्यलतेची मुले ! निसर्ग, व्यक्ती व समाज यांच्यातर्फे सौंदर्यजल भावना शोषून घेते. या शोषून घेतलेल्या सौंदर्यजलाला कल्पनाकिरणांचे सहाय्य मिळाले की, काव्यलतेवर हिरवीगार पाने आणि सुंदर फुले चमकू लागतात. सुगीत अशा फुलांचे मोहक संमेलन झाले आहे. इथे चंद्रशेखरांसारख्या साठी उलटलेल्या राजकवीच्या मांडीला मांडी लावून देशपांडे, ठोकळ, बोरकर वगैरे पंचविशीच्या आतील कवि बसलेले आढळून येतील. यशवंत, आनंद, मायदेव, गिरीश, काणेकर वगैरे लोकप्रिय कवींची साथ पंडित, सोपानदेव, पाठक, ग. ह. पाटील, सुरेश प्रभृति उदित अगर उदयोन्मुख कवींनी उत्तम रीतीने केलेली दिसेल. चंद्रशेखरांचा नाशिककडला संताजी पुरणपोळयांचे जेवण देईल, तर गोमांतकातील बोरकरांचा नायक पहाटे डोंगरमाथ्यावर गोळा केलेले स्वादिष्ट काजू वाचकांच्या पदरात टाकील. अशा या रम्य संमेलनाचे निमंत्रण कोण नाकारील ? आणि म्हणूनच संमेलनाच्या दारावर स्वागताकरिता नेमलेल्या माझ्यासारख्या मनुष्याने निमंत्रितांचा अधिक वेळ घेणे शोभणार नाही. ठोकळांच्या मनात येणार नाही. पण 'भटाला दिली ओसरी' अशी थोडीशी या प्रस्तावनेची स्थिती झाली असण्याचा संभव आहे. हातपाय पसरताना ते कोणाला लागले असल्यास नमस्कारपूर्वक त्यांची क्षमा मागण्यापलीकडे मी काय करू शकणार ?

शिरोडे
२-१२-३३

वि. स. खांडेकर

REFBK-0022686
REFBK-0022686